# भारतीय हिंदी आंदोलन

म. ग्र. सं. ठाणे
मु-प्रकाश
६९६

REFBK 0023306
REFBK-0023306

६१८
२३३०६
२०।७०।८

# भारताचे दुसरे नंदनवन

## अंदमान निकोबार

जालंदर सोनुने

REFBK 0023306
REFBK-0023306

विजय प्रकाशन
नागपूर ४४००१२

विजय प्रकाशन
छप्पन

प्रकाशिका
सौ. जयश्री उपाध्याय
हनुमान गल्ली
सीताबर्डी, नागपूर ४४० ०१२

© सौ सिंधू सोनुने

मूल्य रुपये १२

मुद्रक
दि भि धाक्रस
नाग मुद्रणालय
रुईकर पथ
नागपूर ४४०००२

मुखपृष्ठ
जयंत गायकवाड

प्रथमावृत्ती
जुलै १९८१

स्वातंत्र्याच्या युद्धात ज्या ज्या वीर स्वातंत्र्य सेनानींनी अंदमानच्या 'सेल्यु-लर जेल' मध्ये आपल्या प्राणाची आहुती दिली, बर्बर यातना सहन केल्या, जुलूम, अत्याचारांना बेडरपणे तोंड दिले अशा त्या ज्ञात अज्ञाताच्या चरणी सादर—

समर्पण

# मनोगत

हायस्कूलमध्ये शिकत असताना मला अंदमान-निकोबार द्वीपसमूहा-बाबत फारशी माहिती नव्हती त्याचे स्थान हे भारताच्या नकाशात पूर्वे-कडील बंगालच्या उपमहासागरात टिंबाटिंबानी दर्शविलेले मी बऱ्याच वेळा बघितले होते आठव्या वर्गापर्यंत भूगोल शिकलो. परंतु सविस्तर अशी माहिती मिळाली नाही तो भारताचा अभिन्न भाग असून केन्द्रशासित प्रदेश आहे हे मी वाचले होते, म्हणून माहीत होते शिवाय त्यास 'काळेपाणी' म्हणून ओळखतात हे पण ऐकून होतो

कॉलेजमध्ये असताना स्वा वि दा सावरकरलिखित 'माझी जन्म-ठेप' हे पुस्तक वाचण्यात आले ते वाचून स्वातंत्र्य सैनिकाबद्दल नितांत आदर उत्पन्न झाला नकळतच नतमस्तक झालो। त्यानी सहन केलेल्या यातनांची कल्पनासुद्धा करवेना मला त्याच वेळी अंदमान आणि अंदमाना-तील 'सेल्युलर जेल,' त्याच्या त्या काळकोठड्या बघण्याची तीव्र इच्छा झाली परंतु ते तेव्हा मला शक्य नव्हते

त्यानंतर तेरा वर्षांचा काळ मागे पडला मधूनमधून अशीच कुठेतरी अंदमानविषयीची तुरळक तुटपुंजी माहिती वाचण्यात येत असे परंतु त्या तुटपुंज्या माहितीमुळे सविस्तर अशी कल्पना येतच नसे त्यानंतर १९७६ च्या फेब्रुवारीत माझ्या एका स्नेही मित्राने 'केन्द्रीय लोकसेवा आयोगा'च्या एका पोस्टसाठी अर्ज मागितला होता तो अर्जाचा नमुना स्वत: न भरता मला दिला आणि सम्बधित जागेसाठी अर्ज करावयास सुचविले ती पोस्ट अंदमान प्रशासनात प्रथम श्रेणी अधिकाऱ्याची होती मनातून आनंदी झालो कुठलाच विचार न करता अर्ज पाठवून दिला महिन्या दीड महिन्यात 'कॉल' आला. मुलाखतीस उपस्थित झालो एका जागेसाठी भारतातून आठ उमेद-वार हजर झाले होते मी अनुभवाने सर्वांत कमी भरत होतो परंतु प्रत्यक्ष मुलाखतीत मी उजवा ठरलो काही दिवसांनी नेमणुकीचा आदेश आला

सर्वांना त्याची कल्पना दिली कित्येक जण म्हणू लागले, ' कशाला जातोस त्या काळ्या पाण्यावर, सुखात्त जीवन दु:खात का घालवतोस ? तिकडे जाणारे बहुतेक आजारीच पडतात ? इत्यादी, इत्यादी...' परतु काहीनी मात्र जा म्हणून प्रोत्साहित केले मी इतरांचा सल्ला जरी घेतला होता, तरीपण मनातून जायचेच्च ठरविले होते कारण ह्या पावन भूमीला बघण्याची माझी तीव्र इच्छा होती आणि ती आता चालून आली होती अशा स्थितीत मी येथील नोकरीवर ७ मे १९७७ ला रुजू झालो

त्यानतर मला मित्र / नातेवाइकाकडून खूपच पत्रे यायची, इकडील सविस्तर माहिती कळविण्याविषयीची काहीना थोडक्यात लिहून कळविली काहीना मी सुट्टीवर आल्यावर प्रत्यक्ष सागितली वर्षभरानतर जेव्हा रजेवर गेलो तेव्हा, केवळ माझी प्रकृती बघण्यासाठी आणि राहणीमान, खाण्या-पिण्याची चौकशी करण्यासाठी पुष्कळ मित्र, नातेवाईक माझ्या भेटीसाठी आले तर काहीनी मलाच जरूर जरूर भेटीसाठी ये म्हणून निरोप धाडले. (जसा मी काळ्या पाण्याची शिक्षाच भोगून आलो होतो ) मी सविस्तर सागितल्यावर कुठे त्यांचा गैरसमज दूर झाला

त्यानतर मात्र मी सविस्तरपणे लिहून जनतेचा अदमान–निकोबार-विषयीचा गैरसमज दूर करण्याचे ठरविले जवळपास दोन वर्षे साहित्य जमवून अभ्यास केला, जेथे जेथे शक्य झाले तेथे तेथे जाऊन प्रत्यक्ष निरीक्षणे केली, ८०–८५ वर्षांपूर्वी स्थायिक झालेल्या काही रहिवाशाच्या मुलाखती घेतल्या, सविस्तर टीपण केले आणि नतर त्या लिखाणास दैनिक ' लोकमत ' नागपूर, तथा दैनिक ' लोकविजय ' औरगाबाद या वृत्तपत्राच्या सपादकानी लेखमालेच्या रूपाने प्रसिद्धी दिली आणि तदनतर ' विजय प्रकाशन ' सस्थेचे सचालक श्री ज च उपाध्याय ह्यांनी ते पुस्तकरूपाने प्रकाशित करण्यास पुढाकार घेतला म्हणूनच तर हे पुस्तक आज आपल्या हाती पडत आहे अन्य ज्यांच्या सहकार्यामुळे हे काम शक्य झाले ते गोविंदराव हर्षे, ज्यांनी अदमानातील ' जिल्हा कारागृहात ' २० वर्षे जेलर म्हणून काम बघितले ते सेवानिवृत्त जेलर—' सोनुने, अदमानविषयी सविस्तर लिहा बुवा तुम्ही,' म्हणून सतत स्मरण देणारे श्री शरद्चद्र गुप्ते (डी सी एफ पोर्ट-ब्लेअर), अमरावतीचे परम कविमित्र श्री शिवा इगोले, लेखमाला वाचून

अभिप्राय कळविणारे तथा सदा प्रोत्साहित करणारे औरंगाबादचे श्री एस. डी ओक, तद्वतच ' महाराष्ट्र मंडळ, पोर्ट-ब्लेअर ' मधील समस्त सदस्य विशेषत श्री विजयकुमार जोशी तथा सौ रूपाली जोशी—अंदमान प्रशासनाचे प्रसिद्धी अधिकारी ज्यांनी काही फोटो उपलब्ध करून दिलेत, या सर्वांच्या सहकार्यामुळेच पुस्तकलेखनाचे काम पूर्ण होऊ शकले

नाग मुद्रणालयाचे संचालक श्री. दि भि धाक्रस आणि कर्मचारी वर्गाने अत्यंत मेहनतीने सुबक छपाई केल्यामुळेच तर पुस्तकाची शोभा वाढली श्रीयुत श्याम किनारीवाला यांनी उत्कृष्ट ठसे तयार करून दिल्यामुळे पुस्तकाच्या सौंदर्यात आणखी भर पडली

श्री जयंत गायकवाड यांनी पुस्तकासाठी आकर्षक मुखपृष्ठ तयार करून दिले म्हणूनच तर वाचकाचे लक्ष पुस्तकाकडे आकर्षिल्या गेले. त्यांच्या कलाकौशल्याबद्दल तथा वरील उल्लेख केलेल्या सर्वांचा मी नितांत ऋणी आहे

शेवटी एक नमूद करावेसे वाटते माझी पत्नी सौ सिंधू हिने प्रपंच सांभाळून तीनदा हस्तलिखित तपासून देण्यात जी मदत केली ती उल्लेखनीय आहे तसेच आमच्या मुली चि. सुलभा आणि शीतल यांच्या बाललीलांनी तीन वेळा हस्तलिखित लिहीत असताना जो कमालीचा संयम बाळगला, त्यामुळे त्यांचे कौतुक करावेसे वाटते

शेवटी, अनेक हितचिंतकांच्या साहाय्यामुळे मला हे शक्य झाले त्यांचे अनेक आभार ! पुस्तक वाचून थोडाफार जरी जनतेचा अंदमानविषयीचा गैरसमज दूर झाला, तरी मी स्वत:स धन्य समजेन.

८६, ॲटलान्टा पॉईंट,
पोर्ट–ब्लेअर– ७४४०१४

जालंदर सोनुने

# अनुक्रम....


| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ | भौगोलिक स्थिती आदिवासींचा इतिहास आणि पहिली वसाहत | ९ |
| प्रकरण २ | काळ्या पाण्याच्या शिक्षेचा प्रारंभ आणि जेलमधील शिक्षापद्धती | १७ |
| प्रकरण ३ | जपान्यांचे आधिपत्य, त्यांनी दिलेल्या यातना व सुभाषचंद्र बोस यांची भेट | ३२ |
| प्रकरण ४ | अंदमान–निकोबार द्वीपसमूहातील आदिम जनजाती | ४० |
| प्रकरण ५ | स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेली प्रगती | ५० |
| प्रकरण ६ | सहावी पंचवार्षिक योजना प्रशासन, निसर्ग सौंदर्य व नवलाच्या घटना | ६३ |
| परिशिष्ट अ | " सेल्युलर जेल " मध्ये प्राणाची आहुती दिलेल्या शहिदांचा थोडक्यात जीवनपरिचय | ७८ |
| परिशिष्ट ब | राजकीय बंद्यांची प्रांतवार सूची | ८३ |
| परिशिष्ट क | द्वीपाची नावे | ९० |



बाबा पृथ्विसिंह आझाद सोबत लेखक यानी इंग्रजांच्या राजवटीत सेल्युलर जेल मधील अत्याचाराविरुद्ध बंड पुकारून १५५ दिवस उपोषण केले होते.



निकोबारी आदिवासीची झोपडी




आदिम जनजातीचे ओंगी स्त्री– पुरुष ३० वर्षांपूर्वीची राहणी




निकोबारी आदिवासी, परपरागत लोकनृत्य करताना




वीर वि. दा. सावरकरांना वारंवार बंद करून ठेवीत ती
१२३ नंबरची कोठडी



सात विंग तथा मधोमध टॉवर असलेला मूळ सेल्युलर जेल



'पोर्ट–ब्लेअर' च्या मुख्य रस्त्यावरील एक दृष्य मध्यभागी घंटाघर



११ फेब्रुवारी १९७९ रोजी 'सेल्युलर जेल' ला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषीत करताना माजी पंतप्रधान श्री मोरारजी देसाई

प्रकरण १

# भौगोलिक स्थिती आदिवासींचा इतिहास आणि पहिली वसाहत

६१६
२३३०६
मू प्रवास
20/10/17

" जी भूमी क्रातिकारी वीराच्या चरणानी पवित्र बनली आहे, जेथे कित्येकांनी देशाच्या स्वातत्र्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे, असख्य बर्बर यातना सहन केल्या आहेत, अशा ह्या पवित्र भूमीला एके काळी गुन्हेगाराचे एकमेव निवासस्थान समजले जात असे आणि त्यावेळेपासून या अदमान द्वीपसमूहास ' काळे पाणी ' म्हणून सबोधिल्या जात असे परतु जसजसा काळ मागे पडतो तसतशी मानवाची भावना पण बदलली जाते आणि आज तर अदमान–निकोबार हे 'नदनवन' बनले आहे नव्हे, ते पूर्वीपासूनच आहे याची महती येथील निसर्गसौंदर्य प्रत्यक्ष बघितल्यावरच येते "

**भौगोलिक स्थिती–** बगालच्या उपसागरात हे महत्त्वाचे द्वीप दक्षिणोत्तर ६° आणि २४° डिग्री उत्तर अक्षाश व ९२° नि ९४° डिग्री पूर्व रेखांशा मध्ये पसरली आहेत भारताच्या नकाशात फक्त त्यांचे स्थान टिंबाटिंबानी दर्शविल्याचे दिसून येते त्याची एकूण लहान मोठी मिळून ३५२ सख्या आहे. (Islets व Rocks मिळून त्याची एकदर सख्या ५५६ आहे.) त्यापैकी फक्त १८५ द्वीपांनाच नावे दिलेली आहेत शिवाय फक्त ३७ द्वीपांवरच वस्ती आहे नारकोन्डम आणि रॅटलॅण्ड हे द्वीप ज्वालामुखीपासून निर्माण झाल्याची नोंद आहे इतरत्र द्वीपांवर घनदाट जगल आढळून येते एकदर ८,२९३ चौरस कि मिटर क्षेत्रफळ आहे

येथील हवामान उष्ण कटिबंधीय असून पावसाळ्यात हवेत आर्द्रता जास्त असते व पावसाळ्यानंतर आल्हादकारक असते येथील जास्तीत जास्त तापमान ३५ अंश डिग्री सेन्टीग्रेड असते प्रामुख्याने दोनच ऋतू जाणवतात पावसाळा नि उन्हाळा हिवाळा फारसा नसतोच जी थोडी फार थंडी पडते ती डिसेंबर–जानेवारीत (गरम कपड्याची गरज भासत नाही) उन्हाळा फेब्रुवारीच्या मध्यतूरी सुरू होतो आणि एप्रिलच्या शेवटी-शेवटी पावसाळा सुरू होतो पाऊस दोन्हीही मोसमी वाऱ्यापासून पडतो. दक्षिण पूर्व मोसमी वाऱ्यापासून एप्रिल ते आक्टोबर आणि उत्तर पश्चिम वाऱ्यापासून नोव्हेंबर–डिसेंबरपर्यंत पडतो पावसाची वार्षिक सरासरी १२० ते १२५ इंच असते

**द्वीपसमूहाची विभागणी**– अंदमान–निकोबार द्वीपसमूहाची एकूण दोन जिल्ह्यात विभागणी केली आहे– (१) अंदमान जिल्हा व (२) निकोबार जिल्हा अंदमान जिल्ह्याचे मुख्यालय पोर्ट–ब्लेअर तर निकोबार जिल्ह्याचे कार-निकोबार दोन जिल्हे मिळून एकंदर ७ तालुके आहेत संपूर्ण द्वीपसमूहाची लोकसंख्या ७१ च्या जनगणनेनुसार १,१५,१३३ आहे परंतु आज ती दीड लाख झाली आहे त्यापैकी तीन चतुर्थांश अंदमान जिल्ह्याची आहे, तर एक चतुर्थांश निकोबार जिल्ह्याची आहे द्वीपसमूहाची राजधानी पोर्ट–ब्लेअर आहे व तेच पूर्ण द्वीपसमूहात एक शहर आहे

कलकत्त्यापासून १,२५५ कि मिटर मद्रास बंदरापासून १,१९१ कि. मिटर तर विशाखापट्टनम् पासून १,१२६ कि मिटर अंतर आहे एकूण द्वीपाची लांबी ३१९ मैल असून रुंदी जास्तीत जास्त ३२ मैल आहे अंदमान द्वीपसमूह संपूर्ण डोंगराळ आणि उंच सखल असा आहे येथील डोंगर समुद्र-पातळी पासून १०० ते २,४०० फूट उंचीचे आहेत 'सॅण्डल पिक' ही टेकडी २,४०० फूट उंच तर 'माऊन्ट हेरियट' ही टेकडी १,१९६ फूट उंच आहे

विविध वृक्षराज आणि विविध रंगानी बहरलेली पाने, फुले, फळे नि वेली स्वागतासाठी तयार असतात गोलाकार तुरुंग, पाण्याचे धबधबे, मधूनच उसळणाऱ्या पाण्याच्या लाटा आणि त्यावरील नौकाविहार शिवाय जंगलाची सम्पदा समजली जाणारी उंच उंच पुष्पयुक्त झाडे पाहिली म्हणजे मन आकर्षित होते. 'हॅवलॉक' आणि 'निल' द्वीपाजवळ तर समुद्रातील

रंगी-बेरंगी कोरल्सचे दृश्य इतके मनोहारी दिसते की, फारच चमकणाऱ्या उन्हात तर ते आणखीच सुंदर दिसते पाण्यात बुडी मारल्यावरच वरील दृश्याचे अवलोकन करता येते त्याचप्रमाणे सूर्योदय नि सूर्यास्ताचे दृश्य तर मनाला मोहीत करून टाकल्याशिवाय राहत नाही, आणि म्हणूनच कधी कधी 'लॉर्ड मेयो' पोर्ट-ब्लेअर पासून जवळ आणि चॅथम द्वीपाच्याविरुद्ध बाजूला असलेल्या 'माऊंट हेरियट' ह्या उंच टेकडीवरून पोर्ट–ब्लेअर शहराचे, सूर्यास्ताचे तर कधी सूर्योदयाचे मनोहारी दृश्य बघत असत ते जेव्हा दिनांक ८–२–१८७२ रोजी असाच सूर्यास्ताचा देखावा बघून परतत होते, तेव्हा होपटाऊन ह्या ठिकाणी शेरअली नावाच्या पठाणाने त्यांचा जेट्टीवर (लहान बोटी समुद्र किनारी उभ्या करण्यासाठी बांधलेला प्लॅट-फॉर्म) खून केला

पूर्ण द्वीपसमूहात फक्त उत्तर अंदमानमध्येच एक 'कल्पौंग' नावाची नदी दिग्लीपूर ह्या गावाजवळून वाहते पावसाळ्यात तिला चांगलाच पूर येतो त्याचप्रमाणे निकोबार द्वीपसमूहातसुद्धा लहान लहान तीन नद्या वाहतात या द्वीपांचे तट अत्यंत वेडे वाकडे असल्यामुळे सुरक्षिततेची चांगलीच सोय झाली आहे येथील जमीन काळसर, भुरकट तर कुठे तांबडी-पिवळी पण आढळून येते संपूर्ण द्वीपसमूहात लहान मोठे ११ बंदरे (Harbours) आहेत परंतु फक्त पोर्ट–ब्लेअर येथील बंदरच सर्वात मोठे असून जास्त वापरात येते. (शिवाय जगातील सुरक्षिततेच्या दृष्टीने जेवढी काही नैसर्गिक बंदरे आहेत त्यापैकी निकोबार द्वीपसमूहातील 'नानकौरी' येथील नैसर्गिक बंदराचीसुद्धा त्यात गणती केल्या जाते )

पोर्ट–ब्लेअर बंदरात एकाच वेळी दोन तीन जहाजे लंगर टाकून थांबू शकतात आणि आसपास तर तीन, चार, पाच जहाजेसुद्धा लंगर टाकून थांबू शकतात जहाजे जेव्हा लंगर टाकून उभी असतात, विशेषत: रात्रीच्या वेळी, फारच छान दृश्य माणसास आकर्षून टाकते येथील जमिनीचा ७३ टक्के भाग जंगलाने व्यापलेला आहे काही ठिकाणी आता आता जंगल कापून तेथे वसाहत केली आहे जंगलात खूप मोठमोठे वृक्ष एकमेकास खेटून आणि उंच उंच वाढलेली आढळून येतात डॉ माटने, १७६ फूट गोलाई असलेले लाकूड आढळून आल्याचे नमूद केले आहे

**आदिवासींचा इतिहास–** हे अगदी निर्विवाद आहे की ही बेटे (द्वीप) अत्यंत प्राचीन आहेत संक्षिप्त विवरण प्तोलेमी आणि मार्कोपोलो यांनी चीनच्या प्रवासाला जाताना १२९० ला या द्वीपांना भेट दिली त्या वेळी उल्लेख केलेला आहे परंतु पुराव्यासह माहिती ९ व्या शताब्दीत अरबी प्रवाशांच्या प्रवासवर्णनावरून मिळते (अबूसैय्यद आणि सुलेमान ह्या प्रवाशाच्या) त्याचप्रमाणे सर रिचर्ड टेम्पल आणि आर एफ लुईसनेसुद्धा या द्वीपांच्या इतिहासाबद्दल विस्तृत लिहलेले आहे भारत–बर्मा आणि सुदूर (पूर्व) याच्या व्यापारमार्गावर हे द्वीप येत असल्यामुळे ह्या द्वीपाचा उल्लेख आपणास दुसऱ्या शताब्दीपासून मिळतो हा भाग सुरक्षित बंदर म्हणून उपयोगात आणत असल्यामुळे त्याविषयी माहिती ठेवत होते, हे अगदी उघड आहे

अलग अलग लोकाच्या मतानुसार ह्या द्वीपाना अलग अलग नावे दिली आहेत 'प्तोलेमी'ने यांचे नाव 'अगमाने' असे संबोधून चर्चा केली व याचप्रकारचे मिळते जुळते नाव बोध चिनी, बोध इस्तिग, मार्को पोलो, फ्रायर आदोरिक व निकोलोसोतो यानी ठेवले ते अनुक्रमे सातव्या, तेराव्या, चौदाव्या आणि पंधराव्या शताब्दीत सर रिचर्ड टेम्पल यांच्या जनगणना रिपोर्टानुसार मलयामध्ये ह्या द्वीपांना 'हडमान' म्हणत होते जपानी आणि चिनी 'येंग तो माँग' ह्यानी 'अंदमान' हा शब्दप्रयोग या द्वीपाच्या-बाबतीत वापरला ११ व्या शताब्दीमध्ये दक्षिण भारतात सापडलेल्या शिलालेखानुसार या द्वीपाना अपवित्र आणि तेथील त्या काळच्या रहिवाशाना नरभक्षी म्हणत होते परंतु याविषयीचा अद्याप कुठेच पुरावा सापडत नाही ७ व्या आणि १० व्या शताब्दीमधील चिनी लोकांच्या इतिहासानुसार येथील निवासी राक्षस होते परंतु ह्याचासुद्धा सबळ पुरावा सापडत नाही अशा प्रकारे ज्याच्या त्याच्या मतानुसार या द्वीपाचे नामान्तर बदलत गेले परंतु सर्व नावामध्ये काहीतरी साम्यता वाटत होती काही विद्वानाच्या मते ह्या द्वीपांना 'हडमान' म्हणून संबोधिले होते हन्डुमानचे नंतर 'अन्डुमान' आणि शेवटी 'अंदमान' अशी ही उत्पत्ती झाली परंतु यावरून हेच सिद्ध होते की, आजचे जे नाव आहे (अंदमान) ते काही नवीन नाही

आणि टॉलेमी यांनी केलेल्या वर्णनानुसार निकोबार द्वीपावर दोन

हजार वर्षांपासून तरी ' निकोबारी ' असावेत या द्वीपाचा उल्लेख चिनी प्रवासी ' आंटेग ' याची इ स ६१२ मध्ये केला आहे इ स १०५० ला ताजोर येथे सापडलेल्या शिलालेखात या द्वीपाना ' नेक्कवरम् ' असे सबोधण्यात आले आहे १२९२ मध्ये ' मार्कोपोलोनी ' यानी ' नेकूवरम् ' म्हणून उल्लेख केला शेवटी पोर्तुगिजानी १५२० मध्ये त्याचे ' निकोबार ' असे नाव रूढ केले तेव्हापासून त्यास निकोबार म्हणून ओळखतात

इ स १७८८ मध्ये ईस्ट इडिया कपनीने समुद्राद्वारे होणाऱ्या डाक्यापासून आणि दुर्घटनाग्रस्त झालेल्या नाविकाच्या सोईसाठी काहीतरी सुरक्षा असावी म्हणून ' लॉर्ड कार्नवालिस ' ने लेफ्टनन्ट आर्चिबाल्ड ब्लेअर आणि लेफ्टनन्ट कोलब्रुक यांना सर्वेक्षणासाठी नियुक्त केले व त्यांना याविषयीची माहिती गोळा करावयास सागितली की, ' अदमान द्वीपावर कोठे व कशा तऱ्हेने वसाहत करता येईल का ? व ते कितपत शक्य आहे ? ' या दोन्ही व्यक्ती समुद्री सर्वेक्षणाच्या बाबतीत अत्यत अनुभवी होत्या आणि म्हणूनच त्याची या कामासाठी निवड करण्यात आली होती या दोन व्यक्तीनी अत्यत बारकाईने सर्वतोपरी निरीक्षण करून आपला रिपोर्ट १७८९ मध्ये लॉर्ड कार्नवालिसला सादर केला त्या दोघाची त्यावेळेस कुशलतापूर्वक सर्वेक्षण केल्याबद्दल तारीफ केली होती शेवटी त्याच्या रिपोर्टानुसार दक्षिण अदमानमध्ये वसाहत स्थापन करण्याचे ठरले आणि लेफ्टनन्ट आर्चिबाल्डलाच प्रथम वस्ती वसविण्यासाठी पाठविण्यात आले सप्टेंबर १७८९ मध्ये लेफ्ट ब्लेअर कलकत्त्याहून सोबत काही सामान, शिपाई, मजदूर वगैरे घेऊन अदमानसाठी रवाना झाला शिवाय डिसेंबर १७८९ ला लेफ्ट कोलब्रुकची पण एक टीम आली व त्यानी सध्या जेथे ' सरकारी चॅथम सॉ मिल ' आहे त्या ठिकाणी जगलाची साफसफाई करून पहिली वसाहत स्थापन केली. (चॅथम सॉ मिल हा हिंदुस्थानातील सर्वात मोठा आणि आशीय खडातील मोठ्यापैकी एक आहे ) याविषयी नोव्हेंबर १७९० साली कलकत्त्याहून ' मथली-रजिस्टर ' मध्ये प्रकाशित झालेल्या विवरणावरून असे दिसून येते की, " पोर्तुगालीयाची पेगूच्या आसपास वस्ती होती आणि त्या वेळेस त्यांची दोन जहाजे अपघातग्रस्त झाली होती त्या जहाजावर ३०० दास (गुलाम) व्यक्ती होत्या जहाज अपघातग्रस्त झाल्यामुळे तो

३०० व्यक्तींचा समुदाय या द्वीपावर विखुरल्या गेला, आणि त्यांची जी सन्तान आहेत तीच सन्तान अंदमानची आदिवासी म्हणून समजतात"

वर निर्देशित जी पहिली वसाहत १७८९ मध्ये स्थापन केली होती, त्या वेळी त्या वसाहतीमध्ये २७० कैदी, ५५० स्वतंत्र बंगाली सेट्लर आणि काही प्रमाणात कर्मचारीवर्ग पण होता परंतु इ स ८ फेब्रुवारी १७९६ रोजी तेथून वसाहत हटविण्याचे ठरले तेथील दूषित हवामान आणि अनगणित रोगांच्या वातावरणामुळे शेवटी तेथील वसाहत मे १७९६ ला हलविली त्या वेळी बरीचशी मानहानी पण झाली होती वस्ती हलविल्यानंतर उरलेले कैदी पैनांगला पाठविले बंगाली सेट्लर बंगालला परत केले. त्यानंतर जवळपास साठ वर्षे ही बेटे (द्वीप) वाळीतच टाकल्यासारखी झाली होती परंतु तरीही इंग्रजांनी दोन जहाजे ह्या क्षेत्रात सतत माहिती गोळा करावयास तैनात ठेवली होती त्यानंतर मे १८५७ मध्ये संपूर्ण भारतात इंग्रजशासनाविरुद्ध पहिला उठाव झाला व त्या वेळेस युद्धबंदी केलेल्या स्वतंत्र सेनानींना बंदी करून ठेवणे भाग पडू लागले देशातील जनता अत्यंत संतप्त झाली होती कित्येकांना मृत्युदंडाची शिक्षा झाली काही त्यापासूनही बचावले त्या वेळेस इंग्रज मृत्युदंडापासून बचावलेल्यांना हद्दपार करण्याचा विचार करू लागले व लगेच त्यांनी अंदमानसारख्या एकांतात असलेल्या ठिकाणी कैद्यांना पाठविता येणार नाही का ? ह्याविषयीचा अभ्यास करण्यासाठी 'अंदमान कमेटी'ची दिनांक २० नोव्हेंबर १८५७ ला स्थापना केली त्या कमेटीत डॉ एफ जे माउट, जी आर प्लेकेअर व बंगाल प्रांताचा स्वास्थ्य खात्याचा प्रमुख असे तीन लोक होते

त्या कमेटीस असा आदेश देण्यात आला की, "बंदी करून अंदमानला पाठविल्यास तेथे त्यांना ठेवण्यालायक कोणती जागा योग्य राहील ?" हे शोधून सविस्तर रिपोर्ट द्यावा

बंदी अंदमानला पाठविण्यामागील इंग्रजाचा उद्देश हा होता की, "विद्रोही बंदी लोकांना अशा ठिकाणी डांबून ठेवावे की, तेथून त्यांना भारतातील जनतेशी अजिबात संबंध साधता येणार नाही शिवाय त्यांना तेथे योग्य तो धडा पण मिळेल आणि कठोर शिक्षेचा अनुभवसुद्धा येईल. म्हणजेच काळ्यापाण्याची सजा भोगावी लागेल" व म्हणूनच तेव्हापासून

ह्या द्वीपाना ' काळेपाणी ' हा शब्दप्रयोग करण्यात येऊ लागला. त्यातल्या त्यात इग्रजांनीसुद्धा ह्या निसर्गरम्य प्रदेशाचे वर्णन भारतात उलट-सुलट प्रकाशित करून चुकीचा गैरसमज करून टाकला आणि म्हणूनच आजसुद्धा ह्या द्वीपाना ' काळेपाणी ' म्हणून ओळखतात शिवाय वेगळ्या नजरेने बघतात परतु सध्या परिस्थिती फारच वेगळी आहे (याविषयी पुढील प्रकरणात वाचावयास मिळेलच )

तर अदमान कमेटीने आपला रिपोर्ट १ जानेवारी १८५८ रोजी सरकारला सादर केला व त्यानी ' चॅथम ' हे ठिकाण कैद्याना ठेवण्यालायक असल्याचे सुचविले मुख्य कारण म्हणजे तेथील पाणी पिण्यायोग्य होते वसाहतीला लागणाऱ्या विटासाठी माती होती इमारतीसाठी दगड होते आणि म्हणूनच वसाहत करण्यास हरकत नसल्याचे सुचविण्यात आले नतर त्या कमेटीचा रिपोर्ट १५ जानेवारी १८५८ ला स्वीकारला व सप्टेंबर १७८९ साली जेथे प्रथम वसाहत केली होती तेच नेमके ठिकाण दुसऱ्यादा निवडले परतु त्याचे त्या वेळी नामान्तर केले आणि तेथे प्रथम वसाहत वसविण्याचा मान ज्या लेफ्टनन्ट ब्लेअरने मिळविला त्याच्या स्मरणार्थ म्हणून पोर्ट-ब्लेअर हे नाव ठेवले

त्यानतर राजकीय बदी, आजन्म कारावास झालेले बदी, डाकू, लुटेरे याना येथे पाठविण्यास आरभ झाला ४ मार्च १८५८ ला डॉ जे पी वाकर याची एक अनुभवी जेलर म्हणून नियुक्ती केली त्याच्या मदतीला चार युरोपियन आधिकारी, दोन डॉक्टर्स, ५० गार्डस्, एक नेवी अधिकारी आणि ७०० कैदी पाठवून बदिवासाचा (Peral Settlement) प्रारभ झाला.

प्रथम डॉक्टर वाकरला दोन गोष्टीची अडचण भासू लागली. (१) कैदी पळून जाऊ लागले (खुले असल्यामुळे) आणि (२) काही मरू लागले तीन महिन्यांत ६४ कैदी वारले १४० कैदी पळून गेले पळून गेल्यांपैकी ८८ कैद्याना पकडले मध्यतरी एकाने आत्महत्या केली व बाकी ८७ कैद्यांना डॉ वाकरने फाशीवर चढविले

त्यानतर दिनाक १० ऑगस्ट १८५८ रोजी त्या बदिशाळेचे दालन कैद्यासाठी मोकळे करण्यात आले. सुरुवातीस ह्या बदी लोकावर अन्दमानी आदिवासी लोकाचे हल्ले झाले. पहिला हल्ला ६ एप्रिल १८५९ ला झाला

त्या वेळी त्यामध्ये २४८ कैदी हॅडो या ठिकाणी काम करीत होते (सध्या जेथे भव्य नि नैसर्गिक बदर आहे ) त्याच वेळी जवळपास २०० आदिवासीनी तीर-कमानीच्या साहाय्याने हल्ला केला त्यात तीन कैदी मारल्या गेले एक-जण जखमी होऊन नतर मरण पावला

दुसरा पूर्व नियोजित हल्ला १४ एप्रिल १८५९ रोजी झाला त्या वेळी १,५०० आदिम जन-जातीच्या लोकांनी कुऱ्हाडी, चाकू, तीर-कमान यासह अचानकपणे ४४६ कैद्यावर हल्ला केला. त्या वेळी ३ कैदी जागीच ठार झाले व कित्येक जखमी झाले आणि काही पळून गेले, तर काही पळून नाविक दलाच्या सरक्षणासाठी उभ्या असलेल्या बोटीत गेले. नतर बोटीवरून आदि-वासीवर प्रति हल्ला केला. नतर आदिवासी मात्र जगलात पळाले

नतर तिसरा पूर्व नियोजित हल्ला १७ मे १८५९ ला केला त्यास ' अबर्डीनची लढाई ' म्हणून ओळखतात त्या वेळी सुदैवाने जास्त प्राणहानी झाली नाही. कारण दुधनाथ तिवारी नावाचा कैदी हा दिनाक २३ एप्रिल १८५८ ला रॉसद्वीपवरून पळून गेला होता. त्या वेळी इतरही ९० कैदी त्याच्याबरोबर पळाले होते इतर कैदी आदिवासीच्या चपाट्यात सापडून मरण पावले. तर काही म्हणे अन्नावाचून मेले. तर ह्या तिवारीलासुद्धा ह्या आदिवासींनी दोनदा घायाळ केले परतु नतर मात्र अत्यत माणुसकीने वागविले तो त्याच्यासोबत वर्षभर राहिला एवढेच नाही तर त्यांचा विश्वास सपादन करण्यासाठी त्यांच्या मुलीशी लग्नसुद्धा केले त्याच काळात आदिवासी लोकांत हल्ला करण्याची कुजबूज सुरू होती हे दुधनाथ तिवारीने ओळखले १६ मे रोजी अगदी सकाळीच (रात्रीचे २ वाजता) अबर्डीन-स्थित कैदी वसाहतीजवळ येऊन झोपले असता, हा दुधनाथ तिवारी त्याची नजर चुकवून पळून आला व डॉ जे पी वाकरला हल्ल्यापासून वाचण्यासाठी तयारी करा म्हणून सूचना दिली व अशा तऱ्हेने सभावित मानहानी टळली

○ ○

प्रकरण २

# काळ्या पाण्याच्या शिक्षेचा प्रारंभ आणि जेलमधील शिक्षापद्धती

इंग्रजांच्या काळात ज्याना मृत्युदंडाची, आजीवन कारावासाची सजा झाली त्याना अंदमानच्या जेलमध्ये पाठवीत असत. हिन्दुस्थानातील त्या कैद्यांच्या नातेवाइकांना तो मेल्यासारखाच वाटत असे कारण २०–२५ वर्षे खडतर कारावासाची शिक्षा भोगल्यानंतर तो परत येईलच याविषयी शंका असावयाची आणि म्हणूनच त्यांच्यासाठी तो मेल्यातच जमा होत असे त्याच-प्रमाणे १० मे १८५७ रोजी सुरू झालेल्या स्वातंत्र्ययुद्धात भाग घेणाऱ्यांना-सुद्धा काळ्या पाण्याच्या सजेवर पाठवीत असत वास्तविक 'काळेपाणी' हा शब्दप्रयोग इंग्रजानी एवढा भारतीय लोकांच्या मनावर बिंबवून दिला होता की फारच व म्हणूनच अजूनही तो पुसल्या गेला नाही वास्तविक पाहता भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर येथे केलेली प्रगती बघितली म्हणजे आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही प्रत्यक्ष येथील निसर्गसौंदर्य बघितल्यावर, येथील झपाट्याने होत असलेली प्रगती पाहिल्यावर, जर का कोणी 'काळेपाणी' हा शब्दप्रयोग केला तर खरोखरच आपण येथील प्रगतीचा, निसर्गसौंदर्याचा धडधडीत अपमानच करतो असेच म्हणावे लागेल.

'काळे पाणी' ही सजा दुसरे तिसरे काहीच नाही ना येथील वाता-वरण काळे आहे ना येथील पाणी काळे आहे 'काळे पाणी' केवळ याचमुळे "मुख्य भूमीपासून म्हणजेच हिंदुस्थानापासून शेकडो मैल दूर राहून क्रान्तिकारी आपले क्रांतिकारक विचार भारतीय जनतेपर्यंत पोचवू शकत

नव्हते आणि ते पोहचविता येऊ नये असाच इंग्रजाचा प्लॅन होता कुठल्याही तऱ्हेने मुख्य भूमीशी संपर्क साधता येऊ नये आजन्म कारावासाची शिक्षा भोगत असताना एकांतात जीवन जगावयास भाग पाडणे, त्यासोबत बर्बर यातना सहन करावयास लावणे म्हणजेच काळ्या पाण्याची सजा होय."

त्या काळात अंदमानहून मुख्य भूमीशी सम्बन्ध साधता येणे शक्य नव्हते, कारण जहाजवाहतूक फार म्हणजे फारच विरळ होती चार–पाच महिन्यांतून एखादे जहाज जात-येत असे तसेच विमानवाहतूक तर मुळीच नव्हती शिवाय खाण्यापिण्याची फारच आबाळ होती अशा स्थितीत कसे काय क्रांतिवीर आपले विचार हिंदुस्थानात पोहचविणार होते ? व कसे इंग्रजांविरुद्ध बंड पुकारू शकणार होते ? आणि म्हणूनच त्यांना इथे बंदी करून ठेवत राजकीय कैद्यांमध्ये अनेक प्रकांड विद्वान, निर्मल चरित्र आणि सुदृढ विचार धारण करणारे कित्येक महापुरुष अन्दमानच्या जेलमध्ये होते. त्यांच्या त्या पवित्र त्यागामुळे ही धरती धन्य झाली आहे विविध प्रांतातून राजकीय लोकांना अंदमानला हद्दपारीच्या (काळ्या पाण्याच्या Transportation For Life) सजेवर पाठवीत असत सर्वात जास्त राजकीय बंदी पश्चिम बंगालमधून पाठविण्यात आले होते त्यांची एकंदर संख्या २२५ होती त्यानंतर पंजाबचे ६७ राजकीय बंदी होते तदनंतर तिसरा नंबर उत्तर प्रदेशाचा होता व बंद्यांची संख्या २० होती त्यानंतर मग बिहार, नंतर आसाम आणि नंतर महाराष्ट्राचा नंबर होता महाराष्ट्रातून तिघानाच नासिक षड्यन्त्राच्या केसमध्ये शिक्षा ठोठावन काळ्या पाण्याच्या सजेवर पाठविले होते ते वीर होते–

(१) स्वा वीर वि. दा सावरकर ह्यांना जुलै १९११ ते २ मे १९२१ पर्यंत ठेवले होते.

(२) गणेश दामोदर उपाख्य बाबाराव सावरकर (स्वातंत्र्य वीर वि दा सावरकरांचे थोरले बंधू) ह्यांना पण १९११ ते १९२१ पर्यंत ठेवले होते

(३) वामनराव नारायणराव जोशी ह्यांना १९११ ते १९१८ पर्यंत ठेवले होते (वर निर्देशित राजकीय बंद्यांची संख्या इतरत्र मिळालेल्या रेकॉर्डवरून दिलेली आहे कारण इंग्रजांच्या काळातील मूळ रेकॉर्ड जपान्यांनी

१९४२ ते १९४५ च्या काळात बहुतशी नष्ट करून टाकले आहे )

वीर वि दा सावरकराना जेव्हा जुलै १९११ त येथे पाठविले होते, त्या वेळी अदमानातील अधीक्षकास त्याच्यावर खास नजर ठेवावयास सागितली होती ते पळून जातील अशी अधिकाऱ्यांना भीती होती कारण ते लंडनहून मुबईस येताना ' मार्सेलिया जवळ जहाजातून उडी टाकून खाडी पोहून पळाले होते ना, म्हणून वीर वि दा सावरकरांचा कन्व्हीक्ट नबर होता ३२,७७८ व त्याना ' डी ' (म्हणजे डेन्जरस) श्रेणीत ठेवले होते २ मे १९२१ ला ' महाराजा ' जहाजाने परत पाठविले

**जेलपद्धती**– अदमानमध्ये इग्रजांच्या काळातील जेलपद्धती अत्यत विचित्र होती स्वाधीनतासग्रामात भाग घेतलेल्याना चागलाच धडा शिकविण्याच्या दृष्टीने इग्रजानी एका महाक्रूर अशा सुपरिन्टेन्डेंटची नियुक्ती केली होती त्याचे नाव होते डॉ जे पी वाकर त्याने एकाच दिवशी ८७ कैद्याना फाशीवर लटकविले होते (याविषयी पूर्वी उल्लेख केलाच आहे ) ही त्याच्या निकद्रीपणाची प्रचीती होती या कठोर शिक्षाप्रणालीमुळे हिन्दुस्थानातून कैदी यावयास कचरत होते परतु त्या महाक्रूर अधीक्षकाचा कार्यकाळ मार्च १८५८ ते सप्टेंबर १८५९ पर्यंत होता त्यानतर कॅप्टन हाउग्टन यांनी आक्टोबर १८५९ ते मे १८६२ पर्यंत काम बघितले

त्या वेळेस प्रत्येक कैद्यास प्रथम ६ महिने सतत कोठडीत बद ठेवत. दीड वर्षांचा काळ पार पडल्यावर त्यास जेलच्या व्हराडचात फिरावयास परवानगी राहत असे आठ वर्षांची शिक्षा भोगल्यावर कैदी बरॅकमध्ये मोकळा ठेवत असत. त्यानतर १० वर्षे झाल्यावर त्यास स्वावलबी श्रेणी देत असत तदनतर २०–२५ वर्षे सजा भोगल्यानतर त्याना शेतीकरिता जमीन, घराकरिता जमीन, शेतीची अवजारे व अन्नधान्य देऊन मोकळे सोडत नतर ते लोक खेड्यानुसार वसाहत करून राहत ज्याना ज्याना त्या वेळी स्वावलबी श्रेणी मिळाली होती अशा कैद्यांची सख्या १८९४–९५ साली २,५८० होती त्या काळी अधीक्षकास कैद्याची वागणूक बघून सजा कमी जास्त करण्याचा अधिकार असे स्वभावत अपराधी मनोवृत्तीच्या कैद्याना 'वाईवर' नावाच्या द्वीपावर ठेवत असत तेथे त्यांच्यासाठी खास दडाची सोय होती त्या शिक्षेला 'चेनगँग' म्हणून ओळखल्या जात होते

ह्या ' चेनगँग ' पद्धतीमध्ये कित्येक कैद्याना एका ओळीत उभे करून त्याच्या माड्यांना लोखंडी कड्यांनी आवळून घेत आणि त्याच स्थितीत त्यांना तीन-तीन, चार-चार दिवस ठेवत त्यामुळे त्याना बरोबर झोपता येत नसे. माड्यांना कळा लागत आणि असह्य वेदना होत. शिवाय कोडे मारण्याची पण व्यवस्था होती साधा कैदी–अधिकारीसुद्धा कुणाच्याही अनुमतीशिवाय सहा कोडे मारू शकत होता तदनतर अधिकाऱ्याच्याही श्रेणीनुसार कोडे मारण्याची सख्या वाढत असे पोर्ट-ब्लेअरच्या ' सेल्युलर जेल ' मध्येसुद्धा कोडे मारण्याची भरपूर व्यवस्था होती कधी कधी कोठडीत बद असलेल्या कैद्याना व्हराड्यात बाहेर काढून समोर असलेल्या गजांना हातकडी अडकवून कैद्याचे हात उच करून ठेवत अशा स्थितीत त्याला कित्येक घंटे ठेवत होते वरील देण्यात येणारी शिक्षा नवीन येणाऱ्या कैद्यास मुद्दाम प्रत्यक्ष दाखवीत असत उद्देश हा की, ' त्याने पुढे चालून चांगले वागावे '

कैद्याना येथे ओळखण्यासाठी एक विशिष्ट पद्धत अमलात आणत एका लाकडाच्या पाटीवर (इचभर रुद आणि जवळपास सहा इच लाब) त्याचा कैदीनबर, सजा झाल्याची तारीख, ती कोणत्या अपराधाखाली झाली ? कोणत्या गँगमधला आहे, ह्याविषयीचे विवरण असावयाचे व ती पाटी त्या कैद्याच्या गळ्यात लोखडी साखळीने अडकविली जात असे. अपराध्यामध्ये स्त्रियाची सख्या पण होती त्यांना बहुवशी नवऱ्याची हत्या, प्रेमिकाची हत्या, सावत्र मुलाची हत्या किंवा परिवारातील इतर कोणत्या तरी व्यक्तीची हत्या करण्याबद्दल शिक्षा होत होती लहान सहान चोरी किंवा साधारण अपराध केल्याबद्दल काळ्या पाण्याची सजा देत असत

बदी-वसाहतीमधील पुरुष कैदी आणि स्त्री कैदी याच्यामध्ये दहा दहा वर्षांची सजा भोगल्यानतर आणि स्वावलबी दर्जा प्राप्त झाला असल्यास, जर त्या कैद्याने लग्न करावयाची इच्छा व्यक्त केली तर स्त्रियाच्या जेल-मधून लग्नायोग्य कैदी-स्त्रियाना बोलावून आणत आणि सेल्युलर जेल-मधीलच एका खोलीत हा वर–वधू दाखविण्याचा विधी उरकून घेत असत. त्यानतर त्या दोघाच्या समतीनुसार लग्न लावून देत व नतर ते स्थायिक होत अशा स्वावलबन प्राप्त आणि लग्न झालेल्यांची ३४ ठिकाणी खेड्या-

प्रमाणे वस्ती बनली होती. त्यांच्या मुलां–मुलीस फुकट शिक्षण देत असत. काही अशी सुद्धा उदाहरणे घडली, काही कैद्यानी जेलमधील स्त्रियाशी लग्न केले, आणि मुख्य भूमीस परतल्यावर त्यांना सोडून दिले

इ स १९२१ मध्ये कैद्याची एकूण सख्या ११,५१२ होती त्यापैकी सजा समाप्त झाल्यावर काहीना परत मुख्य भूमीस जावयास परवानगी दिली, तर काहीना अंदमानमध्येच स्वतत्र व्यवसाय, शेती, नोकरी करण्यास परवानगी मिळाली त्यांपैकी बहुवशी येथेच कायमचे स्थायिक झाले आणि म्हणूनच आज येथील हजारोंची सख्या कैद्याच्या परिवारातील आढळून येते व त्याना 'लोकल' म्हणून बऱ्याच सवलतीचा फायदा मिळतो उदा नोकरीत, धद्यात, शिक्षणक्षेत्रात वगैरे

सेल्युलर जेल–पोर्ट-ब्लेअरचा भव्य 'सेल्युलर जेल' बांधण्यासाठी परवानगी सरकारने दिनाक १३ सप्टें १८९३ ला दिली त्याच्या बाध-कामासाठी अदाजे खर्च ५,१७,३५२ रुपये धरला होता परतु रोख खर्च ९५,८८१ रुपये झाला त्या बाधकामाचे इन्‌जार्ज श्री एम सी. क्युईलेन हे होते. हा जेल १८९६ ते १९०६ या दहा वर्षांच्या काळात बांधून पूर्ण केला त्याच्या बाधकामासाठी रगून (ब्रह्मा) वरून विटा आणल्या गेल्या होत्या

हा जेल समुद्रकिनारी अत्यत कुशलतापूर्वक बाधला आहे हा जेल सपूर्ण आशिया खडात एक आगळयाच प्रकारचा आहे. जेलची तीन मजली व सात बाजू (विंग) असलेली भव्य इमारत होती सर्व विंग मिळून ७०० सेल्स (कोठड्या) होत्या त्यामध्ये ८०० कैद्यांना ठेवण्याची सोय होती सात विंगच्या अगदी मध्यभागी सेन्ट्रल टॉवर आहे (१९४४ च्या भूकपामुळे मूळ टॉवर नष्ट झाले व नतर बाधलेले टॉवर सध्या अस्तित्वात आहे) त्या टॉवरवरून एक पहारेकरी सपूर्ण जेलवर देखरेख करू शकत होता व तो सारखा वर खाली, वर खाली जात असे आणि त्याला लगेच वार्डर लोक रिपोर्ट देत असत इतर विंगच्या प्रत्येक मजल्यावर एक एक वार्डर असा-वयाचा व तो तीन तास पहारा करायचा अशा तऱ्हेने पहिले २१ वार्डर दुसऱ्याना पहाऱ्याकरिता उठवत असत नतर तिसऱ्या बॅचला तदनतर चवथ्या बॅचला उठवत असे मिळून १ दिवसात ८४ वार्डर आळीपाळीने पहारा करीत.

जेलचे दुसरे वैशिष्ट्य असे की, एका विंगमधील कैद्यास दुसऱ्या विंगमधील काहीच दिसत नव्हते तिसरे वैशिष्ट्य असे की, एका जरी मजल्यावर काही गडबड झाली तर त्या मजल्याचे दार बंद करून घेतल्यावर संभावित धोका टाळता येत असे व त्यामुळे तो मजला एकदम अलग केल्या जात असे त्यामुळे काही जरी उपद्रव झाला तरी दुसऱ्या कुठल्याच मजल्यावर त्याचा परिणाम होत नसे कोठडीच्या दरवाज्याला जबरदस्त असा लोखंडी दरवाजा असून दार फारच अरुंद आहे कुलूप लावण्याची व्यवस्थासुद्धा भिंतीतून हात पुरणार नाही एवढ्या अंतरावर होती वरच्या बाजूस येण्यासाठी एक छोटासा झरोका आहे सात विंगपैकी दोन विंग जपान्यांनी पाडल्या व त्या विटांचा उपयोग ' समुद्रकिनारी संरक्षणासाठी ' बिल बॉक्स ' बांधण्यासाठी केला त्यानंतर दोन विंग स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पाडून तेथे सध्याचे जी बी पंत हॉस्पीटल बांधले परंतु नंतर मात्र जेल पाडण्याच्या कामात स्वातंत्र्यसैनिकांनी आक्षेप घेतला आणि त्यास सुरक्षित ठेवून राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करावे अशी मागणी केली या आशयाचा एक प्रश्न दि ३० ऑगस्ट १९७८ रोजी लोकसभेत विचारला होता त्या वेळेस सरकारतर्फे असे सांगण्यात आले की, " नोव्हेंबर १९७१ मध्येच ह्या भकास कोठड्या सुरक्षित ठेवून त्यास राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर करावे व तसा निर्णय पण घेण्यात आला आहे ' परंतु प्रत्यक्ष " राष्ट्रीय स्मारक " म्हणून घोषित करून ते राष्ट्रास अर्पण केले ११ फेब्रुवारी १९७९ रोजी. माजी पंतप्रधान श्री मोरारजी देसाई यांनी जेलच्या समोरील भागात संग्राहालय नि वाचनालय ठेवले आहे त्यात एका बाजूला स्वातंत्र्य सैनिकांचे उपलब्ध असलेले २०८ फोटो लावले आहेत शिवाय थोडक्यात संबधित केसमधील विवरण दिलेले आहे आणि दुसऱ्या बाजूस चेन फिटर, बार फिटर, क्रास बार फिटर ह्या बेड्यांच्या वेगवेगळ्या शिक्षेच्या प्रकारचे मॉडेलसद्वारा प्रत्यक्ष दर्शन घडविलेले आहे

शिवाय कैद्यांना देण्यात येणारी भांडी, पोषाख, गळ्यात अडकविण्याची पट्टी, झोपण्यासाठी उपयोगात आणणारे बेडींग, तेलघाणीचे मॉडेल, फटके मारण्यासाठी उपयोगात आणण्यात येणारा स्टण्ड, फटके मारतानाची पेंटीग, दोर बनविण्याची मशीन, नारळाच्या काथ्या कुटण्याची मोगरी

सेल्युलर जेलचे मॉडेल वगैरे वस्तू ठेवल्या आहेत

सध्या ' सेल्युलर जेल ' मधील सेन्ट्रल टॉवरच्या तळमजल्यावर जेल अधीक्षकाचे कार्यालय आहे शिवाय नबर एक विगचा जिल्हा कारागृह म्हणून वापर करण्यात येतो लवकरच जिल्हा कारागृह इतरत्र हटविण्याचा इरादा आहे नव्हे, तशी सरकारकडून मजुरी मिळाली आहे नवीन जेल प्राक्तरापूर येथे बांधण्याची तात्त्विक मान्यता पण मिळाली आहे सेन्ट्रल टॉवरच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्याच्या सभोवार " एक्स अदमान पोलिटिकल प्रिझनर्स फैटरनिटी सर्कल, कलकत्ता ' ह्या सघटनेच्या वतीने ज्या ज्या वीरानी आपले प्राण देशाकरिता खर्ची घातले, ज्यानी येथे बर्बर यातना, अत्याचार सहन केले, त्याची नावे तीस सगमरवरी दगडांवर लिहून ते भितीत बसविलेले आहेत (ही नावे जपान्यानी रेकॉर्ड नष्ट करून टाकल्यावर इतरत्र मिळालेल्या पुराव्याच्या आधारे लिहिली आहेत ) सध्या जेलच्या ७ विगपैकी फक्त तीनच शिल्लक आहेत त्यापैकी एकीत जिल्हा कारागृह दुसरी डिसेंबर ७८ पर्यंत बॅचलर मेस म्हणून उपयोगात आणत होते परतु राष्ट्रीय स्मारक होणार म्हणून खाली करवून घेतली आणि सात नबरची विग पहिल्यापासूनच पर्यटकांसाठी खुली ठेवली आहे

**यातनापद्धती–** इग्रजांच्या काळात कैदी पळून जाण्याचा विचार करीत काही पळाले आणि जीव गमावून बसले नतर नतर त्याना आदिवासी जमातीकडून हल्ला होण्याची, शिवाय पकडल्या गेल्यावर भयकर दडाची सजा होईल या भीतीमुळे ते तसे करीत नसत आणि जरी पळून गेले तरी जगलात राहणे व समुद्रपार करून जाणे अशक्य कोटीतील गोष्ट होती

जेलमध्ये तेव्हा कैद्यांना ९ घटे काम करावे लागत असे प्रत्येकास कामाची वाटणी करून दिल्या जात होती ती याप्रमाणे (१) माती खोदणे ६० ते १०० घनफूट एका व्यक्तीस

(२) सडकेची दुरुस्ती करणे– ७० ते ७२ घनफूट एका व्यक्तीस

(३) दगड फोडणे– १२ घनफूट, दहा कैद्याना

(४) बाबूची चटई बनविणे– १०० घनफूट, दहा कैद्याना

याशिवाय लाकूड फोडणे, नारळ एकत्र करणे, समुद्रातील कोरल्स, शंख, शिपले एकत्र करणे, चुना तयार करणे, नारळापासून खोबरे काढणे,

नारळाच्या काथ्यापासून दोर बनविणे, सीसल (रामबास) ह्या झाडाची ८०-९० पाने कुटून त्यापासून चार पौंड रस काढावयास लावणे (जर का त्या रसाचा एखादा थेंब शरीरावर पडला तर तेथे सारखी खाज सुटत असे व शेवटी त्या ठिकाणी व्रण पडत असे ) वगैरे कठीण कामे करावी लागत

**तेलघाणीची शिक्षा–** इतर शिक्षाव्यतिरिक्त अत्यंत भयानक दंड म्हणजे ' तेलघाणी ' (कोलू) चालविणे त्या घाणीत नारळाचे तुकडे टाकत असत आणि कैद्याला समोरील दांड्यास बैलासारखे जुपत त्या वेळी वयाचा, प्रकृतीचा विचार अजिबात करीत नव्हते प्रकृती ठीक नसतानासुद्धा डॉक्टर त्यास कामास ' फिट् ' म्हणून घोषित करीत कितीही तंदुरुस्त कैदी असला तरी तो तेलघाणीच्या फक्त २० चकरातच थकून जात असे १५ ते २० वर्षे वयाचे क्रान्तिकारी नवयुवक, त्यांना कठोर मेहनत म्हणजे काय ? काहीही कल्पना नव्हती अशांना अगदी निर्दयपणे त्या तेलघाणीला जुपत होते रोज सकाळी ६ ते १० पर्यंत हे काम करून घेत घाणी ओढल्यामुळे तहान फार लागत असे परंतु तरीही त्यास सुट्टी मिळत नसे आणि पाणी मागितले की त्याच्या पाठीवर दंडे पडत बंदी एखादे वेळेस बेहोशसुद्धा पडत असे ठराविक काम पूर्ण न झाल्यास त्याला खूप मार दिला जात असे मारताना त्याचा ओरडण्याचा आवाज पूर्ण जेलमध्ये कैद्यांना ऐकावयास मिळत असे तो ऐकून इतर बंदी भावनाविवश होत विशेषत जेवणाच्या वेळेस तर ही शिक्षा मुद्दामच देत परिणामस्वरूप इतर बंदी जेवण सोडून देत परंतु त्यानापण नंतर जेवण सोडल्याबद्दल शिक्षा भोगावी लागत असे

तेलघाणीच्या शिक्षेत त्या कैद्यास ३० (तीस) पौंड तेल काढणे भाग होते परंतु ते काढणे अत्यंत कठीण होते सायंकाळी ५ वाजता जेलर ' बारी ' येऊन कामाची पाहणी करावयाचा काम पूर्ण न झाल्याचे पाहून त्या कैद्यास दुसरी शिक्षा सुनावीत असे त्याचे जेवण बंद करून रात्री ९ वाजेपर्यंत घाणी चालवावयास सांगून निघून जात असे या भयंकर शिक्षेपासून कैदी बचाव करून घेण्यासाठी काहीतरी जडीबुटी खाऊन १०४ डिग्रीपर्यंत ताप वाढून घेत रक्ताच्या उलट्या करीत आणि त्या शिक्षेपासून सुटकारा करून घेत होते या कडक मेहनती बद्दलत्यांना प्रथम रोज एक आणा नऊ पैसे मिळत

नंतर त्यात सर रॉबर्ट नेपोलियन याच्या १८६३ च्या शिफारशीनुसार

वाढ करून तीन आणे, अडीच आणे व दोन आणे कैद्याच्या फर्स्ट क्लास, सेकंड क्लास नि थर्ड क्लास वर्गवारीनुसार वाढ केली डोके दुखी, पोट दुखणे वगैरे आजार, आजार म्हणून मानत नसत जेलर बारीचे म्हणणे होते की, " कोण आजारी आहे आणि कोण नाही, याविषयीचा निकाल मी देईन डॉक्टर नाही "

एकदा वीर सावरकराचे थोरले बधू गणेश उपाख्य बाबाराव सावरकराना डॉक्टरानी दवाखान्यात न्यावयास सांगितले, त्यानुसार त्यांना नेलेसुद्धा परतु जेलर बारीस जेव्हा ही बातमी कळता क्षणीच तो गुरगुरत आला व शेवटी बाबारावाना दवाखान्याऐवजी कामावर पाठविले

जेलर डी बारी एक स्टेटफॉरवर्ड मनुष्य होता कैद्याना तो नेहमी म्हणावयाचा, " पृथ्वीवर फक्त दोनच परमेश्वर आहेत एक स्वर्गात आणि दुसरा अदमानात असलेला बारी लक्षात ठेवा, जर तुम्ही माझ्या कुठल्याही हुकमाचे पालन केले नाही तर मग मी आहे पोर्ट-ब्लेअरच्या चार मैलाच्या परिसरात मी असताना स्वर्गातील परमेश्वर कुणाच्याही मदतीला येऊ शकत नाही " उपेन्द्रनाथ बडोपाध्याय या राजकीय कैद्याने बारीस शिव्या दिल्या, एकाने त्याच्या थोबाडीत पण मारले परतु नतर त्यांना शिक्षाही तशाच भोगाव्या लागल्या

पावसाळ्यात पावसाचे पाणी कोठडीत टपकत असे (बरॅकमधील कोठड्या) मच्छराचे, किड्या-मकोड्यांचे साम्राज्य, प्रकाश यावयास सोय नव्हती, पिण्याचे पाणी भरपूर देत नव्हते जे देत ते पण अत्यत घाणेरडे असे परिणामस्वरूप पोटाचे विकार होत पत्र आल्यास फाडून टाकत. कैद्याना वर्षातून फक्त एक पत्र लिहिण्याची परवानगी होती. अशा तऱ्हेने असह्य वेदना देत वीर वि दा सावरकरानी 'माझी जन्मठेप' ह्या पुस्तकात सेल्युलर जेलमध्ये देत असलेल्या यातनाचे वर्णन करताना लिहिले आहे,

" अतिमेहनत करूनही मारपीट करीत होते त्यावर परत शिव्याची लाखोली, दुर्व्यवहार, अपमान, अर्धवट जेवण, सकाळ, दुपार नि सध्याकाळ या तीनच वेळा शौचास सोडत याव्यतिरिक्त जमादाराकडून सुट्टी मागणे अत्यत कठीण व दुरापास्त होते दररोज सायकाळी ६–७ वाजता कैद्यांना कोठडीत बद करत आणि सकाळपर्यंत त्यास आहे त्याच स्थितीत राहावे

लागत असे आत कोठडीत ठेवलेले भाडे एवढे लहान होते की, बद्यास त्यात शौच नि मूत्र साठवून ठेवणे अतिशय कठीण जर का फरशीवर घाण केली की दुसऱ्या दिवशी घाण केल्याबद्दल बारी त्याचा समाचार घेत असे रात्रभर घाणेरड्या वातावरणात राहणे आणि शिवाय सकाळी परत शिव्या खाणे आणि वेळप्रसंगी मारसुद्धा कधी कधी आदेश मिळत असे, 'स्वत:ची कोठडी स्वत:च साफ करावी' कधी कधी व्हराड्यातील गजाना हातकडी अडकवून पायाससुद्धा साखळीने बांधत हात उंच करून सतत सकाळी ६ ते १० आणि परत १२ ते ५ वाजेपर्यंत ही शिक्षा भोगावी लागत असे त्या वेळी लघ्वी, शौचास परवानगी नसे. यामध्ये काही कुचराई दिसून आली तर तेलघाणीची शिक्षा भोगावी लागत असे कित्येकांनी या यातनाना कटाळून आत्महत्या केल्या, काही वेडे झाले (एकदा सावरकराच्या सुद्धा मनात आत्महत्येचा विचार आला होता परंतु उच्च मनोबल व अत्यंत साहसीवृत्ती असल्यामुळे ते सर्व सहन करू शकले) पुढे सावरकरानी लिहले आहे, " पोर्ट-ब्लेअरमध्ये राहत असलेले इंग्रज अधिकारी कधीकधी त्याच्या गाडीला घोड्याऐवजी बद्यांना जुपत कोडे मारण्याची तर पूर्ण व्यवस्था होती त्यामुळे शरीरावरील मास आणि चामडी निघून येत असे त्यावर डॉक्टरी उपचार केल्यास निकद्री बारीस खूप राग येत असे व तो त्याची तीव्र निर्भत्सना करी ह्या सर्व अत्याचारामुळे बद्यांना आत्महत्या करण्याची इच्छा, मानसिक विक्षिप्तता आणि रोगांचा प्रादुर्भाव होत होता साधारण कैदी यापासून बचाव करून घेण्यासाठी सफल होत कोणी कन्हेराची मुळे खात, त्यामुळे ताप खूप वाढत असे तर कोणी कुठलीही काही विषारी वस्तू सेवन करून आजारी पडत तर कधी स्वत:स झालेल्या जखमेची दोऱ्याच्या साह्याने स्वत:च सिलाई करत, नि बचाव करून घेता येत असे तर काही खरोखरच पागल आहे असे दाखविण्यासाठी स्वत:चे मलमूत्र अगास लावून घेत

डाकेगिरी केल्याबद्दल ज्यांना शिक्षा झालेली होती त्याना तर खूपच हाल सहन करावे लागत सावरकरांनी एक राजकीय बदी श्री उपेन्द्र-नाथ बॅनर्जीविषयी चर्चा करताना लिहिले आहे, " १८५७ च्या नतर काळ्या पाण्याची सजा ज्याना झाली आहे, ते हिंदुस्थानात परत जीवत

येऊ शकत नाही आणि याच एका समजुतीमुळे बॅनर्जीने कित्येक वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला त्याने नारळाच्या काथ्यापासून दोर बनविले. घाण्याला जुपून ते काढले एके दिवशी दिवसभर घाणी (कोलू) ओढून ओढून बेहद्द थकला होता आणि म्हणूनच तो ३० पौंड तेल काढू शकला नाही त्यामुळे त्यास खूप शिव्या खाव्या लागल्या त्यास ओढतच बारीच्या पुढे नेले बारीने पुन्हा त्यास अगदी निवडक शिव्या देऊन अपमानित केले या अपमानित अवस्थेत त्याची काय गत झाली असेल ? दुसरे उदाहरण २५ वर्षापेक्षा कमी वयाच्या इदुभूषण रॉयचे दिले आहे ह्या नवजवान क्रान्तिवीराला मानिकतोला बॉम केस, कलकत्ता षड्यन्त्रातील एक गुन्हेगार म्हणून सक्त कारावासाची १० वर्षाची सजा सुनावली व त्यास अदमानला हद्दपार केले

त्याला कित्येक वेळा तेलघाणी चालविण्याच्या शिक्षा भोगाव्या लागल्या सेटलमेन्टच्या कामासाठी जगलात पाठविले परतु तेथेही त्याच्या पदरी निराशाच पडली तेथे त्याने पाहिले की आजारी कैद्यानासुद्धा आराम न देता उलट जास्त काम करावे लागत आहे शेवटी इदुभूषण रॉय स्वत च्या जीवनाला उबगला खूप थकला होता, क्षीण झाला होता त्या नवजवानाकडून आणखी यातना सहन होईनात स्वत सावरकरानी त्यास खूप समजाविले स्वत स झालेल्या ५० वर्षाच्या शिक्षेचे उदाहरण दिले. सतत १४ दिवस स्वत तेलघाणीस कसे ओढले ? त्या वेळी माझ्या हातातून रक्त कसे वाहू लागले ? माझे पूर्ण शरीर कसे लाकडासारखे ताठले होते ? माझ्याकडून जेव्हा ३० पौंड तेल सकाळपासून तर सध्याकाळपर्यंत काढून झाले नाही त्या वेळी जेलर बारीने कसे अपमानित केले ? वगैरे सर्व सांगून त्यास धीर दिला परतु इदुभूषण नेहमी विषण्ण स्थितीत राहत असे त्याच्या पायात नेहमी बेड्या नि तेलघाणीतून काढलेले तेल मानेवर लादलेले असे दररोज तो या करुण स्थितीत कसा तरी लडखडत आपल्या कोठडी-पर्यंत येत असे एके दिवशी सकाळी सकाळी सेल्युलर जेलमध्ये बातमी पसरली, 'इदुभूषणने आत्महत्या केली.' त्या महान देशभक्ताने २९ एप्रिल १९१२ ला स्वत च्या कोठडीत स्वत च्याच कपड्यानी फाशी लावून घेतली

फाशी लावून घेण्यापूर्वी रॉयने कागदाच्या चिठ्ठीवर काहीतरी

मजकूर लिहून ठेवला होता परंतु जेलर बारीने तो कागद अत्यंत कुशलता-पूर्वक गायब केला आणि आपल्या 'जी हुजूर' वाल्या वार्डरकडून बातमी पसरून दिली की, 'मानसिक विक्षिप्ततेमुळे हे घडले परंतु वि दा सावरकर लिहितात, इंदुभूषण हा दृढ निश्चयी क्रान्तिकारी युवक होता केवळ तो जेलच्या असह्य अत्याचारामुळे आपल्या प्राणास मुकला. अशाच तऱ्हेचे उदाहरण उल्हासकर दत्त याचे आहे इतर कैद्यांना सहा महिने लोटल्यावर बाहेर सेटलमेन्टच्या कामावर पाठवीत परंतु याना वर्षानुवर्षे तेलघाणीच्याच शिक्षेत ठेवले. त्याच्यासोबत इतरही थोडेफार राजद्रोही होते अशा तऱ्हेने त्यानी सतत तेरा वर्षे कठीण परिश्रम केले त्याना तर १०७ पर्यंत ताप असताना सुद्धा त्यावर उपचार करण्याऐवजी जेलरने ३-४ तगड्या नवजवानाना त्याच्या छातीवर मुका मार देण्याचा आदेश दिला थोड्याच वेळात तो अर्धमेला झाला व त्या स्थितीत तो तीन दिवस होता. काही तर तो मेला म्हणून समजले होते नतर तो सावध झाला परंतु तदनतर त्याच्यावर ह्या अनवरत अत्याचार, शारीरिक दड आणि अपमानी वृत्तीमुळे त्याची मानसिक शक्ती लुप्त झाली व तो शेवटी अक्षरश पागल झाला. परंतु जेलर बारीसारख्या निकद्र्याला तो एक बहाणा वाटला आणि म्हणूनच त्यास विजेचे शॉक दिले

त्याची चीत्कार जेलमध्ये घुमत होती नतर त्यास हिंदुस्थानातील पागलाच्या दवाखान्यात पाठविले व शेवटी त्यास तेथे कित्येक दिवस राहावे लागले उल्हासदत्तसारख्या नवजवान, स्वस्थ, हसतमुख आणि आशावादी युवकाची ही स्थिती होती तर मग सर्वसाधारणांची गत काय असेल ?

त्याचप्रमाणे नानी गोपालने तर यापेक्षाही हाल सहन केले नानी गोपालला १४ वर्षे सश्रम कारावासाची सजा झाली होती त्याने एका उच्च ब्रिटिश पोलीस अधिकाऱ्याच्या मोटार गाडीवर बगालमध्ये बॉम्ब फेकला होता म्हणून त्या वेळी त्याचे वय १६ वर्षांचे होते त्याला सतत वेदना दिल्या अपमानित केले काही काळाने त्याने कामास इन्कार केला त्याला बेड्या ठोकून सॉलीटरी (एकांत कोठडी) मध्ये बद केले त्यानतर त्याने कोठडीबाहेर येण्याससुद्धा इन्कार केला अधिकाऱ्यांशीसुद्धा बोलणे सोडून दिले त्यामुळे अधिकारी चिडून जास्तच शिक्षा देत स्नानासाठी त्यास

भगी लोक जबरदस्तीने अधिकाऱ्याच्या हुकुमावरून नेत तिथे त्याचे अग नारळाच्या घासणीने घासत, परिणामत. सर्व अग लाल लाल होत असे वार्डर शिव्या देत अपमान करत. परतु तो त्याची पर्वा करीत नसे त्याचे म्हणणे होते की, 'मला राजकीय कैदी म्हणून वागवा ' परतु त्या वेळी प्रत्यक्ष मुख्य आयुक्ताने जेलमध्ये येऊन सागितले होते, ' तुम्ही या मागणी पायी मेलात तरी आम्ही त्याची पर्वा करणार नाही परतु तुम्हास राजकीय कैद्याची श्रेणी मात्र मुळीच मिळणार नाही '

त्यानतर मात्र नानी गोपालने भूक हरताळ सुरू केला त्यामुळे त्यास आणखीच यातना दिल्या त्यानी त्या सहन केल्या त्यास नाकाद्वारे दूध पाजण्याचा प्रयोग केला परतु व्यर्थ जवळपास दीड महिन्यानतर त्याचा नुसता सापळाच दिसू लागला परतु बहाद्दर निश्चयापासून हटला नाही. त्याला सहानुभूती म्हणून इतर कैद्यांनी पण हरताळ केला त्यांना पण त्याच प्रकारच्या सजा मिळाल्या नानी गोपाल जोराजोराने ओरडून भाषण देत होता त्याचा हा नित्य नियम सुरूच होता शेवटी सावरकरानी नानी गोपालची भेट घेऊन खूप समजावून सागितले परिणामत नानी गोपालने अन्न ग्रहण केले

वीर वि दा सावरकरांचे विचार क्रान्तिकारी असल्या कारणाने त्याना सॉलीटरी (एकातात) सेल न १२३ मध्ये वारवार डांबून ठेवत त्याना अदमानातील अशातीचा जनक समजत होते त्या वेळी राजकीय बद्यांना लिहिण्यासाठी साहित्य पुरविल्या जात नसे म्हणून त्यानी लिहिणे सोडून दिले नव्हते सावरकरांना तर ज्या सॉलीटरी सेलमध्ये ठेवत, ते त्या कोठडीच्या सर्व भितींवर आपल्या मनातील विचार खिळयाच्या साह्याने लिहून काढत व त्याच विचारामुळे त्याच्या ' माझी जन्मपेठ ' ह्या पुस्तकाची निर्मिती झाली परतु वर्षाअखेर जेव्हा त्या भितींना सफेदी देत त्या वेळी ते सब नष्ट होत असे अशा प्रकारे अनेक घटनांचे वर्णन केलेले आढळते

त्याच काळात १५५ दिवसाचा हरताळ पृथ्वीसिंह आजाद यांनी केला रक्ताने पत्रे लिहिली आणि त्याचा परिणाम हिंदुस्थानातसुद्धा झाला. नतर महात्मा गांधीच्या सल्ल्यानुसार १५५ दिवस चाललेला हरताळ समाप्त केला त्या वेळी त्यान्ची मुख्य मागणी मान्य केली, " राजनैतिक बदी

स्वदेशी पाठविण्याची" यानतर २७ फेब्रुवारी १९२६ ला आदेश काढून राजनैतिक बदी अदमानला पाठविण्यास बदी घातली

परतु त्यानतरही बदी पाठवीतच होते व त्यामुळे परत ४६ दिवसाचा भूक हरताळ १९३२ ते १९३८ या तिसऱ्या बॅचमधील राजकीय कैद्यांनी केला त्या वेळीसुद्धा शिक्षा झाल्या जबरदस्तीने अन्न तोंडात कोंबणे. रबराच्या नळ्यांद्वारा दूध पाजण्याचेसुद्धा प्रकार घडले परिणामस्वरूप महावीर सिंग (शहीद भगतसिंगांचे साथीदार) आणि मोहित मित्र मरण पावले तदनतर गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोरांनी तार पाठवून हरताळ समाप्त करण्याची विनती केली त्यानुसार २६ जून १९३३ रोजी हरताळ समाप्त केला त्या वेळी त्याच्या मुख्य तीन मागण्या मान्य केल्या

(१) पुस्तके, वर्तमानपत्रे पुरविण्यात यावीत किंवा खरेदी करण्यास परवानगी असावी

(२) मुक्त व्यवहारास परवानगी आणि

(३) जेवणाचा दर्जा सुधरविणे

त्यानतर तिसऱ्यादा पुन्हा ४५ दिवसाचा सप करण्यात आला त्या वेळी त्याची मुख्य मागणी होती, ' राजकीय कैद्यांना हिन्दुस्थानात परत पाठवावे. शेवटी त्याची ती मागणी मान्य केली व राजकीय कैद्यांची पहिली बॅच सप्टेंबर १९३७ ला हिन्दुस्थानात परत पाठविली दुसरी बॅच नोव्हेंबर १९३७ ला व तिसरी व शेवटची बॅच १८ जानेवारी १९३८ ला परत पाठवून ह्या हद्दपार (Transportation for Life) पद्धतीचा शेवट झाला म्हणजेच पेनल सेटलमेन्ट बद केले

सध्या ह्याच कुविख्यात ' सेल्युलर जेल'च्या नबर एक विंगचा जिल्हा कारागृह म्हणून उपयोग करतात येथे सरासरी १००–१२५ कैदी असतात. कारण पूर्ण द्वीपसमूहात हाच एकमेव जेल आहे व म्हणून सपूर्ण द्वीपसमूहातील कैदी शिक्षा भोगावयास येथेच पाठवितात सध्या ह्या जिल्हा कारागृहाचे जेलर म्हणून एक महाराष्ट्रीयन गृहस्थ १ सप्टेंबर १९७९ पासून तीन वर्षांच्या डेप्युटेशनवर आले आहेत श्री चटपल्लीवार २१ ऑगस्ट ७९ पूर्वी जेलर म्हणून महाराष्ट्रीयनच सद्गृहस्थ श्री गोविंदराव हर्षे होते. त्यानी जवळपास १९ वर्षे ह्या जेलचे जेलर म्हणून काम बघितले सध्या

कैद्यांना बेताच्या खुर्च्या, हातमागाचे थोड्या प्रमाणात कापड, थोडेफार बाग-काम, ही साधीच कामे करावी लागतात ह्या कामासाठी इंग्रजाच्याच काळातील 'टिनशेड' आहे व त्याच टिनशेडमध्ये इंग्रजाच्या काळातील 'तेलघाणी' ठेवलेली आहे उत्साही पर्यटक तिला बघण्यासाठी मुद्दाम जातात

अनेक पर्यटक जेलर हर्षेना जेव्हा जेलर बारीची आठवण देत तेव्हा ते नुसते त्या विधानावर हास्य करीत कारण इंग्रजाच्या काळातील वागणूक आणि सेवानिवृत्त हर्षे देत असलेली वागणूक यात जमीन अस्मानाचा फरक असायचा हर्षे जेलर अत्यंत सभ्य, सोज्ज्वळ, प्रेमळ आणि संयमशील होते. कोणताही माणूस नव्हे जेलमध्ये बंदी असलेला कैदीसुद्धा त्यांना वाईट म्हणत नसे

○ ○

प्रकरण ३

# जपान्यांचे आधिपत्य, त्यांनी दिलेल्या यातना व सुभाषचंद्र बोस यांची भेट

जपानी लोकांचे अदमान–निकोबार या द्वीपावर १९४२ ते १९४५ पर्यंत आधिपत्य होते २३ मार्च १९४२ रोजी सकाळच्या वेळेस सैनिक भराभर जहाजातून उतरले लगेच त्यानी पोर्ट-ब्लेअर शहरातील वेगवेगळया भागात घुसून कब्जा घेतला व १२ तासांत जपान्यानी काहीही गोळीबार न करता पूर्ण ताबा मिळविला

त्या वेळी जहाजातून उतरलेल्या सैनिकाची सख्या २५,००० होती आणि तेवढेच सैनिक जहाजाच्या ताफ्यावर तैनात होते त्या वेळी सपूर्ण शहरात सैनिकांचेच साम्राज्य असल्यासारखे झाले होते व त्यामुळे साहजिकच जबरदस्ती दुकानातील सामान लुटणे, कोंबडया–बकऱ्या मारणे वगैरे प्रकार घडले.

जपान्याच्या काळातसुद्धा फारच निर्दयतापूर्वक जनतेचे हाल झाले. सपूर्ण लोक भयभीत असत कधी कोणावर अत्याचार भोगावयाची पाळी येईल हे सांगता येत नव्हते त्यामुळे बव्हंशी लोक जपान्यांच्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी प्रयत्न करत होते आणि म्हणून साहजिकच चुगलखोरी, लबाडी वगैरे प्रकार एकमेकाविषयी घडू लागले अदमानमधील अन्न-धान्य सपूर्णपणे जहाजानेच येत असे त्या वेळी बऱ्याच वेळा असे घडले की, "अन्न-धान्यानी भरून आलेली जहाजे पोर्ट–ब्लेअर शहराजवळ येत असतानाच बॉम्ब हल्ले आणि सामुद्री हल्ल्यामुळे नष्ट केल्या गेलीत" व त्यामुळेच जपानी

अधिकारी चिडले त्याचा परिणाम म्हणून सामान्य लोकांना आणि कैदी लोकांना यातना देऊ लागले जनता अन्नावाचून उपाशी मरू लागली. संशयास्पद माणसास जपानी सैनिक सेल्युलर जेलमध्ये कोंडू लागले लोकांकडून फुकटात काम करून घेऊ लागले जबरदस्ती कामावर घेऊन जात असल्यामुळे घरच्या माणसांना त्याच्याविषयी काहीच पत्ता लागत नसे इकडे जेलमध्ये बंदी केलेल्यांना कठोरात कठोर शिक्षा देऊ लागले त्याना यातना देऊन सम्बधित माणसाची (हेराची) माहिती काढून घ्यावयाची होती कोण गुप्त संदेश इंग्रजाना कळवितो, कोणी अन्नधान्याची जहाजे नष्ट केली, वगैरे बाबतीत माहिती काढून घेण्यासाठी त्यानी पण जेलमध्ये शिक्षेचे अनेक प्रकार अवलबिले त्यापैकी 'जलयातना' ही एक पद्धत होय या शिक्षेच्या वेळी ते कैद्यास एका खाटेवर किंवा लाकडी पाटयांवर उताणे झोपवून हातपाय बांधत डोक्याला दोन व्यक्ती मजबूतपणे पकडून ठेवत आणि दुसरा माणूस एकसारखे पाणी त्याच्या चेहऱ्यावर ओतावयाचा ही प्रक्रिया कित्येक तास चालू ठेवत त्यामुळे नाका-तोंडातून पाणी शरीरात जाणे अगदी स्वाभाविकच होते अशा तऱ्हेने यातना देऊन जर्जर करीत. कधी कधी तर कैदी मृत्युमुखी पडत असे तसेच 'विद्युद्यातना' या पद्धतीत विजेचा प्रवाह अगदी नग्न शरीरास देत असत तर कधी कधी हातात हातकडी अडकवून ती गजाला अडकवीत, हात उंच करीत आणि नतर विजेचा शॉक देत व त्यामुळे कैदी सतत ओरडत असे आणि त्याचा आवाज पूर्ण जेलभर ऐकावयास मिळत होता शिखाच्या दाढीचे केस जाळत, नखाला टाचण्या टोचून त्या ठिकाणी मेणबत्तीच्या साह्याने चटके देत अशा प्रकारे जपान्यानीसुद्धा अनेक शिक्षेचे प्रकार अवलबिले होते

जपानी अधिकारी विशेषत: इंग्रजी भाषा जाणणाऱ्याना जास्त त्रास देत असत अशाच तऱ्हेने त्यानी एका महाराष्ट्रीयन अधिकाऱ्यास संशयावरून अटक केली आणि नतर इतर ४३ लोकाबरोबर त्यानापण गोळी घालून ठार केले त्याची थोडक्यात हकीकत अशी

'महाराष्ट्रीयन सद्गृहस्थ कै हनुमतराव उपाध्य अण्णासाहेब रहाळकर हे अमरनाथचे रहिवासी ते अंदमानला (पोर्ट-ब्लेअरला) 'विम्को' कंपनीचे मॅनेजर म्हणून काम बघत होते मॅनेजर म्हटला म्हणजे इंग्रजी येते

हे गृहीत धरले आणि ते साहजिकच होते ह्याचमुळे प्रथम जपानी अधिकाऱ्यांनी त्याच्याशी दोस्ती केली तसे रहाळकर अत्यंत लोकप्रिय, सोज्ज्वळ, परोपकारी, प्रेमळ आणि शालीन वृत्तीचे होते तर त्यांच्याच कारखान्यातील काही गद्दार कर्मचाऱ्यांनी त्याच्याविषयी जपान्यांकडे चुगल्या करून सांगितले की, 'जपान्याच्या हालचालीबाबतची माहिती रहाळकरच इंग्रजांना पुरवितात' बस जपान्यांना तेच पाहिजे होते त्यातल्या त्यात जपानी अधिकाऱ्यांना दुसरी एक महत्त्वाची आणि सत्य बातमी रहाळकराविषयी कळाली, "रहाळकर हे उत्कृष्ट रेडिओ मेकॅनिक आहेत व त्यांना त्यातील सखोल ज्ञान आहे" त्यामुळे तर त्याचा संशय जास्तच बळावला त्यांना वाटले, 'हा गृहस्थ बातम्या बाहेर पाठवीत असेल कारण तो रेडिओ दुरुस्तीचे काम जाणतो नि एक मेकॅनिक आहे'

नंतर एके दिवशी जपान्यांनी रहाळकरांना रात्री ११ वाजता त्याचा राहता बंगला आम्हास आताच्या आता खाली करून पाहिजे म्हणून हुकूम सोडला त्यांनी तो तेवढ्याच रात्री सोडला आणि आपल्या एका डॉक्टर मित्राकडे राहावयास गेले त्यानंतर काही दिवसातच त्यांना 'सेकंड स्पाय केस' मध्ये संशयित म्हणून अटक केली त्या वेळेस त्यांच्या सोबत इतरही ४३ लोक होते पकडल्यानंतर खूप चौकशी केली यातना दिल्या, परंतु चौकशीअन्ती काहीही माहिती बाहेर पडली नाही व त्यामुळे जपानी आणखीच चिडले

शेवटी ३० जानेवारी १९४४ ची ती भयानक सकाळ उजाडली. 'सेकंड स्पाय केस' मधील अटक केलेल्यांच्या सर्व नातेवाइकांना भेटावयास येण्याबाबतचा निरोप पाठविला अर्थातच सर्वच नातेवाइकांच्या मनात अपशकुनयुक्त शंकेची पाल चुकचुकली सर्वांचेच नातेवाईक, लहान मुले, आबालवृद्ध सर्वच आले येताना प्रत्येकासाठी काहींना काहीतरी खावयास-प्यावयास आणले होते सकाळी नऊ च्या सुमारास सर्वजण सेल्युलर जेलसमोर गोळा झाले प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भय, करुणा, दया, शोकाकुलता दिसून येत होती बरोबर नऊ वाजून पाच मिनिटांनी 'सेकंड स्पाय केस' मध्ये अटक केलेल्यांना जमलेल्या नातेवाइकांपासून दूर उभे केले क्षणभर नातेवाइकांनी कैद्यांना आणि कैद्यांनी नातेवाइकांना डोळा भरून पाहिले.

बोलण्याची संधी मात्र दिली नाही

तेवढ्यातच एका काळ्या जीपमधून काही जपानी सैनिक आले. त्याच्यामागोमाग एक भली मोठी व्हॅनसुद्धा आली बदी केलेल्याना व्हॅनमध्ये बसण्याचा आदेश दिला एक एक व्हॅनमध्ये चढू लागले वातावरण शोकसागराने व्याप्त झाले काहींनी तर हुबरडे फोडले थोड्याच अवधीत व्हॅन सुरू झाली व्हॅनमध्ये संपूर्ण गंभीरता पसरली होती आपणास कुठे नेत आहेत याची कुणासही कल्पना नव्हती पोर्ट-ब्लेअर शहराच्या मुख्य रस्त्यावरून व्हॅन धावू लागली. व्हॅन कुठे जात आहे ? कशासाठी जात आहे ? प्रत्येकाच्या मनात हाच एक प्रश्न घोंगावत होता मुख्य रस्त्यावरून व्हॅन नंतर विमानतळाकडे वळली विमानतळावरून आणखी पुढे धावू लागली. सतत सोळा किलोमिटर धावल्यानंतर व्हॅन उभी केली आपण कुठे आहोत हे दिवस असूनही ओळखता येईना तेवढ्यातच सर्वांना हुकूम सुटला ' निच्चे उत्रो ' सर्वजण लगेच खाली उतरले जवळच फर्लांगाच्या अंतरावर एका लहानशा टेकडीवर इंग्रजी ' एल ' आकाराचा खड्डा थोडेसे चालून गेल्यावर प्रत्येकाला दिसला सर्वांना त्या खड्ड्याच्या सभोवार उभे राहावयाचा आदेश दिला त्यानुसार सर्वच ४४ कैदी त्याभोवती उभे राहिले (त्यात विम्को कंपनीचे मॅनेजर अण्णासाहेब रहाळकरसुद्धा होते ) दुसऱ्याच क्षणाला जीपमधून एक शिपाई रायफलीसह त्या ठिकाणी पोहचला लगेच पुढचा हुकूम सुटला धाड् धाड् धाड् सुरू झाली एकेकाच्या छातीवर बंदुकीच्या गोळ्या झाडल्या जात होत्या आणि ते त्या खड्ड्यात पडत होते अशा तऱ्हेने जपान्यानीसुद्धा आपल्या क्रूर वृत्तीने विनापराध असताना त्या सर्वांचा दुःखद अंत केला ते ठिकाण ' हम्फ्रीगंज ' म्हणून ओळखल्या जाते

तेथे ३० जानेवारी १९७८ रोजी त्या शहिदांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक स्तंभ उभारला असून त्यावर त्या ४४ शहिदांची नावे संगमरवरी दगडावर लिहून बसविली आहेत या कामी सम्बधित केसमधील नातेवाइकांनी पुढाकार घेऊन ते छोटेसे स्मारक तयार केले आहे मला (लेखकाला) ते ठिकाण पाहण्याची संधी मिळाली खरोखरच ते ठिकाण त्या काळी जंगलात होते. परंतु आता रोड झाल्यामुळे सहजपणे तेथे जाता येते त्याकाळी मात्र भयानकच ठिकाण असेल ते अशा तऱ्हेने कित्येकांना यातना दिल्या कित्ये-

कांना मृत्युमुखी पाडले

**नेताजी सुभाषचन्द्र बोस यांची अदमानला भेट--** २९ डिसेंबर १९४३ रोजी नेताजी सुभाषचन्द्र बोस याची अदमान यात्रा झाली जेव्हा सुभाषचन्द्र बोस विमानतळावर उतरले, तेव्हा तेथे जपानी अधिकाऱ्यासोबत भारतीय अधिकारीसुद्धा त्याच्या स्वागतासाठी उपस्थित होते जपानी उच्च अधिकाऱ्यांचा सुभाष बाबूशी परिचय करून दिल्यानतर लगेच नेताजी सुभाषचन्द्र बोसाना ' रॉस द्वीप ' वरील सरकारी बगल्यात घेऊन गेले हे द्वीप पोर्ट-ब्लेअरच्या अॅटलान्टा पॉईन्टपासून जास्तीतजास्त एक कि मि अतरावर आहे त्या द्वीपाच्या चहुबाजूनी पाणी असल्यामुळे तेथे लहान मोटार बोटीने जावे लागते (सध्या ते द्वीप भारतीय नेवीच्या ताब्यात असून ते बघावयास जाण्यासाठी सम्बधित ऑफिसची परवानगी घ्यावी लागते ) तेथेच त्यांची राहण्याची, खाण्याची सोय केली होती

तेव्हा भारतीय अधिकाऱ्यावर आणि भारतीय जनतेवर जपान्यांनी अत्यत कडक नजर ठेवली होती चुकूनही नेताजी सुभाषचन्द्र बोस याना भारतीय भेटू नये याकरिता जपान्यांनी सुभाषचन्द्र बोसाना मुळीच कल्पना येऊ दिली नाही, " जपान्याद्वारासुद्धा अतोनात यातना दिल्या जातात म्हणून " त्याना एकदा सेल्युलर जेल दाखवावयास नेले तेथे पण सर्व आबादी आबाद आहे कैद्याना काहीच त्रास नाही असा नुसता देखावा केला ते एकदा जाहीर भाषणास गेले होते, तेव्हा पण अत्यत कडक पहारा ठेवला होता एकाही भारतीय नागरिकाला भेटता येणार नाही अशी व्यवस्था केली होती गुप्तचर खात्याचे लोक सर्वत्र नेमून दिले त्यामुळे भारतीयांना नेताजीची भेट घेऊन त्याना क्रूर अत्याचाराची कल्पना देण्यासाठी सधीच मिळाली नाही सुभाषचन्द्र बोस आले नि परत गेले

परतु त्यानी त्याच वेळी म्हणजे ३० डिसेबर १९४३ रोजी स्वातत्र्याचा पहिला तिरगी झेंडा जीमखाना मैदानात फडकविला व त्याच वेळी अदमान द्वीपसमूहास ' शहीद ' आणि निकोबार द्वीपसमूहास ' स्वातत्र्य ' अशी नावे दिली

(जून ७८ मध्ये ह्या द्वीपांची नावे अदमान–निकोबार बदलून त्याना ' शहीद ' आणि ' स्वातत्र्य ' अशी नावे देण्याचा प्रस्ताव पोर्ट ब्लेअरच्या

म्युनिसिपल बोर्डने माडला होता परतु स्थानिक लोकानी त्यास कडक विरोध दर्शविला त्याचे म्हणणे असे, " जर का अदमान–निकोबार ही नावे बदलविली तर त्याच्या पूर्वजांनी ज्या ज्या यातना, जो अत्याचार सहन केला, जो जुलूम सहन केला त्याचा अपमान होईल." व म्हणून तो ठराव फेटाळल्या गेला ) जेथे सर्वप्रथम नेताजी सुभाषचन्द्र बोसांनी स्वातत्र्याचा झेंडा फडकविला त्या जीमखाना मैदानाच्या पूर्वेकडील बाजूस ' मरीना पार्क ' मध्ये सध्या त्यांचा भव्य पुतळा उभारला आहे

जपानी शासनाच्या काळात काही सुधारणा पण झाल्यात त्यासुद्धा लक्षात घेण्यासारख्या आहेत (१) अत्यत अडी-अडचणीच्या ठिकाणी सडकेचे निर्माण कार्य, (२) विमानाची धावपट्टी आणि (३) समुद्रकिनारी सरक्षणासाठी व पहारा करण्यासाठी ' पिल बॉक्स ' ह्या गोष्टी प्रामुख्याने आढळतात. १९४४ च्या एप्रिल महिन्यात जपान्याना आपल्या पराभवाची लक्षणे दिसू लागली खाण्याचे अत्यत हाल होऊ लागले सामान्य जनता उपाशी मरू लागली काही अक्षरश झाडपाला खाऊन राहू लागले (अजूनही काही वृद्ध लोक त्या काळातील अनुभव सांगतात मलासुद्धा (लेखकाला) तीन–चार वृद्ध पुरुषांची मुलाखत घेता आली व अनुभव ऐकण्याची सधी मिळाली. काही अनुभव ऐकल्यानतर तर खरोखरच अगावर शहारे उभे राहतात ) लोक कपड्याच्या अभावी तरटाच्या साह्याने अग झाकू लागले. स्त्रियांनी वस्त्राभावी घराबाहेर पडणे सोडून दिले ' बेरी बेरी ' नावाचा रोग पसरला जनतेचे फार हाल झाले

अन्नाची समस्या सोडविण्यासाठी १९४५ च्या मध्यतरी जपान्यांनी एक वेगळीच शक्कल चालविली कित्येकाना सागितले की, " पोर्ट-ब्लेअरच्या आसपास शेतीयोग्य जमीन आहे शिवाय तेथे अधिक धान्य पिकविता येते. तेव्हा रातोरात त्यांनी जवळपास ४००–५०० लोक एकत्र केले, आणि त्याना जेलमध्ये आणले त्यानतर अवघ्या २४ तासातच त्यांची सख्या आणखी वाढली त्यात काही शिक्षा भोगत असलेल्या कैद्याचासुद्धा समावेश केला व त्या सर्वांना ' अर्बाडिन जेट्टीवर एल सी टी त (अगदी किनाऱ्यापर्यंत येणारी सामानवाहक नौका) चढवून ती समुद्रात खोल पाण्याच्या ठिकाणी नेली (सध्या जेथे २४ मैल अतरावर हॅवलॉक नावाचे द्वीप आहे ) तेथे त्या

सर्वांवर सगिनी चालविल्या काहीवर दडे पडले तर काहीना समुद्रात ढकलून दिले अशा तऱ्हेने त्यांची विल्हेवाट लावली

त्यानतर ५०० लोकांना असेच दुसरीकडे नेऊन त्यांच्यावर मशिनगन्स चालविल्या, तेव्हा जपान्यानी मृत व्यक्तीच्या मोबदल्यात प्रत्येकी ५०० रु त्याच्या नातेवाइकाना देऊ केले परतु स्वाभिमानी भारतीयांनी तो ठराव फेटाळून लावला एकानेही पैसे स्वीकारले नाहीत

साडे तीन वर्षांच्या काळानतर जपानी हे द्वीप सोडून गेले त्यानतर रेशनिंग विभागाने एक सर्वसाधारण सर्वेक्षण करून जनगणना केली त्या वेळी असे आढळून आले की, ' जपानी आधिपत्याखाली अदमानची लोकसख्या ३४,००० (चौतीस हजार) राहिली होती परतु त्यांचा कार्यकाल सपल्यानतर १४,००० (चौदा हजार) राहिली त्याचे आधिपत्य सपल्यानतर त्यांनी केलेल्या अत्याचारांची चौकशी झाली केसेस सिंगापूर येथील कोर्टात चालविल्या दोषी अधिकाऱ्यांना शिक्षा पण ठोठावल्या आणि आक्टोबर १९४५ मध्ये कैद्याचा उपनिवेश समाप्त करून टाकला शिक्षा रद्द केल्या. ज्या ज्या कैद्यांना जपान्यानी मोकळे सोडले होते त्या सर्वांना स्वतत्र घोषित केले त्याना सरकारी खर्चाने भारतात परत जाण्यास परवानगी दिली जवळपास ४,२०० लोकानी त्या सधीचा फायदा घेतला तेव्हा परत अदमानची लोकसख्या चौदा हजारापेक्षाही कमी झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात द्वीपसमूहात खूपच महागाई वाढली होती एक अड्याची किंमत दोन रुपये झाली होती एक पौंड मटनाची किंमत ४० रुपये एक सिगारेट पाच रुपये गुरे, बकऱ्या, कोबड्या असणारे लोक त्या वेळी खूपच श्रीमत झाले परतु नतर जपानी मुद्रा अमान्य घोषित केली व त्यामुळे अत्यत सपन्न लोकसुद्धा गरीब झाले तदनतर त्याना कर्ज देण्यात आले जे कैदी शिल्लक राहिले त्याना लेबर फोर्समध्ये भरती केले. अशा तऱ्हेने जपान्यांचे आधिपत्य सपून नवीन प्रगतीस आरभ झाला

३५ वर्षांपूर्वी जपानी लोकानी स्वत:च्या सरक्षणासाठी (दुसऱ्या महायुद्धाच्या काळात) मोठ्या प्रमाणात बॉम्ब साठा अदमानमध्ये आणला होता फेब्रुवारी १९७८ मध्ये एका गुरे चारणाऱ्या गृहस्थाला एका भुयारात काहीतरी पांढऱ्या रगाची वस्तू दिसली. ती बातमी चहूकडे पसरली

त्यानतर ' डिफेन्सने ' तेथे जाऊन निरीक्षण केले. तेव्हा त्यांना तेथे जवळ-पास ९०० (नऊशे) जीवंत ॲम्बचा साठा सापडला. ते ठिकाण पोर्ट-ब्लेअर शहराच्या थोडेसे अंतरावर विमानतळाजवळच आहे. विमानतळा-जवळ साठा ठेवण्याचा जपान्याचा इरादा हा असावा की, वेळप्रसंगी पटकन ते लढावू विमानात भरून नेता यावेत

ते सर्व बॉम्बस् एका ' एक्सपर्ट टीम'च्या निदर्शनाखाली एप्रिल १९७८ मध्ये शहरापासून दूर एका मोठ्या खड्ड्यात नष्ट करण्यात आले एका एका बॉम्बचे वजन ८५० पौंडपर्यंत होते तज्ज्ञांच्या मतानुसार ते समुद्रात फोडणे योग्य नव्हते कारण त्यामुळे समुद्र संपत्तीस नुकसान पोहचले असते म्हणूनच ते बॉम्ब एका सुरक्षित स्थळी एक एक करून फोडून टाकले.

○ ○

प्रकरण ४

# अंदमान-निकोबार द्वीपसमूहातील आदिम जनजाती

अदमान-निकोबार द्वीपसमूहामध्ये एकदर सहा आदिम जनजाती आहेत. त्यापैकी चार अदमान द्वीपसमूहात असून इतर दोन निकोबार द्वीपसमूहात आहेत

(१) अदमान द्वीपसमूहातील जनजाती, (अ) जारवा, (ब) ओंगी, (क) ग्रेट अदमानी आणि (ड) सेन्टीनली

निकोबार द्वीपसमूहातील आदिम जनजाती

(अ) निकोबारी (ब) शाम्पेन

दक्षिण पूर्व आशिया खडातील सर्वप्रथमची मानव जात 'निग्रीटो' (निग्रो नव्हे,) होती तदनतर मलाया प्रायद्वीपाची 'सैमांग' व अदमानातील आदिम जनजाती ह्या 'निग्रीटो' जातीचे सर्वशुद्ध रूप आहे, असे अनुमान करतात त्यांना शेतीचे मुळीच ज्ञान नाही ते समूहाने एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी भटकणारे आहेत ते आपल्या जेवणात कदमुळे, फळे, डुकराचे मास, मासे आणि समुद्रातील इतर जीवजतू वापरतात.

मलायामधील 'सैमांग' आणि अदमानमधील आदिम जनजातीचे बरेच साम्य आहे त्याची उची, स्वरूप, राहणे, जीवनपद्धती, रीतिरिवाज वगैरे बाबतीत तर फारच साम्य आहे त्यांची मते, अधविश्वाससुद्धा एकसारखे आहेत. जोरदार वादळ, भयकर वर्षा वगैरे गोष्टी दैवी गोष्टीचा प्रकोप समजतात. अदमानातील जनजातीत आणि 'सैमांग' ह्या जातीमध्ये

मृत व्यक्तीला जमिनीत गाडतात व काही दिवस ती जागा सोडून दुसरीकडे निघून जातात परत काही दिवसानतर त्या जागेवर येऊन राहतात मृत व्यक्तीच्या थडग्यावर नैवेद्य ठेवण्याची पद्धतसुद्धा सारखीच आढळून आली. त्यामुळे त्याना मृत व्यक्तीस जेवण दिल्याचे समाधान लाभते

आजकाल अदमानातील आदिम जनजातीस सुसस्कृत बनविण्याचा, त्याना माणसाळविण्याचा प्रयत्न केला जात आहे व या कामात काही अशी यश आले आहे वर निर्देशित वेगवेगळ्या आदिम जातीची सविस्तर माहिती, रीतिरिवाज शिवाय त्याची सध्या होत असलेल्या प्रगतीबाबत पुढीलप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे–

(१) **जारवा–** चालू शताब्दीच्या सुरुवातीला ह्या आदिवासीची सख्या बरीच होती परतु आजकाल ती फारच कमी होत चालली आहे १९०१ च्या जनगणनेनुसार जारवाची एकूण सख्या ५८५ होती परतु सध्या ती २५१ राहिली आहे ह्या जारवा आदिम जनजातीशी प्रत्यक्ष सबध १७९० मध्ये एका सेट्लरशी मित्रत्वाच्या नात्याने आला होता ह्या रानटी लोकांनी कित्येक वेळा कैद्याच्या वसाहतीवर हल्ले केले त्यात पुष्कळ कैदी मारल्या गेले होते परतु १८८३–८४ मध्ये त्यानी कैद्यांबरोबर सहानुभूती दर्शविली होती

जारवा ही आदिम जनजात अजूनही नग्नच राहते अदमान प्रशासनाने १९६९ साली तीन जारवा युवकाना पकडून एक महिनाभर जेलमध्ये ठेवले होते त्या वेळी त्याच्या जीवनाबद्दल अभ्यास करण्यात आला

ते युवक अगदी सुदृढ शरीराचे होते ते अन्न पसत करत नसत त्याना रोज जीपमधून हिंडवत असत उद्देश फक्त हाच होता की, लोकाना त्याना बघता यावे आणि त्या युवकांनी लोकाना बघावे त्यांची भाषा समजत नसे ते एक दुसऱ्याच्या वयाने मोठे होते त्याच्यात आदरातिथ्याची भावना आढळून आली (कारण त्यांच्यापैकी जो सर्वात थोरला होता त्याला इतर दोघेजण मान देत ) त्यांना जगल पाहून अत्यत उदास वाटत होते त्याचा अर्थ त्याना जगलातील आपल्या इतर नातेवाइकाची आठवण येत असावी. एके दिवशी त्यांना विमान बघावयास नेले असता, आकाशातून काहीतरी आवाज करत निघून जाणारे ते हेच असावे, अशी त्यांची समजूत झाली

(हे त्याच्या हावभावावरून लक्षात आले होते ) त्यांना लोखंडी वस्तू फार आवडत कारण ते आपले 'तीर' लोखंडापासून बनवीत त्या एक महिन्यात त्यांना कपडे घालावयास दिले ते त्यांनी आनंदाने घातले होते

त्या वेळी जरी त्यांच्याशी सद्व्यवहार करून माणसाळविण्याचा प्रयत्न केला तरीपण ते अजूनही पूर्णत माणसाळलेले नाहीत ते दक्षिण अंदमानच्या 'सेन्टीनलद्वीपा'वर राहतात ते ज्या जंगलात राहतात ते ६४८ चौरस कि मिटर जंगल राखून ठेवले आहे तेथे बुश पोलिसांचा सारखा पहारा असतो तेथे जाण्यास सक्त मनाई आहे एवढे असूनही एखादे वेळेस ते माणसावर बाणाने हल्ला करतात (डिसेंबर ७८ मध्ये फॉरेस्ट खात्याच्या एका माणसाला घायाळ केले होते नंतर त्याच महिन्यात 'तिरुर' गाववाल्याच्या दोन म्हशींना एकदम ठार केले त्याच्यापासून संरक्षण मिळावे म्हणून कॉंग्रेस (आय ) ने आंदोलनही पुकारले होते १० ते १९ डिसें ७८ पर्यंत आंदोलन सुरू होते त्यांना योग्य आश्वासन प्रशासनाकडून मिळाल्यानंतर ते समाप्त केले होते शिवाय आंदोलनात अटक केलेल्या कार्यकर्त्यांना विनाशर्त सोडून दिले.)

जारवा अजूनही जंगलातच झाडांवर राहतात आणि कंदमुळे, फळे, मासे, जंगली जनावरांचे मांस वगैरे खाऊनच उपजीविका करतात. दुसऱ्यांच्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी फक्त पोटाला व डोक्याला झाडाच्या जाड सालींनी गुंडाळतात ते रंगाने काळे असून डोक्यावरील केस बारीक बारीक असतात शिवाय शरीराने सडपातळ नि उंच असतात त्यांचा वंश टिकविण्यासाठी सरकारतर्फे भक्कम प्रयत्न केल्या जात आहेत

(२) ओंगी– द्वीपसमूहातील ओंगी ही आदिम आदिवासी जमातसुद्धा फार मोठ्या प्रयासानंतर माणसाळलेली आहे त्यांची १८५८ ला एकूण संख्या ७०० होती परंतु त्यांच्याही संख्येत कमालीची घट होत असून त्यांची संख्या एप्रिल १९७९ ला फक्त ९५ राहिली आहे ओंगी लोकांचा संपर्क पहिल्या प्रथम १८६७ साली आला त्यानंतर १८८५ मध्ये १०–११ ओंगी स्त्री–पुरुष पकडून पोर्ट-ब्लेअरला आणले होते त्या वेळी त्यांच्याशी स्नेहपूर्वक व्यवहार केला आणि तेव्हापासूनच त्यांची सुसंस्कृत माणसाबद्दलची शत्रुत्वाची भावना हळूहळू दूर झाली आणि आता तर ते पूर्णपणे

माणसाळलेले आहेत ते ओंगी नावाची भाषा बोलतात. शेती आता आता करतात हे लोक सुद्धा पूर्वी उघडे–नागडेच राहत होते अजूनही वयस्कर नग्नच राहतात फक्त गुह्यांगाभोवती झाडाच्या मुळापासून बनविलेला झुपका अडकवितात परंतु आधुनिक ओंगी मुले कपडे वापरतात ते रंगाने काळेकुट्ट असून डोक्यावरील केस अत्यंत कुरळे आहेत शिवाय अत्यंत लहान, लहान शरीर सर्वसाधारणच, परंतु नितंबामागील भाग जास्त मागे आल्यासारखा वाटतो, नव्हे आहेच.

सरकारने त्यांना ' डुगाँग क्रीक ह्या बेटावर एकत्र वसविले आहे. ते सध्या सर्व मिळून २५ हेक्टर जमिनीत नारळाची बाग, भाजीपाला, सत्र्यांची लागवड वगैरे करतात आता ते अन्न खातात तरीपण अजूनही फळे, कंदमुळे, मध, डुकराचे मांस वगैरेवर अवलंबून असतात

त्याची झोपडी गोलाकार असते आणि ती सरळ जमिनीवरच उभी करतात आतमध्ये बांबू पसरवून त्यावरच ते झोपतात एकदा बांधलेली झोपडी ते कित्येक वर्षे उपयोगात आणतात एकाच झोपडीत अनेक परिवार एकत्रपणे राहतात

**रीति-रिवाज–** ते अलंकार म्हणून माती डोक्याला नि अंगाला फासतात ओंगी आदिवासी आनंदात असताना, तसेच काही खूष खबर कळताच नाचतात (स्त्रीपुरुष हातात हात घालून फिरतात) गाणे म्हणतात त्यांच्यामध्ये विवाहपद्धती अत्यंत सोपी आहे. पुरुष (वर) स्त्रीच्या (वधूच्या) डोक्यावर हात ठेवतो नंतर ती त्याची पत्नी होते. अगदी लहान वयातच लग्न करण्याची पद्धत आढळून येते आपापसात आदर-भावाची पद्धत आहे दुसऱ्या व्यक्तीने एखादी वस्तू मागितल्यास इंकार करीत नाहीत मृत्यूनंतर शोक प्रकट करतात काही दिवस गाणे, नाचणे मात्र वर्ज्य करतात आदरणीय व्यक्ती मरण पावल्यास त्याचे शव गाठोडीत बांधून ते एखाद्या झाडावर टांगून ठेवतात बाकीच्यांना जमिनीत पुरतात

लहान मुलाचे शव तर झोपडीतच पुरून टाकतात मेलेल्या माणसाच्या हड्डया त्याच्या आठवणीकरिता जपून ठेवतात. कधीकधी त्या हड्डीचे अलंकार करून वापरतात विधवा, विधूर किंवा अत्यंत जवळच्या व्यक्तीची खोपडी (कवटी) गळयात अडकवून ती पाठीवर सतत तशीच राहू देतात. त्यामुळे

त्या व्यक्तीचे स्मरण सतत राहते शिवाय रोग, व्याधीपासून बचाव होतो (अशी त्याची समजून आहे)

ओंगी लोक काचेच्या साह्याने छानपैकी हजामत करतात नवीन जन्मलेल्या बालकास प्रथम 'मातीचा लेप' देतात वेळप्रसगी झाडपाल्याने सुद्धा झाकतात (हवा पाण्यापासून सरक्षणासाठी) बालवयात त्याचा फार लाड करतात. लहानपणीच तीरकमान चालवावयास शिकवितात बाळतपण, वृद्ध स्त्रियाच करतात बाणाच्या साह्याने मासळीची शिकार करतात. शिवाय शिकार करणे, पोहणे वगैरे गोष्टी त्याना लवकरच अवगत होतात आजकाल ते आपल्या रोजच्या उपयोगात चहा, तादूळ, कधीकधी गहू पण आणतात. अशा तऱ्हेने ओंगी आधुनिक जगात प्रवेश करून जीवन जगत आहेत त्याच्यापैकी जवळपास ८ लोकांनी पोस्टात बचत खाते सुद्धा सुरू केलेले आहे

पोर्ट-ब्लेअरला कोणी V I P आले की, त्याना दाखविण्यास ओगीना येथे आणतात किंवा V. I P ना तेथे त्याच्या वस्तीत घेऊन जातात सप्टेंबर ७७ ला भारताचे त्या वेळचे गृहराज्य मत्री श्री धनिकलाल मडल आले असताना १५–२० ओगीना पोर्ट-ब्लेअर येथे आणले होते त्या वेळी सुदैवाने मला (लेखकाला) ते बघावयास मिळाले एरवी त्यांना बघता येत नाही कारण त्याना सामान्य जनतेमध्ये फारसे मिसळू देत नाहीत. आणि सामान्य माणसास तेथे म्हणजे डुगाँग क्रीक द्वीपावर जाता येत नाही उद्देश, "त्याच्यामध्ये रोग पसरू नये आणि त्याच्या लोकसख्येवर परिणाम होऊ नये हाच आहे" तेथे जाण्यास प्रशासनाची खास परवानगी घेतल्यास जाता येते

(३) **ग्रेट अदमानी**– ह्या आदिम जनजातीची लोकसख्या १९०१ च्या जनगणनेनुसार ६२५ होती त्यानतर ती कमी कमी होत गेली डिसेंबर १९७८ मध्ये त्याची लहान मोठ्यासह सख्या २४ होती परतु डिसेबर ७८ च्या पहिल्या आठवड्यात एका ग्रेट अदमानी महिलेने कित्येक वर्षांनतर एका नवजात बालकास जन्म दिला व त्यामुळे त्याची सख्या २५ झाली आहे. नूतन बालक जन्मल्यामुळे त्या लोकांमध्ये खूपच आनद झाला होता (या नूतन बालकाच्या आगमनाने या लोकाना झालेल्या आनदाची

बातमी एक विशेष म्हणून आकाशवाणी दिल्लीवरून प्रसारित होणाऱ्या 'लोकरुची समाचार' मध्ये सुद्धा प्रसारित झालेली आहे ) हे लोक सुद्धा वर्णाने काळे असून शरीराने सर्वसाधारणच आहेत पुरुष ५ फुट उंचीचे तर स्त्रिया ४ फुट ७ इंच उंचीच्या आढळतात ठराविक वयानंतर बरेच लोक लठ्ठ झाल्याचे आढळून आले आहे पुरुष तथा स्त्रियासुद्धा विड्या ओढतात त्यांची मुले बुद्धिमान आढळून आली आहेत थोडा रागीटपणा सुद्धा त्यांच्या अंगी आहे त्यामुळे कधी कधी खून पण करतात त्याना स्त्रियांचे आकर्षण आढळून आले आहे मुलाचा त्याना अभिमान वाटतो. शरीरातील दुखणे, डोकेदुखी, रक्तस्राव वगैरे प्रकार जेथे होतात तेथे ते मेलेल्या माणसाची हाडे बांधतात

कांही झाडपत्ती सुद्धा ते औषधी म्हणून उपयोगात आणतात हे लोक झाडावर चढण्यात फार पटाईत आहेत त्याची अंडाकृती झोपडी असते तिला भिंतीचा आधार वगैरे काहीच नसतो ती लाकडाच्या साह्याने उभी केलेली असते व तिचा आकार चार फुट लांब नि तीन फुट रुंद असतो ते झोपडी अत्यंत दाट जंगलात बांधत कारण वादळी वाऱ्यापासून तिचा बचाव व्हावा याकरिता बांबूपासून तयार केलेली चटई ते झोपडीकरिता वापरतात ते लोक स्वर्ग, नरकवगैरे गोष्टी मानत नाहीत मेलेल्या मुलाचे नाव त्यानंतर जन्मलेल्या मुलास देतात ते फार बोलके आढळून आले आहेत ते अत्यंत निष्काळजी आहेत वयस्कराना नेहमी मानतात नवरा–बायको एकत्र जेवतात परस्त्री वयाने लहान असल्यास तिला नावानेच बोलावितात आता कुठे ते माणसाळलेले आहेत त्यापैकी काहीजण अंदमान प्रशासनात बुश पोलिसाची नोकरी करतात त्याचे मुख्य 'आटोप' हे गृहस्थ असून त्याचे वय एप्रिल ७८ ला ६७ वर्षाचे होते पूर्वी ते मध्य-अंदमानमध्ये इतरत्र पसरलेले होते. परंतु अंदमान–निकोबार प्रशासनाने त्याना १९७० ला एकत्र करून 'स्ट्रेट द्वीपावर' वसविले आहे त्याची तेथे एकूण आठ कुटुंबे आहेत

त्यांचा पहिल्या प्रथम मानवासी संपर्क इंग्रजाच्या काळातच आला होता व तेव्हापासून ते माणसाना ओळखतात आता तर ते पूर्णपणे माणसाळलेले आहेत सुधारलेल्या संस्कृतीपासून बरेच काही शिकले आहेत

ते अन्न खातात विशेषत तांदूळ त्याचबरोबर डुकराचे मास, कासव, सरडा, जगली माजर शिवाय फळे, फुले, मुळे, मध पण खातात त्याना अन्न अत्यत गरम गरम हवे असते ते ४–५ मिळून शिकारीस जातात. शिकार कुत्र्याच्या मदतीने करतात डुकराच्या मागावरून ते त्याचा शोध काढतात सायकाळपर्यंत शिकार करून परत येतात विशेषत सायकाळचे जेवण मुख्य असते दुसऱ्या दिवसाची अजिबात काळजी करत नाहीत. जेवणानतर नाचणे, गाणे आणि शिकारीचे अनुभव इतराना सागणे ही त्याची दिनचर्या

त्यांना विस्तवाची उत्पत्ती माहीत नसल्यामुळे हजारो वर्षांपासून ते विस्तव सतत राखून ठेवतात मुळीच विझू देत नाहीत प्रत्येक झोपडीत (घरात) विस्तव आढळून येतो शिकारीव्यतिरिक्त झोपडी बांधण्यासाठी सामान एकत्र करणे, लहान नौका तयार करण्यासाठी लाकूड शोधणे ही पण कामे करतात त्याच्यापैकी काहीना तीनपेक्षा जास्त अंक मोजता येत नाहीत ते जेवणात मीठ वापरत नाहीत त्यांच्यात कित्येक वर्षांनतर मे १९७९ मध्ये लग्न झाले आहे लग्नपद्धती अत्यत सोपी आहे वधूला एका झोपडीत बसवितात आणि नतर 'वर' तेथे जाऊन तिच्या मांडीवर बसतो, त्या वेळेस ती दोघे पति-पत्नी बनतात आता आता कुठे ते स्ट्रेट द्वीपावर कोंबड्या, बकऱ्या गायी पाळतात त्याच्यासाठी तेथे अदमान प्रशासनातर्फे २ विहिरी, एक सार्वजनिक हॉल आणि घरे बाधून दिली आहेत त्याच-प्रमाणे प्रशासनाकडून त्याच्यासाठी तेथे लोखडापासून तीर, कमान, मासे पकडण्यासाठी लागणारा गळ वगैरे तयार करण्याचा एक छोटासा लघुउद्योग सुरू करण्यात आलेला आहे

(४) **सॅन्टीनली**– ह्या आदिम जनजातीचे लोक सख्येने सध्या अदाजे १०० आहेत ज्या द्वीपावर ते राहतात ते द्वीप 'उत्तर सेन्टीनल' हे आहे ह्या आदिवासीच्या बाबतीत मानवशास्त्रज्ञाच्या (Anthropoeodist) असा विश्वास आहे की, 'ते सुद्धा जारवाच्याच जातीचे एक अग असून रानटीच अवस्थेत जीवन जगतात त्याच्या बाबतीत सुद्धा सद्भावनायुक्त वागणूक केली, परतु त्यांना अजूनही सुसस्कृत बनविता आले नाही ते सुसस्कृत माणसाना आपले वैरी समजतात त्याना सुसस्कृत बनविण्यात

यश आले नाही. म्हणून सरकारतर्फ असा निर्णय घेण्यात आला, की त्यांना आहे त्याच बेटावर राहू द्यावे काहीही बिघाड न करता फक्त त्यांना हव्या असलेल्या वस्तू भेट म्हणून टाकत राहावयाच्या ' त्याच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधता न आल्यामुळे त्याच्याविषयीची माहिती सुद्धा जास्त प्रमाणात उपलब्ध नाही.

**निकोबार द्वीपसमूहातील आदिवासी**

(१) **निकोबारी–** निकोबारी ही आदिवासी जमात भारतातील सर्व जमातींपैकी सर्वांत पुढारलेली जमात आहे मानवशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून निकोबारी आदिवासी हे पॉलिनेशीय गटाचे आहेत. बाह्य संपर्कापासून आणि प्रभावापासून हे अलिप्त नि अभाप असले तरी, त्यांना मुळीच रानटी म्हणता येणार नाही या प्रकारचे आदिवासी दक्षिण पूर्व आशियात पसरलेले आहेत.

' टॉलेमी ' ह्या शास्त्रज्ञाच्या मते निकोबारी आदिवासी या द्वीपांवर २,००० वर्षांपासून तरी असावेत असा अंदाज केला आहे निकोबारी लोकांची लोकसंख्या १९७१ च्या जनगणनेनुसार १७,८७४ आहे त्यांच्यात साक्षरतेचे प्रमाण १८ टक्के आढळून आले आहे गेल्या तीन दशकापासून निकोबारी ख्रिश्चन धर्माला मानतात ' बिशॉप जॉन रिचर्डसन ' ह्यांनी या लोकामध्ये शिक्षणाचा प्रसार केला त्यांना एकजुटीने राहून काम करावयास शिकविले त्यानीच ह्या आदिवासींची एवढी प्रगती घडवून आणली व म्हणूनच निकोबारी त्याना परमेश्वर मानतात आणि म्हणून जेव्हा ३ जून १९७८ रोजी ' बिशॉप जॉन रिचर्डसन ' खीस्तवासी झाले तेव्हा शेकडो निकोबारी अक्षरश रडले होते

निकोबारी समाजामध्ये ' ग्राम परिषद ' (ग्रामपंचायतीसारखी) बघावयास मिळते खेडयातील ग्रामपंचायतीच्या मुख्य माणसास आपल्याकडे (महाराष्ट्रात) 'सरपंच' म्हणतात परंतु निकोबारमध्ये त्या मुख्य माणसास ' कॅप्टन ' म्हणतात अनेक ग्रामपरिषदा मिळून ' द्वीपपरिषद ' बनवितात व त्यामध्ये सामील असलेल्या कॅप्टनामधून एकास ' मुख्य कॅप्टन ' निवडतात आणि जर का स्त्री–उमेदवारास निवडल्या गेले तर तिला ' मुख्य कॅप्टन ' ऐवजी ' राणी ' म्हणून ओळखतात सध्या निकोबार ग्रूपमध्ये ' नानकौरी '

येथे एक राणी आहे या जमातीत स्त्रियाना पुरुषाबरोबरीचे अधिकार देतात निकोबारीसुद्धा झोपडयालच राहतात त्याची झोपडी जमिनीपासून लाकडाच्या आधारे उभी केलेली असते व त्यावर कधीकधी दोन–दोन मजलेसुद्धा उभारतात ही झोपडी आकाराने गोल असते निकोबारी आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण बरेच वाढल्यामुळे ते आधुनिक तऱ्हेने राहतात. पुरुष शर्ट, पॅन्ट तर स्त्रिया कमरेभोवती चट्ट्या–पट्ट्याचा कपडा झग्यासारखा गुडाळतात आणि वर ब्लाऊज घालतात आजकाल बरेच लोक अंदमान प्रशासनात नोकरीला आहेत खेळ-कूदमध्ये निकोबारी बरेच पुढे आहेत त्याचा सर्वात आवडता खेळ फुटबॉल हा आहे

हे लोक रगाने गोरे नि चपटया चेहऱ्याचे व बसक्या नाकाचे असून शरीराने मजबूत परतु उचीने सर्वसाधारण आढळतात ते तांदूळ, मासे, डुकराचे अर्धकच्चे मास फार पसत करतात त्याच्या रोजच्या जेवणात नारळाचे प्रमाण जास्त आढळते ते डुकरांना सुद्धा नारळ खाऊ घालतात निकोबारी लोक कुटीर उद्योगात बहुसख्येने काम करतात त्याचप्रमाणे नारळ गोळा करणे व ते को–ऑपरेटिव्ह सोसायटीला विकणे, नारळापासून खोबरे काढणे, नारळाच्या काथ्यापासून दोर तयार करणे वगैरे उद्योग करतात

शासनातर्फे त्याच्यासाठी कापटचे, शिलाईचे ट्रेनिग सुरू करण्यात आले असून त्याना ट्रेनिगनतर स्वतत्र उद्योग करण्यासाठी शासन मदत करीत आहे अशा तऱ्हेने निकोबारी आदिवासी जमात झपाटयाने प्रगती करीत आहे

(२) शॉम्पेन– निकोबार द्वीपसमूहातील ही दुसरी आदिवासी जमात हे लोक ग्रेट निकोबारच्या पूर्व–पश्चिम भागात विखुरलेले आहेत त्यांची एकदर लोकसख्या एप्रिल ७१ मध्ये फक्त ९२ होती ते रगाने ग्रेट अदमानीसारखेच काळे असून शरीराने सडपातळ आहेत परतु शॉम्पेन स्वभावाने मात्र फारच लाजाळू आहेत काही लोकांच्या बाबतीत केसाचा टोपच आढळतो (सत्य साईबाबासारखा) ते सध्या माणसाळलेले असून मधून मधून सेट्लर सैनिकांच्या ग्रेट निकोबारस्थित वसाहतीत येतात ते शिकार करून आपले अन्न मिळवितात मध गोळा करणे हा त्याचा मुख्य उद्योग असतो ते थोडया प्रमाणात नारळाची बाग पण करतात त्याचा अल्पसा व्यापार ग्रेट निकोबारमधील लोकांशी आहे

तेसुद्धा झोपडीतच राहतात त्याची झोपडीसुद्धा निकोबारी आदि-वासीच्या झोपडीच्या तुलनेने अत्यंत उंच उभारलेली असते तीसुद्धा लाकडाच्याच साह्याने उभी केलेली असते झोपडीचा आकार लांबट असतो परंतु निकोबारीची झोपडी गोल असते, शिवाय कमी उंच असते झोपडीत प्रवेश करण्यासाठी शिडीचा उपयोग करतात

यांपैकी काही लोक नग्नच राहतात तर अत्यंत मोजके लोक कपडे वापरतात

मार्च १९७६ पासून संपूर्ण द्वीपसमूहातील आदिम जनजातीच्या कल्याणासाठी एक ' आदिम जनजाती विकास समिती ' स्थापन केली असून त्याद्वारे सर्वतोपरीने त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केल्या जात आहेत या समितीद्वारा आदिम जनजातीच्या कल्याणकारी कार्यासाठी सहाव्या पंच-वार्षिक योजनेत १५ योजना ' योजना आयोगाकडे ' सादर केल्या होत्या. त्यांपैकी आयोगाने १४ योजनांसाठी मंजुरी देऊन ४१.४३१ लाख रुपयांची मंजुरी दिली आहे याशिवाय ' अॅन्थ्रापॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया ' द्वारा त्यांच्या जीवनाविषयी सखोल अभ्यास केला जात आहे

○ ○

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
691
क्र. 23306
भू प्रवास
20/9/01

प्रकरण ५

# स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेली प्रगती

१९४५ ला दुसरे महायुद्ध सपले. युद्ध सपल्यानतर बंदी केलेल्यांना सोडून देण्यात आले त्यांपैकी ज्यांना मुख्य भूमीला (हिन्दुस्थानात) परत जायचे होते, त्यांना सरकारी खर्चाने पाठविण्याची सोय करण्यात आली. परतु बऱ्हशी बदी समाजाच्या भीतीमुळे म्हणजेच समाजातील लोक २४–२५ वर्षांची सजा भोगून आल्यामुळे सतत टोचतील, हमेशा अपमानित करतील आणि अपमान सहन करावा लागेल म्हणून परत न जाता येथेच स्थायिक झाले सरकारने त्याना स्थायिक होण्यासाठी खर्च दिला

अदमान–निकोबार द्वीपसमूहात स्थायिक झालेल्यांची दोन विभागात विभागणी केली जाते (१) स्वातत्र्यापूर्वी स्थायिक झालेले आणि (२) स्वातत्र्यप्राप्तीनतर स्थायिक झालेले

स्वातत्र्यापूर्वी स्थायिक झालेल्यापैकी—

(अ) **मोपलास**– मलबारमध्ये मोपला लोकांविरुद्ध झालेल्या सघर्षात जवळपास १,४०० लोकांना बदी करून १९२२ च्या आसपास अदमानला आणले होते त्यानतर १९२६ ला काही स्वखुशीने परत गेले आणि बाकीच्यांना स्वावलबी दर्जा देऊन स्थायिक केले त्यांपैकी अधिकतर मुस्लिम धर्माचे पालन करतात

(ब) **कारेन्स**– या लोकांना 'बैसीन' या ठिकाणाहून १९२५ ला येथे काही शर्तींवर आणले होते त्यांना जमीन देण्यात येणार होती [illegible]

वनविभागात काम. हे लोक त्या वेळी कैदी म्हणून नव्हे, तर स्वतंत्र सेट्लर म्हणून आले यापैकी बऱ्हशी ईसाई धर्माला मानतात ह्या लोकात शिस्त आणि दुसऱ्याशी विनम्रपणे वागण्याची वृत्ती आढळते

(क) **बर्मी-** बर्मी लोकांना बहुसंख्येने बंदी बनवून आणले होते. (जेव्हा काही काळ अंदमानचा कारभार रंगून चीफ कमिशनरांच्या आधीन होता त्या वेळी कैदी येथे पाठवीत होते ) बर्मी लोकांना येथील हवामान योग्य वाटले प्रथमत. १९०७-८ ला कैदी थोड्या प्रमाणात पाठविले परंतु १९२३ ला ते जास्त प्रमाणात पाठविण्यात आले. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही कैदी परत बर्माला गेले (सध्याचा ब्रह्मदेश) आणि काही याच द्वीपावर स्थायिक झाले

(ड) **भांटूस-** हे लोक पूर्वी उत्तर प्रदेशातील मुरादाबाद जिल्ह्याच्या आसपास डाकेगिरी, चोरी, लुटारू धंदे करून उपजीविका करत होते १९२६ ला त्यांच्यापैकी बऱ्हशी लोकांनी अंदमानला जाऊन सजा भोगण्याची तयारी दर्शविली आणि तेव्हापासून ते या द्वीपावर आलेले आहेत येथे आल्यावर त्याचा खरा उद्धार झाला आणि ते सन्मानित शेतकरी बनलेत. स्त्रिया उत्तर प्रदेशातील पद्धतीचा पोषाख परिधान करतात शिवाय पुरुषांच्या बोलण्यात उत्तर प्रदेशातील प्रभाव आढळून येतो

तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर म्हणजेच १९४७ च्या नंतर स्थायिक झालेल्यापैकी जास्त संख्येने बंगाली निर्वासित (रिफ्युजी) आहेत ते दक्षिण, उत्तर आणि मध्य अंदमानमध्ये वसलेले आहेत पूर्वी मोठ्या संख्येने ते भूमिहीन मजूर होते परंतु येथे ते प्रथमत च जमिनीचे मालक बनले आहेत. (सरकारने दिलेल्या ) सध्या ते आपली उपजीविका मेहनत करून व्यवस्थित करीत आहेत

त्यानंतर तामील, तेलगू लोक मजुरीसाठी तर काही हमाली आणि व्यापाराच्या दृष्टीने येथे आले होते शेवटी ते इकडेच स्थायिक झाले त्यापैकी काहीजण लहान-मोठा व्यापार करतात तर काही अजूनही मेहनतीची कामे करतात

तसेच संपूर्ण द्वीपसमूहात माजी सरकारी नोकराना स्थायिक करण्यात आले असून त्यांची जवळपास १,६०० कुटुंबे आहेत त्यापैकी भारत सर-

कारच्या 'पुनर्वास' विभागातर्फे माजी सैनिकांना ग्रेट निकोबारच्या 'कॅम्पबेल बे' ह्या ठिकाणी वसविले आहे भारतातील पंजाब, केरळ, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, बिहार, आसाम, तामीळनाडू, उत्तरप्रदेश आणि मध्य-प्रदेश ह्या नऊ राज्यांतील माजी सैनिक आहेत त्यांची तेथे एकूण ३०० कुटुंबे आहेत (मार्च ७८ अखेरपर्यंत). त्यांपैकी ५० कुटुंबे महाराष्ट्रीयन आहेत त्यांना १९६९ पासून तेथे वसविण्यात सुरुवात केली आहे प्रथम त्यांना सरकारतर्फे प्रत्येकी ५ एकर पॅडी लँड आणि ५ एकर बागायती जमीन शिवाय १ एकर घर बांधणीसाठी, अशी एकूण ११ एकर जमीन दिली पहिल्या वर्षी पूर्ण कुटुंबाला पुरेल एवढे रेशन, दुसऱ्या वर्षी पाऊणपट रेशन आणि तिसऱ्या वर्षी अर्धे रेशन दिले याशिवाय काही घरगुती सामान, घर बांधणीसाठी ५ हजार रुपये व सतत तीन वर्षे शेतीची मशागत करून दिली काही शेती-उपयोगी अवजारे दिली आणि सर्व लागवडीचा प्रारंभिक खर्च सरकारनेच केला सध्या बव्हंशी कठोर मेहनत करून तांदळाची, नारळाची, भाजीपाल्याची, तर काही मसाल्याच्या पदार्थांची पण उपज करतात आजकाल सरकारतर्फे त्यांना तेथे शिक्षण, वैद्यकीय सेवा, परिवहन आणि शेतीविषयीचे मार्गदर्शन वगैरे सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रामुख्याने पुढील क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती झाल्याचे दिसून येते

(१) **शिक्षण**– इंग्रजांच्या काळात संपूर्ण द्वीपसमूहातून फक्त एकच सरकारी शाळा पोर्ट-ब्लेअर येथे होती निकोबार ग्रूपमध्ये ईसाई मिशन-ऱ्याची दुसरी खाजगी शाळा होती त्यामध्ये 'सालोमन' दापत्य आणि 'बिशॉप जॉन रिचर्डसन ह्यांचे सहकार्य लाभत होते पोर्ट-ब्लेअर येथील शाळेत परदेशी स्त्री-शिक्षिका शिकवत होती शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असणे साहजिकच होते त्यानंतर जपान्यांचे आधिपत्य इ स १९४२ ला ह्या द्वीपावर होते त्यामुळे त्यांनी शाळामधून जपानी भाषा शिकविण्यास भाग पाडले त्यानंतर १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले नंतर मात्र शिक्षणपद्धतीत उल्लेखनीय प्रगती झाली ४७ साली पूर्ण द्वीपसमूहात १ हायस्कूल आणि ८ प्राथमिक शाळा होत्या परंतु त्याची संख्या (एप्रिल ७८ पर्यंत) २२५ झाली असून ती पुढीलप्रमाणे विभागल्या गेली आहे

(१) दक्षिण अदमानमध्ये एकून शिक्षणसस्था ९९ आहेत

(२) मध्य अदमानमध्ये त्याची सख्या ३७ आहे

(३) उत्तर अदमानमध्ये ती ५३ आहे शिवाय निकोबार ग्रूपमध्ये एकूण ३६ शिक्षण सस्था (शाळा) आहेत

दक्षिण अदमानातील ९९ पैकी पोर्ट-ब्लेअर शहरात ६ हायर सेकन्डरी स्कूल्स, तीन हायस्कूल्स, पाच ज्युनिअर बेसिक स्कूल्स, सात सिनिअर बेसिक स्कूल्स, एक टिचर्स ट्रेनिग स्कूल आणि लहानासाठी बालक मदिरे नि प्रायमरी शाळा पुष्कळच आहेत

शिवाय पोर्ट-ब्लेअर येथेच पूर्ण द्वीपसमूहासाठी फक्त एकच डिग्री कॉलेज आहे कॉलेजची स्थापना २० आक्टोबर ६७ ला झाली आजकाल कॉलेजमध्ये सरासरी ४५०—५०० विद्यार्थी शिक्षण घेतात कॉलेजमध्ये कॉमर्स, सायन्स, कला, होमसायन्स, सगीत वगैरे विभाग आहेत जुलै ७८ पासून सायकालीन पोस्ट-ग्रॅज्युएटचे, अर्थशास्त्र व इग्रजी या विषयाचे वर्ग सुरू झाले आहेत कॉलेज 'पजाब विश्वविद्यालय, चडीगड'शी सलग्न आहे द्वीपसमूहात साक्षरतेचे प्रमाण १९७१ च्या जनगणनेनुसार ४३ ५९ टक्के आहे डिग्रीनतरचे शिक्षण घेणाऱ्यांसाठी प्रशासनातर्फे मुख्य भूमीवरील वेगवेगळ्या कॉलेजामध्ये जागा राखून ठेवतात उदा मेडिकल, इजिनिअरिंग, कृषी, नर्सिंग, व्हेटरनरी, बी एड, प्रिंटिंग टेक्नॉलॉजी इत्यादी आणि म्हणूनच 'स्थानिक लोक' इजिनिअर, डॉक्टर, वकील, प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करतात मुख्यभूमीवरील माणसांना ही स्थिती पाहून नवल वाटल्याशिवाय राहत नाही

(२) **वैद्यकीय सेवा—** १८ व्या आणि १९ व्या शताब्दीत अदमान—निकोबार द्वीपसमूह म्हणजे बिमारीचे घरच होते १८ व्या शताब्दीत जेव्हा लेफ्ट आर्चीबाल्ड ब्लेअरने पहिली वसाहत बसविली तेव्हा त्या लोकांना पण 'उष्ण कटिबधीय' वातावरणामुळे अनेक रोगाचे शिकार व्हावे लागले १९ व्या शताब्दीत हजारो बदी आणि आदिवासीनी आपले प्राण मलेरिया, फायलेरिया या रोगांमुळे गमावले

निकोबार द्वीपसमूहात 'यॉ' नावाच्या बिमारीने कित्येक लोकाचे प्राण घेतले इग्रजांनी भरमसाठ प्रयत्न केले आरोग्याविषयीचे नियम

बनविले दवाखाने उघडले परंतु खरी प्रगती स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच झाली

१९४५ च्या शेवटी पूर्ण द्वीपसमूहात फक्त तीन दवाखाने होते आणि ६ डिस्पेन्सरीज् होत्या परंतु आज १३ दवाखाने, २ प्रायमरी हेल्थ सेन्टर्स आणि ६२ डिस्पेन्सरीज् आहेत. (येथील डॉक्टराचे प्रमाण २,००० लोकांना एक याप्रमाणे आहे )

सर्वांत मोठे हॉस्पिटल पोर्ट-ब्लेअर येथील ' जी बी पंत ' हे होय येथील एकूण बेड्सची संख्या जवळपास २५० आहे टी बी हॉस्पिटल, आयसोलेशन हॉस्पिटलसुद्धा लागूनच आहेत या दवाखान्यांमध्ये (१) सर्जिकल स्पेशालिस्ट, (२) मेडिकल स्पेशालिस्ट (दोन पोस्ट), (३) गायनॉकॉलॉजिस्ट, (४) आय स्पेशालिस्ट, (५) नाक, कान, घसा याचे स्पेशालिस्ट, (६) स्किन स्पेशालिस्ट, (७) डेन्टल स्पेशालिस्ट, (८) चिल्ड्रन स्पेशालिस्ट, (९) पॅथॉलॉजिस्ट, (१०) ॲनॅस्थेटिस्ट, (११) फिजिओथेरापिस्ट वगैरे स्पेशालिस्ट असून मेडिकल वार्ड नं १ आणि नं. २, फिमेल वार्ड, चिल्ड्रन वार्ड, सर्जिकल वार्ड, स्पेशल वार्ड, नर्सिंग होम, मॅटर्निटी होम हे वार्डस् आहेत या दवाखान्याची देखरेख मेडिकल अधीक्षक बघतात अशाच तऱ्हेचे एक हॉस्पिटल कार-निकोबारलासुद्धा आहे परंतु बेड्सची संख्या कमी आहे दोन स्पेशालिस्ट सोडून इतर स्पेशालिस्टची ६ व्या पंचवार्षिक योजनेत पूर्तता करण्यासाठी अंदमान प्रशासन अत्यंत प्रयत्नशील आहे द्वीपसमूहातील प्रत्येक दवाखान्यातून, डिस्पेन्सरीतून महागात महाग औषधसुद्धा फुकटात पुरवितात बाहेरील द्वीपावर जर का रोगाचा इलाज होऊ शकला नाही तर त्या रोग्यास पोर्ट-ब्लेअरच्या ' गोविंद वल्लभ पंत ' हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात येते आणि कदाचित पोर्ट-ब्लेअरलाही इलाज होऊ शकला नाही तर त्या रोग्यास मुख्यभूमीवरील विशेषत: कलकत्ता किंवा मद्रासच्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये सरकारी खर्चाने स्थानांतरित करतात समजा, रोगी जास्तच सिरियस असला तर कधी कधी विमानाद्वारा कलकत्त्यास पाठवितात (एरवी जहाजाने)

सहाव्या पंचवार्षिक योजनेत येथील दवाखान्यांचा आणखी विस्तार करण्यात येणार आहे आरोग्य खात्यामार्फत एक होमिओपॅथिक डिस्पेन्सरी पोर्ट-ब्लेअर येथे चालविल्या जाते बाहेरील द्वीपावरील मायाबन्दर, दिग्लीपूर,

रगत, कार-निकोबार, कॅम्पबेल बे वगैरे ठिकाणच्या दवाखान्यात नवीन स्पेशालिस्टच्या पोस्ट भरून सोयी उपलब्ध करण्याचा प्रशासनाकडून जोरदार प्रयत्न केला जात आहे द्वीपसमूहात अन्नभेसळ प्रतिबधक कायदासुद्धा अमलात आहे

पूर्वीप्रमाणे मलेरियाचे प्रमाण आता राहिले नाही आजकाल स्वास्थ्य विभागाच्या ' मलेरिया निर्मूलन युनिट ' तर्फे वर्षातून दोन वेळा तरी डी डी टी चा फवारा मारल्या जातो आणि पूर्ण द्वीपसमूहात मलेरिया वर्कर्स काम करीत असून मलेरियावर मात केली आहे अदमानला आल्यानतर प्रत्येकाला मलेरिया होतोच ही मुख्यभूमीवरील जनतेची समजूत सपशेल चूक आहे १९७८ सालात एकूण ५८,६६० ब्लड स्लाईड्स तपासल्या गेल्या त्यापैकी फक्त २,८०२ केसेसमध्ये मलेरियाचे जन्तू आढळून आले परतु औषधोपचारानतर त्यावरही मात केली गेली परिवार-नियोजन कार्यासाठी एक पूर्ण वेळ काम बघणारी स्त्री डॉक्टरची नेमणूक केलेली आहे

परिवार-नियोजनास चागलाच प्रतिसाद मिळत आहे. कुष्ठ रोगाच्या उपचारासाठीसुद्धा चार ठिकाणी केन्द्रे उघडून उपचार करण्यात येतो १० मुलीना दरवर्षी मिडवाईफचे ट्रेनिग दिले जाते

(३) **कृषी**– हे द्वीप डोंगराळ असल्यामुळे येथे कृषीयोग्य जमीन फारसी नव्हती परतु स्वातन्त्र्यप्राप्तीनतर तज्ज्ञाच्या सल्ल्यानुसार जेथे शेतीलायक जमीन करता येईल, वेळ प्रसगी जगल साफ करून त्या ठिकाणी शेती करण्यास प्रारभ केला. स्थायिक करण्यात आलेल्यांना काही प्रमाणात सपाट, तर काही पहाडी जमीन देऊन उत्पन्न काढावयास शिकविले. निकोबार द्वीपसमूहातील बव्हंशी भाग सपाट असून शेतीयुक्त आहे परतु अदमान द्वीपसमूहात डोगराळ भाग जास्त असूनसुद्धा बऱ्याच मोठ्या प्रमाणात वेगवेगळे धान्य पिकवितात. पूर्ण द्वीपसमूहात ६१,२२३,२९ हेक्टर जमीन शेतीच्या उपयोगात आणण्यासारखी आहे आताही पुढीलप्रमाणे वेगवेगळी पिके तेथे काढतात.

**तांदूळ**– येथे मुख्य आणि मोठ्या प्रमाणात काढण्यात येणारे पीक म्हणजे तांदळाचे पीक आहे आणि ते एकूण १०,०५९ (दहा हजार एकोणसाठ) हेक्टरमध्ये घेतल्या जाते.

**रबर**– एकदर ७४४ हेक्टरमध्ये रबराच्या झाडाची लागवड केली असून एकूण झाडाची सख्या 'शैतानखाडी' येथील रबराच्या बगीच्यात १,८०० आणि 'मगलूटांग' येथील बगीच्यात ८,७०० आहे याशिवाय निकोबार ग्रूपमधील 'कचाल' येथील बगीच्यात यापेक्षा दुप्पट झाडे आहेत या बगीच्यातून १९७६ साली कच्चे रबर जवळपास ६०,००० (साठ हजार) किलो काढण्यात आले होते (रबर बगीच्यास भेट देण्याची संधी मला पण मिळाली तेथील काम कसे चालते, कच्चे रबर कसे तयार करतात वगैरेचे अवलोकन करावयास मिळाले )

**सुपारी**– सुपारीची लागवड जास्त प्रमाणात निकोबार ग्रूपमध्ये आणि थोडया प्रमाणात अदमान ग्रूपमध्ये केली जाते त्यासाठी एकूण १,६५० हेक्टर जमीन उपयोगात आणलेली आहे येथील सुपारीची दरवर्षी कलकत्ता–मद्रासला निर्यात केली जाते

**नारळ**– नारळाची लागवड जवळपास १,९५२ हेक्टर जमिनीत केल्या जाते दरवर्षी खोबरे कलकत्ता–मद्रासला पाठवितात लवकरच द्वीपसमूहात खोबऱ्यापासून तेल काढण्याचा मोठ्या प्रमाणात कारखाना उभारण्यात येणार आहे

**मसाले**– ३६४ ८६ हेक्टर जमिनीत मसाल्याचे उत्पन्न काढतात यामध्ये लवगा, विलायची, दालचिनी, काळे मिरे, जायफळ, हळद वगैरे मसाल्याचे प्रकार असतात

**फळे**– १,०५४ हेक्टर जमिनीमध्ये फळाची लागवड केल्या जाते. त्यामध्ये प्रामुख्याने निबू, पपई, अमरूद (जाब), चिकू, सत्रे, मोसबी, अननस, लाल केळे, याशिवाय ६६ ८९ हेक्टरमध्ये उसाचे आणि ३१ ५० हेक्टरमध्ये मक्याचेसुद्धा उत्पन्न काढतात

**भाजीपाला**– ७२८ हेक्टर जमिनीत पूर्ण द्वीपसमूहातून भाजीपाला उगवतात (तशी भाजीपाल्यासाठी जमीन मुळीच उपयुक्त नाही ) त्यामध्ये प्रामुख्याने वांगी, भेंडी, मुळे, शेवग्याच्या शेगा, देवडागर (फुल कोबी अल्प प्रमाणात होते), टमाटे वगैरे मोठ्या प्रमाणात पिकवितात व बाजारपेठेत उपलब्ध असतात परतु नवलाची गोष्ट अशी की, कांदा आणि बटाटा अजिबात पिकत नाही (सध्या बटाटयाच्या उत्पन्नावर येथील 'शेतकी

अनुसधान सस्थान ' प्रयोग करीत असून त्याना अल्प प्रमाणात यश आले आहे ) म्हणून या वस्तूना मुख्य भूमीवरून आयात करावे लागते ज्या दिवशी जहाज मुख्य भूमीवरून पोर्ट-ब्लेअरला येते तेव्हा चार-सहा दिवस भरपूर प्रमाणात कांदे, बटाटे मिळतात (कधी कधी टचाई निर्माण होते म्हणून १५–२० किलो कादे आणि तितकेच बटाटे एकदमच खरेदी करताना बरेचदा बघावयास मिळते ) इकडे पिकविला जाणारा भाजीपाला स्वस्त मिळतो परतु मुख्य भूमीवरून येणारा सर्वच माल निश्चितच महाग मिळतो.

(४) **वनसपदा**– सपूर्ण अदमान–निकोबार द्वीप-समूहाचा ८,२९३ चौरस कि मिटर भूभाग आहे त्यापैकी ७,४३४ चौरस कि मिटर भाग जगलाने व्यापला आहे येथे जगलापासून वेगवेगळ्या प्रकारचे लाकूड मोठ्या प्रमाणात मिळविल्या जाते जगल खात्याची स्थापना १८८३ साली झाली आज जवळपास दरवर्षी १००,००० क्युबीक मिटर लाकूड सरकारी यंत्रणेमार्फत मिळवितात तर जवळपास तेवढेच (१००,०००) क्युबीक मिटर लाकूड खाजगी एजन्सीद्वारा मिळविल्या जाते

जगलातील लाकडाचे लॉग मजुरांकरवी बनवितात नतर ते ट्रक-द्वारा, लोको ट्रामद्वारा, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेतात हत्तीच्या साहाय्याने लॉग जेव्हा ट्रकवर चढवितात, उतरवितात तेव्हाचे ते दृश्य खरोखरच पाहण्यासारखे असते ' राची भैया (राचीचे राहणारे) हत्तीकडून अत्यत कुशलतापूर्वक काम करून घेतात हे काम सकाळपासून दुपारचे बारा वाजेपर्यंत चालते बारा वाजताच (घड्याळ न बघता) हत्ती, सुटीची वेळ झाल्याचे समजतात. त्या वेळेनतर त्याच्याकडून काम करून घेणे अत्यत कठीण असते नतर त्याना जगलात सोडून देतात दुसऱ्या दिवशी परत सकाळी कामास जुपतात जगल खात्यातर्फे त्याच्या खात्यातील हत्ती-द्वारा काही अशी काम करवून घेतात त्याचप्रमाणे काही खाजगी एजन्सी-कडेसुद्धा त्याचे हत्ती आहेत

हत्तीकडून काम करवून घेतानाचे दृश्य ' मधुवन ' आणि ' विम्बर्ली गज,' ' राईटम्यो 'च्या आसपास असलेल्या जगलात बघावयास मिळते तेथेच त्याच्या देखरेखीकरिता व्हेटरनरी दवाखाना, एक व्हेटरनरी सर्जन आणि एक कम्पाउन्डर आहे

अंदमानहून लाकूड मद्रास, कलकत्ता, विशाखापट्टनम् येथे पाठवितात. येथील लाकडापासून रेल्वेचे स्लीपर, घरगुती फर्निचर विशेषत पॅडॉकचे (पॅडॉक लाकूड फक्त अदमानलाच मिळते खूपच सुन्दर फर्निचर होते पण महागही तसेच असते ) इतर प्रकारचे लाकूड इमारतीसाठी उपयोगात आणतात जळाऊ लाकूडसुद्धा मोठ्या प्रमाणात मिळते भारत सरकारने 'लिटल अदमान'मध्ये वुड बेसीसवर आधारित इन्डस्ट्रीसाठी ५ करोड रुपये खर्च करून कारखाना स्थापन करण्यासाठी परवानगी दिली आहे पोर्ट-ब्लेअर येथील सरकारी 'चंथम सॉ मिल'मधूनसुद्धा लाकडाची मोठ्या प्रमाणात विक्री होते

ह्या मिलमधून दरवर्षीचा आऊटटर्न सरासरी २२ हजार क्युबीक मिटर लाकडाचे चौकोनी, ५ चौरस इंचाच्या पाट्या (लॉग) शिवाय फर्निचरसुद्धा तयार केल्या जाते लाकडाचे मोठ मोठे ओंडके मुख्यभूमीवर वाहून नेण्यासाठी शिपिंग कार्पोरेशनचे 'एम व्ही दिग्लीपूर' नावाचे जहाज सतत फेऱ्या करीत असते परतीच्या वेळेस खाद्यान्न वस्तू त्याचद्वारे आणल्या जातात फॉरेस्ट खात्यातर्फे 'डेप्युटी रेंजरचे' ट्रेनिंगसुद्धा दरवर्षी दिल्या जाते

(५) **औद्योगिक क्षेत्र**— फॅक्टरी अॅक्टनुसार द्वीपसमूहात एकदर २३ लहान मोठ्या फॅक्टरीची नोद 'उद्योग सचालकाकडे' असून ६० वुड बेसीसवर आधारित लहान मोठे उद्योग आहेत (लाकूड भरपूर प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे वुड बेसीसवर आधारित कारखाने जास्त असणे साहाजिकच आहे ) त्यापैकी काही फॅक्टरींची नावे—

(१) **वेस्टर्न इंडिया मॅच कपनी (WIMCO) पोर्ट-ब्लेअर**— या फॅक्टरीत फक्त आगपेटी काड्या तयार करून त्या मुख्यभूमीवर निर्यात करतात

(२) **आल्बियन टिम्बर इन्डस्ट्री**— ही इन्डस्ट्री 'मध्य अदमान' मध्ये असून या ठिकाणी प्लाईवुड आणि लाकडी फळ्या तयार करतात

(३) **अदमान टिम्बर इन्डस्ट्री बाम्बू फ्लॅट, पोर्ट-ब्लेअर**— या फॅक्टरीतसुद्धा मोठ्या प्रमाणात प्लाईवुड तयार होते

(४) **जयश्री टिम्बर इन्डस्ट्री**— बकुलतला (मध्य अंदमान) येथेसुद्धा प्लाईवुड तसेच लाकडाचे लॉग आणि पाट्या (तक्ते) तयार केल्या जातात

(५) **सरकारी चॅथम सॉ मिल, पोर्ट-ब्लेअर**— ह्या मिलमध्ये लाकडाचे ५ चौरस इंचाचे लॉग, फर्निचर आणि साधारण तक्ते मोठ्या प्रमाणात तयार केल्या जातात

(६) **सरकारी आरा मिल, बेटापूर**— (मध्य अदमान) येथेसुद्धा लाकडापासून वेगवेगळ्या आकारातील लॉग तयार करून ते मुख्य भूमीवर निर्यात करतात

(७) **आसिया वुड प्रॉडक्ट लघु अदमान**— येथे पण आगपेटीच्या काड्या तथा पेन्सीलसाठी लागणाऱ्या स्टीक तयार करतात याशिवाय लघु-उद्योगात, समुद्रातील सेल्सपासून नक्षीदार वस्तू तयार करणे, लाकडापासून आकर्षक खेळणी बनविणे, नारळाच्या करवंट्यापासूनसुद्धा खेळणी, टेबल लॅम्प तयार करणे, सुटकेस बनविणे, बांबू-केनिंगचे फर्निचर तयार करणे, वेल्डिंग, वाइंडिंगचे काम, स्टीलच्या आलमाऱ्या तयार करणे वगैरे उद्योग आहेत

लघुउद्योगास चालना मिळावी म्हणून

४५ छोटे छोटे उद्योग सुरू करण्यासाठी सुचविले आहेत व ते सुरू करणारास सर्वतोपरीने साहाय्य करावयाचे आश्वासनसुद्धा दिले आहे. पोर्ट-ब्लेअरपासून जवळच गाराचरामा ' येथे एक लहानशी ' औद्योगिक वसाहत ' आहे उद्योग-सचालनातर्फे पोर्ट-ब्लेअर येथे शिंपल्यापासून, लाकडापासून नक्षीदार वस्तू तयार करणे, खेळणे तयार करणे शिवाय शिलाईचे प्रशिक्षण देण्यासाठी एकदर तीन प्रशिक्षण-केन्द्रे आहेत. कार-निकोबारलासुद्धा दोन प्रशिक्षण-केन्द्रे आहेत आणि ' बाराटांग ' द्वीपसमूहात खनिज तेल सापडण्याची शक्यता भूगर्भशास्त्रज्ञांनी सांगितली आहे ' ऑईल अॅण्ड गॅस आयोग ' तर्फे संबंधित

भागात ड्रिलिंगला आरंभ करून मार्च ८० मध्ये गॅस [illegible]
केले आहे परत खोदकामास आरंभ करून आणखी संशोधन करणार आहेत.

(८) **मत्स्य विभाग**— अंदमान-निकोबार द्वीपसमूहाच्या चहूबाजूने समुद्र असल्यामुळे येथे मत्स्य व्यवसायास बराच वाव आहे पूर्वी लोकांना जुन्या पद्धतीने मासे पकडावे लागत (१९५५ पर्यंत) परंतु आजकाल मत्स्य विभागाद्वारा आधुनिक पद्धतीने मासे पकडण्याचे ट्रेनिंग देऊन त्यानुसार मासे पकडावयास लावतात दरवर्षी १०-१५ लोकांना हे ट्रेनिंग स्टायपेंडसह देऊन स्वत.च्या पायावर उभे करतात या खात्यामार्फत पोर्ट-ब्लेअर सोडून

कार-निकोबार, नानकौरी, कॅम्पबेल येथेही ट्रेनिंग सेन्टर्स उघडून हे ट्रेनिंग देण्याची सोय केली आहे सध्या द्वीपसमूहात कोळयांची सख्या १,००० आहे येथून वार्षिक सरासरी १,५०० टन मासे पकडतात

'अदमान सी' मध्ये जवळपास ४० प्रकारचे खाण्यास योग्य असे मासे उपलब्ध आहेत त्यापैकी दहाबारा प्रकारचेच मासे येथे पकडल्या जातात सध्या काही खाजगी सहकारी सस्थानासुद्धा मासे पकडण्याची परवानगी दिली असल्यामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मासे, झिंगे पकडल्या जातात मासे तसे मुख्यभूमीच्या मानाने निमपट स्वस्त आहेत

१९७८ साली टाटा कपनीस मासे पकडण्यासाठी येथील प्रशासनाने लायसेन्स दिले असून त्याच्यातर्फे मासे पकडून पोर्ट-ब्लेअरला आणतात आणि नतर ते पूर्णत बँकॉकला पाठवितात लवकरच 'टूना मासे' डब्यात बद करून ते निर्यात करण्याचा कारखाना द्वीपसमूहात सुरू होण्याची शक्यता आहे अशा तऱ्हेने मत्स्य व्यवसायात दिवसेंदिवस झपाट्याने प्रगती होत आहे

(७) **परिवहन व सचारव्यवस्था**– द्वीपसमूहभर जेथे जेथे शक्य होईल तेथे तेथे जगलाची सफाई करून तर कुठे कुठे पहाड खोदून गावाना जोडण्यात आले आहे स्वातत्र्यप्राप्तीनतर आजपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी १२७ रोडचे निर्माणकार्य पूर्ण झाले असून ते एकदर ५६१ किलोमिटर लाबीचे आहे पोर्ट-ब्लेअरव्यतिरिक्त इतर ठिकाणीसुद्धा बससेवा सुरू आहे परतु जे द्वीप पाण्यामुळे अलग-सलग केल्या गेले आहेत तेथे जाण्यासाठी जहाजाचाच उपयोग करावा लागतो आन्तर्द्वीपीय परिवहन व्यवस्था तीन मोठ्या (साधारणपणे २५० पॅसेंजर्सची क्षमता असलेले) आणि सहा लहान आकाराच्या जहाजांद्वारे करण्यात आली आहे १९ व्या शताब्दीत आतरद्वीपीय जहाज सेवा, विशेषत' निकोबार ग्रूपसाठी फक्त वर्षातून एकच वेळ असायची तीही मार्च महिन्याच्या आसपास. परतु आजकाल दर चार-सहा दिवसानी जहाज असते

याशिवाय पोर्ट-ब्लेअर शहराच्या जवळपासच्या बेटावर जाण्यासाठी 'फेरी बोटीची' व्यवस्था आहे. या बोटीद्वारा २५ ते ६० पैशात एका बेटावरून दुसऱ्या बेटावरील खेड्यात जाता–येता येते वेळ जास्तीत जास्त

अर्धा-पाऊण तास लागतो (आपल्या इकडील सिटीबसेससारखे) याशिवाय वनविभागाकडे, पोलीस खात्याकडे, मरिन विभागाकडे, नेव्हीकडे स्वत:च्या लहान लहान बोटी आहेत ऑफिसर्स एका द्वीपावरून दुसऱ्या द्वीपावर दौरा करताना या बोटीचा वापर करतात मुख्य आयुक्त आणि इतर V I P. च्या टूरसाठी ' तारमुगली ' नावाची खास बोट आहे मुख्यभूमीशी ' शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया ' च्या तीन मोठ्या जहाजाद्वारे सतत वाहतूक सुरू असते जहाजे अनुक्रमे नानकौरी, हर्षवर्धन आणि अंदमान ही असून पहिली दोन्ही पूर्णपणे एअरकन्डिशन्ड आहेत. अंदमान अंशत एअरकन्डिशन्ड आहे अनुक्रमे टी एस एस नानकौरी ह्या जहाजाची ९०३, एम व्ही हर्षवर्धन ७४९ आणि एम व्ही अंदमान ह्या जहाजाची ६१० पॅसेंजर्सची क्षमता असून तीन हजार टन माल वाहून आणण्याचीसुद्धा क्षमता आहे याव्यतिरिक्त ' एम व्ही दिग्लीपूर ' आणि ' एम व्ही शॉम्पेन ' ही दोन स्पेशल मालवाहक जहाजे आहेत, त्यांद्वारा जीवनोपयोगी वस्तू मुख्य भूमीवरून (विशेषत कलकत्ता, मद्रास आणि विशाखापट्टनमवरून) आणतात

त्याचप्रमाणे हवाई सेवासुद्धा १९६१ पासून सुरू झालेली आहे पूर्वी ' व्हायकाउ ' विमान येथे कलकत्त्याहून रंगूनमार्गे येत असे परंतु २ ऑगस्ट १९७७ पासून बोईंग ७३७ विमान दर मंगळवारी व दर शुक्रवारी कलकत्ता-पोर्ट-ब्लेअर ह्या सरळ मार्गे येथे येते लवकरच पोर्ट-ब्लेअर-मद्रास हा वायुमार्गसुद्धा सुरू होणार आहे (हंस एअर लाईन्सने जास्तीत जास्त दोन महिने विमान सेवा ह्या मार्गे चालविली परंतु नंतर मात्र बंद करण्यात आली) अशा तऱ्हेने अंदमान-निकोबार ह्या द्वीपांचा मुख्यभूमीशी व आंतरद्वीपाशी संपर्क साधलेला आहे

द्वीपाचा संचार-व्यवस्थेबाबतीत मुख्य भूमीशी आतापर्यंत ' रेडिओ टेलिफोन सिस्टिम 'द्वारा संपर्क होता परंतु जानेवारी ८० पासून डायरेक्ट ' सेटलाईटच्या 'द्वारा पोर्ट-ब्लेअर शहर मद्रास, दिल्ली, कलकत्ता ह्या मोठ्या शहराशी जोडल्या गेल्यामुळे सरळ टेलिफोनद्वारा संपर्क साधता येतो तद्वतच कार-निकोबारचे सुद्धा ' अर्थ सेटलाईट स्टेशन ' सुरू झालेले असून कार-निकोबारसुद्धा वर निर्देशित तीन शहराशी जोडल्या गेले आहे. सेटलाईटमुळे १९८०-८१ च्या दरम्यान टी व्ही ची सुद्धा सुविधा होण्याची

शक्यता आहे (२६ जानेवारी १९७९ ला कार-निकोबार येथे टी व्ही ची चाचणी यशस्वी झालेली आहे )

द्वीपसमूहात २४६ को-ऑपरेटिव्ह सोसायट्या असून मेंबर्संची सख्या २३,८३६ आहे शिवाय एकूण १९ बँकाच्या शाखा येथे आहेत त्यापैकी ६ पोर्ट-ब्लेअरला आहेत सोसायट्याद्वारा, बँकांद्वारा कर्ज पुरवून उन्नतीसाठी हातभार लावत आहेत

○ ○

प्रकरण ६

# सहावी पंचवार्षिक योजना प्रशासन, निसर्ग-सौंदर्य व नवलाच्या घटना

द्वीपाच्या सहाव्या पचवार्षिक योजनेच्या मसुद्यावर योजना आयोगा-सोबत चर्चा ८ डिसेंबर ७८ रोजी झाली. संपूर्ण द्वीपसमूहाच्या सर्वांगीण विकासासाठी अदमान-निकोबार प्रशासनाने १४७ करोड रुपयांच्या विविध योजना सादर करून वरील रकमेची मागणी केली होती परतु त्यांपैकी ७७ करोड रुपयांच्याच योजनेस आयोगाने मजुरी दिली सहाव्या पचवार्षिक योजनेत प्रामुख्याने परिवहन, इतर द्वीपावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज आणि स्वास्थ्यसेवा याना प्राधान्य देण्यात येणार आहे वर निर्देशित ७७ करोड रुपये हे 'स्टेट सेक्टर' च्या योजनेसाठी असून आणखी २३ करोड रुपये 'नॉनस्टेट सेक्टर' च्या योजनेसाठी मागे पुढे केन्द्र सरकार मजूर करण्याची शक्यता आहे

सहाव्या पचवार्षिक योजनेत शहरात दूधयोजना, आन्तरद्वीपीय परिवहनाच्या स्थितीत सुधारणा, जहाजाच्या वार्षिक सर्व्हेसाठी पोर्ट-ब्लेअर येथे 'डॉकयार्ड' तयार करणे (ह्या डॉकयार्डचे उद्‌घाटन माजी पतप्रधान श्री मोरारजी देसाईंनी १२ फेब्रुवारी १९७९ रोजी केले असून त्यावर एकूण अडीच कोटी रुपये खर्च येण्याची शक्यता आहे.) त्याचप्रमाणे लिटल अदमानमधील वुड बेसीसवर आधारित कारखान्याची स्थापना, वगैरे योजना-साठी प्राधान्य देऊन व त्या पूर्ण करून घेण्याचा अदमान प्रशासनाचा जोरदार प्रयत्न चालू आहे

**राजकारण–** अदमान–निकोबार द्वीपसमूहातसुद्धा राजकारण आढळून येते येथे प्रामुख्याने जनता पक्ष, काँग्रेस (आय्), लोकदल, सी पी आय्. (एम्) हे राजकीय पक्ष आहेत द्वीपसमूहातून लोकसभेसाठी एक जागा मतदान पद्धतीने निवडल्या जाते (१९५७ पूर्वी ही लोकसभेची सीट राष्ट्रपतीकडून योग्य व्यक्तीची निवड करून त्यास खासदार म्हणून नेमत होते. परतु १९६५ पासून ही सीट सरळ मतदाराकडून निवडल्या जाते )

१९७७ च्या निवडणुकीत ही जागा काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री मनोरंजन भक्ता यांनी जिकली होती नतर ते काँग्रेस (आय्) मध्ये गेले गेल्या १९८० च्या मध्यवर्ती निवडणुकीत येथील जागा काँग्रेस (आय्)चे उमेदवार श्री मनोरजन भक्ता यानीची परत जिंकली पूर्वी येथून के आर गणेश निवडून गेले होते ते काही दिवस केन्द्रीय राज्यमत्री म्हणून सुद्धा काम बघत होते.

लहान–महान कारणांसाठी सभा, धरणे, आदोलने, नारे लिहून सडका रंगविणे वगैरे प्रकार बारंवार बघावयास मिळतात एकदरीत राजकारण गरम वाटते

**प्रशासन–** ब्रिटिश काळात येथील प्रशासन हे ' पेनल सेटलमेन्ट ' च्या अधीक्षकामार्फत प्रत्यक्ष भारत सरकार बघत होते परतु १८६४ पासून ' मुख्य आयुक्त ' रगून (जेव्हा बर्मा भारतात सामील होते) यांच्याकडे सोपविले परतु हा नवीन प्रयोग विशेषपणे यशस्वी झाला नाही म्हणून परत १८६८ ला येथील प्रशासन भारत सरकारच्या अधिकाराखाली ठेवले १८७० साली हे प्रशासन कायद्याच्या दृष्टीने कलकत्ता उच्च न्यायालयाच्या परिक्षेत्रात शामील केले ततूपूर्वी १८६९ ला निकोबार द्वीपसमूह तत्वत अदमान प्रशासनाच्या अधिकारात घेतले व नानकौरी येथे साहाय्यक अधी[illegible] त्याचे कार्यालय ठेवले नतर अदमान-निकोबारच्या मुख्य अधीक्षकाचे (Chief Superintendent) पदनाम बदलून ' मुख्य आयुक्त (Chief Commissioner) अदमान-निकोबार असे केले

आता अदमान-निकोबार हा भारताचा केन्द्रशासित प्रदेश असल्यामुळे ह्या द्वीपांचा कारभार भारताचे राष्ट्रपती ' मुख्य आयुक्त ' याच्यामार्फत बघतात आणि मुख्य आयुक्त हे सचिवालयामार्फत पूर्ण द्वीपाचा कारभार

साभाळतात मुख्य आयुक्ताच्या सचिवालयात इतर स्टेटनुसार सर्व खाती आहेत मुख्य आयुक्ताना, जवळपास राज्याच्या मुख्य मन्त्र्याच्या बरोबरीचे अधिकार केन्द्रसरकारकडून दिलेले आहेत

प्रशासनाचे मुख्यालय पोर्ट–ब्लेअर आहे मुख्य आयुक्ताना मधून मधून ' मुख्य आयुक्त सल्लागार समिती ' सूचना देत असते. तसेच ' गृहमन्त्री सल्लागार समिती ' पण आहे पोर्ट-ब्लेअर शहर हेच अदमान-निकोबार द्वीपसमूहाची राजधानी आहे शिवाय सपूर्ण द्वीपसमूहात हेच एक शहर आहे. या शहराची लोकसख्या ५० हजार (पन्नास हजार) आहे सपूर्ण शहर उंच सखल टेकड्यावर वसलेले आहे नेहमी हिरवी झाडे सतेज दिसतात. शहरातील रस्ते सर्वत्र नागमोडी आकाराचे असून स्वच्छ नि डाबरी आहेत जुनी बव्हशी लाकडाची पण सुदर सुदर घरे बांधलेली आहेत नवीन घरे सिमेन्टने बांधलेली आढळतात पूर्ण शहर आठ चौरस मैलाच्या परिसरात विखुरलेले आहे शहरात नगर बसेसची आणि टॅक्सीची सोय आहे

लोकाच्या घराशेजारी किचन गार्डनमध्ये फळाफुलांची, भाजी-पाल्याची, केळीची, शेवग्याची तर कुठे कुठे सुपारीची नि काजूची पण झाडे आढळून येतात शहरात तीन सिनेमागृहे आहेत (हिन्दी, तामील, तेलगू आणि बगाली चित्रपट दाखविल्या जातात). बाकी बाम्बूफ्लॅट ह्या बेटावर सुद्धा एक साधारण धरतीचे सिनेमा–गृह आहे आणि निकोबार द्वीपसमूहात आतापर्यंत एकही सिनेमागृह नव्हते परतु १० जानेवारी ७९ रोजी जेव्हा माजी केन्द्रीय सूचना तथा प्रसारण मत्री श्री लालकृष्ण अडवाणी हे ह्या द्वीपाच्या तीन दिवसाच्या दौऱ्यावर होते तेव्हा कार-निकोबारला एका सिनेमागृहासाठी आधारशिला रोवली (एलोन सिनेमागृह) आणि ते सिनेमा-गृह सुरू पण झालेले आहे

द्वीपसमूहाकरिता एक आकाशवाणी केन्द्र पोर्ट-ब्लेअर येथे आहे. (सहाव्या पचवार्षिक योजनेच्या शेवटी शेवटी कार-निकोबार येथे सुद्धा एक आकाशवाणी केन्द्र सुरू करण्याची तत्वत मान्यता केन्द्र सरकारने दिली आहे) याशिवाय पोर्ट-ब्लेअरला वीज विभाग, परिवहन विभाग, मरीन विभाग, पशुपालन विभाग, कृषी विभाग, स्वास्थ्य विभाग, जिल्हा सेशन कोर्ट, मत्स्य विभाग, लोक निर्माण विभाग, शिक्षण विभाग, उद्योग विभाग,

वन विभाग, लाईट हाऊस अँड लाईट शिप्स विभाग, जनगणना विभाग, उपमहालेखापाल, पोलीस महानिरीक्षक, हवामान खाते, सिव्हिल अॅव्हीयेशन, इंडियन एअर लाईन्स, शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया, अधीक्षक, पोस्ट आणि तार खाते, लेबर कमिशनर, रोजगार विनिमय कार्यालय, केन्द्रीय कृषी अनुसंधान संस्था, बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडिया, झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, अॅन्थ्रापॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, बँका आणि इतर लहान-मोठ्या खात्याची मुख्यालये पोर्ट-ब्लेअरलाच आहेत

संरक्षणाच्या दृष्टीने हे द्वीप भारताकरिता फारच महत्त्वाचे ठरतात. त्या दृष्टीने येथे आर्मी, नेव्ही, एअर फोर्स (हेडक्वॉर्टर कार्निकोबार) कोस्टल गार्ड, सी आर. पी आणि स्थानिक कायदा व सुरक्षेच्या बंदोबस्तासाठी 'अंदमान पुलीस' सुद्धा आहेत

शहरात वीज, नळ, टेलिफोन, कापड बाजार, किराणा मालाची दुकाने, लहान मोठी हॉटेल्स सुद्धा आहेत पोर्ट-ब्लेअर येथून दोन इंग्रजी लहान आकाराची दैनिके (१) दि डेलि टेलिग्राम्स आणि (२) अंदमान टाईम्स प्रसिद्ध होतात शिवाय १५ ऑगस्ट १९७९ पासून दोन पेजेसचे एक हिन्दी दैनिक 'अंदमान-निकोबार द्वीप समाचार' प्रशासनातर्फे सुरू करण्यात आले आहे आणि वर निर्देशित 'दि डेलि टेलिग्राम्स' सुद्धा अंदमान प्रशासनातर्फेच गेल्या ६१ वर्षांपासून प्रकाशित केल्या जात आहे त्याचप्रमाणे एक इंग्रजी साप्ताहिक 'दी-लाईट ऑफ अंदमान' सुद्धा येथूनच प्रकाशित होते निकोबार द्वीपसमूहातून 'कार-निकोबार' येथून सरकारतर्फेच इंग्रजी कम् निकोबारी भाषेतून 'निकोबार समाचार' हे साप्ताहिक प्रकाशित होते १९७८ पासून येथे फक्त ७ प्रिंटिंग प्रेसेस् आहेत आक्टोबर ७८ पासून 'अंदमान कर्मचारी मासिक पत्रिका' निघते

शहरात भारतातील सर्वच राज्यामधून लोक येथे नोकरीच्या, तर कोणी धंद्याच्या, तर कोणी स्थायिक होण्याच्या दृष्टीने राहतात कित्येक स्थायिक पण झालेत त्यांचे धर्म, भाषा, रीति-रिवाज, वेषभूषा अगदी भिन्न-भिन्न आहेत परंतु तरीही ते मोठ्या गुण्यागोविंदाने राहतात आणि म्हणूनच अंदमानला 'लघुभारत' म्हणून संबोधितात अलग अलग प्रांताच्या भाषा बोलल्या जात असल्या तरी संपर्क भाषा म्हणून हिन्दीचाच वापर

करतात मिक्स संस्कृती येथे मोठ्या प्रमाणात बघावयास मिळते वेगवेगळ्या जातीचे, धर्मांचे जरी लोक राहत असले तरीपण त्याच्यात सोयर सम्बन्ध जुळल्याचे आढळून येतात. त्यामुळे बऱ्हशी पर्यटक ही संस्कृती बघून आश्चर्यवजा स्तुती करतात

**प्रेक्षणीय स्थळे**

(१) **सेल्युलर जेल–** ह्या जगद्‌विख्यात (की कुविख्यात ?) जेलच्या सध्या अस्तित्वात असलेल्या नंबर १, ६ नि ७ ह्या विंग पूर्वस्थितीत आहेत. ज्यामध्ये कित्येक क्रान्तिकारी वीरांनी असह्य यातना भोगल्या, बर्बर अत्याचार, अपमान सहन केले अशा त्या १३ फूट लांबीच्या, सव्वा आठ फूट रुंदीच्या आणि ९ फूट उंचीच्या कोठड्या पाहावयास मिळतात

तसेच सध्या अस्तित्वात नसलेले परंतु इंग्रजांनी शेकडोंना जेथे फासावर लटकविले असे ते फाशीघर, तेलघाणी आणि वीर वि दा सावरकरांना ज्या सातव्या विंगमधील १२३ नंबरच्या 'सॉलिटरी सेल' मध्ये ठेवत होते ती कोठडीसुद्धा बघावयास मिळते (सध्या तेथे वि दा सावरकरांचे सुंदरसे छायाचित्र त्या कोठडीत लावलेले आहे पोस्ट अँड टेलिग्राफ खात्याने ते छायाचित्र भेट म्हणून जेलला दिलेले आहे आणि समोरील भागात ११ फेब्रुवारी ७९ पासून सुरू झालेले जेल संबधातील संग्रहालय राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केल्यापासून )

(२) **अॅन्थ्रॉपॉलॉजिकल म्युझियम–** येथे द्वीपसमूहातील आदिम जनजातीविषयीचा इतिहास, त्यांची शस्त्रे-अस्त्रे व त्यांचे राहणीमान आणि संस्कृतीबाबत छायाचित्राद्वारा माहिती मिळू शकते

(३) **मत्स्यालय–** मत्स्य विभागातर्फे येथे समुद्रातील वेगवेगळ्या प्रकारचे कोरल्स, शंख-शिंपले, माशाचे निरनिराळे प्रकार, आणि मत्स्य विभाग करीत असलेली, करण्यात येणारी माहिती उपलब्ध आहे

(४) **इन्डस्ट्रिज एम्पोरियम–** या ठिकाणी शिंपल्यापासून अनेक तऱ्हेच्या नक्षीदार आलंकारिक वस्तू प्रदर्शनाकरिता शिवाय विक्रीकरिता ठेवल्या आहेत त्याचप्रमाणे लाकडापासून, नारळाच्या कवटया (सेल्स) पासून वेगवेगळ्या प्रकारच्या अत्यंत मनमोहक, कलात्मक वस्तू बघावयास नि खरेदी करावयास मिळतात त्याचप्रमाणे 'खादी ग्रामोद्योग एम्पोरियम'-

मध्येसुद्धा वरील वस्तू उपलब्ध असतात

(५) **रॉस द्वीप–** हे द्वीप पोर्ट-ब्लेअर पासून एक किलोमिटरच्या अन्तरावर अगदी पाण्याच्या मधोमध आहे त्या द्वीपाची लांबी १,५०० यार्ड असून रुंदी ६५० यार्ड आहे मोटार बोटीद्वारा नेव्ही ऑफिसच्या परवानगीने तेथे जाता येते. इंग्रजांच्या काळात 'चीफ कमिशनराचे मुख्यालय,' चर्च, अधिकाऱ्यासाठी क्लब, सैनिक मुख्यालय, स्टोअर पण तेथेच होते सध्या तेथे भग्न अवस्थेतील अवशेष बघावयास मिळतात त्या छोटयाशा द्वीपावर नारळाची आणि अन्य प्रकारची सुंदर सुंदर झाडे आहेत त्याशिवाय त्या द्वीपाच्या उत्तरेकडील बाजूस एक द्वीपस्तंभ (Light House) सुद्धा बघावयास मिळते

(६) **वाईपर द्वीप–** ह्या द्वीपाचा आकारसुद्धा रॉसद्वीप एवढाच असेल हे द्वीप हॅडो बंदरापासून जास्तीत जास्त अर्धा किलोमिटर पश्चिमे-कडच्या भागास आहे ब्रिटिश काळात सर्वप्रथम 'काळ्या पाण्याच्या सजेवर पाठविण्यात आलेल्या कैद्यास याच द्वीपावर ठेवत होते नंतर त्यास इतरत्र पाठवीत तेथेच त्या काळचे फाशीघर व 'कन्डम सेल्स' (कोठड्या) आहेत. ह्या द्वीपावरील छोटयाशा जेलचे निर्माण कार्य १८६७ ला पूर्ण केले याच-ठिकाणी ब्रिटिश अधिकारी महाबदमाष कैद्यांना 'चेन गँग' (Chain Gang) ही महाभयंकर शिक्षा देत (ह्या शिक्षेचा उल्लेख पूर्वीच्या प्रकर-णात विस्तृतपणे केलाच आहे) परंतु सध्या हे 'वाईपर द्वीप' सुंदरसे पिकनिकचे ठिकाण बनले आहे याच द्वीपावरील छोटयाशा जेलला 'वाईपर चेन गँग जेल' म्हणून ओळखत होते

(७) **हॅडो प्राणिसंग्रहालय–** हे एक लहानसेच पण सुंदर प्राणि-संग्रहालय आहे त्यास 'मिनीझू' म्हणून ओळखतात या संग्रहालयात निकोबार द्वीपसमूहात सापडणारा दुर्मिळ पक्षी 'मेगॅपॉड' हा बघावयास मिळतो तो इतरत्र कुठेच सापडत नाही. याशिवाय मगराच्या प्रजोत्पादना-साठी लहानसे 'ब्रिडिंग स्टेशन' पण आहे

(८) **मरीना पार्क–** समुद्र किनाऱ्यालगत लहानसाच परंतु सुंदर पार्क आहे लहान मुलासाठी वेगवेगळ्या खेळांच्या सोयी असून थोराना समुद्र किनारी बसून निसर्गाचा आनंद लुटता येतो याच बगीच्यात रवीन्द्रनाथ

टागोरांचा, नेताजी सुभाषचंद्र बोसचा पुतळा आहे तसेच इंग्रजांच्या काळात शहीद झालेल्यांच्या स्मरणार्थ उभारलेला ' शहीद स्तंभ ' आहे

(९) **कार्बाईन कोव–** पोर्ट-ब्लेअर पासून ५ किलोमिटरच्या अन्तरावर दक्षिण दिशेला हे ठिकाण असून तेथील समुद्री बीच फारच आकर्षक आहे एक पिकनिक स्पॉट म्हणून दर रविवारी तेथे पुष्कळ लोक निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी आणि समुद्र स्नानासाठी जातात येथेच २० डिसेंबर ७८ रोजी सॉफिस्टिकेटेड पर्यटकासाठी ' हॉटेल कार्पोरेशन ऑफ इंडिया द्वारा ' सेन्चार बीच रिसॉर्ट ' हे थ्री स्टार हॉटेल सुरू केले आहे

याशिवाय पोर्ट-ब्लेअरच्या आसपास असलेली अन्दमान टिंबर इंडस्ट्री, बाम्बूफ्लॅट, वंडूर सी बीच, चिडिया टापू सी बीच, माऊंट हेरियट (१,१९६ फूट उंच टेकडी जेथून सूर्यास्ताचे दृश्य बघता येते शिवाय पोर्ट-ब्लेअरचे नैसर्गिक रूपसुद्धा बघता येते) मधुबन (येथे हत्तीद्वारा मोठमोठ्या लाकडाच्या ओंडक्याचे लोडिंग अनलोडिंग ट्रकवर केल्या जाते) शिवाय ज्या धरणापासून पोर्ट-ब्लेअर व आसपासच्या काही गावांना पाणीपुरवठा केल्या जातो ते गर्दबाज झाडीत असलेले ' धानी खाडी धरण ' सुद्धा बघण्यालायक आहे ' सीपी घाट ' येथील नमुनेदार, सरकारी मसाल्याचा बगीचा पण भेट देण्यालायक आहे वरील निर्देशित ठिकाणे पोर्ट-ब्लेअरशी सडकेने जोडलेली असल्यामुळे बसने किंवा टॅक्सीने तेथे जाता येते

त्याचप्रमाणे दक्षिण अंदमानमध्ये सहा, उत्तर अंदमानमध्ये एकूण आठ समुद्री बीचेस् आहेत तसेच ' राईट मेओ,' ' बाराटांग, उत्तरा चेराह्वा, कालीघाट, परागरा ' येथील खाडीचे दृश्यसुद्धा अत्यंत लोभसवाणे आहे परंतु ह्या सर्वांचा आनंद लुटण्यासाठी आन्तर्द्वीपीय जहाजाने जावे लागते आणि चार-आठ दिवसाकरिता आलेल्या पर्यटकाना ते शक्य होत नाही कारण दक्षिणेकडील भागात जाण्यासाठी सात-आठ दिवसांतून एकदा जहाज असते

बाहेरील द्वीपावर गेल्यास तेथे काही वनविभागाची तर काही ए पी. डब्ल्यू डी ची आरामगृहे आहेत

**नैसर्गिक सौंदर्य–** मी माझ्या पुस्तकात दिलेल्या शीर्षकावरून बऱ्हशी वाचकाना आश्चर्य वाटेल काहीना तर अतिशयोक्ती वाटेल परंतु खरोखरच

हे द्वीप नदनवन आहेत काहींच्या मनात प्रश्नही उद्‌भवेल, 'एवढे सुदर द्वीप आहे मग इतके प्रसिद्धीपासून दूर का ? शिवाय मोठ्या प्रमाणात पर्यटक काश्मीरलाच का जातात ?' तर वाचक मित्रहो, पर्यटक येथे न येण्यास मुख्य दोन गोष्टींची अडचण होती (१) परदेशी पर्यटकांसाठी १९७४ पर्यंत या द्वीपावर यावयास बदी होती (आता परवानगी असूनसुद्धा काही ठिकाणी जाण्यास बदी आहेच) आणि (२) देशी पर्यटकासाठी भयकरच दूर, खर्चाचे शिवाय पासपोर्ट, इन्टरनॅशनल हेल्थ सर्टिफिकेट लागत होते. ह्यासाठी खर्च शिवाय व्यर्थ ताप पुरत असत त्या मानाने काश्मीरला जाण्यासाठी आहेत का काही झझटी ? तर यामुळे इकडच्या निसर्ग-सौंदर्याचा लाभ देशी, परदेशी पर्यटक घेऊ शकत नव्हते शिवाय या भागाची माहिती, येथील निसर्गसौंदर्याची कल्पना, मुख्य भूमीवरील बऱ्हशी लोकांना माहीत नाही तसेच या द्वीपाविषयीची पुस्तकेसुद्धा बऱ्याच कमी प्रमाणात उपलब्ध आहेत कित्येक लोकांना फक्त इग्रजानी त्यांच्या मनावर बिबवून दिलेला शब्द 'काळेपाणी' एवढेच फक्त माहीत आहे आणि म्हणूनच या भागास फारसी प्रसिद्धी मिळाली नाही

मी वर पासपोर्टचा उल्लेख केल्यामुळे काही वाचकांना परत आश्चर्य वाटले असेल की, अदमाननिकोबार हा तर हिंदुस्थानचाच एक अभिन्न भाग आणि त्यासाठी कशाला पासपोर्ट ? परंतु पासपोर्ट पूर्वी लागत होता आता नाही कारण जे पर्यटक हवाई मार्गे येऊ इच्छित होते त्यानाच फक्त पासपोर्ट लागत होता त्या वेळी विमान मार्ग कलकत्ता–रगून पोर्ट-ब्लेअर असा होता. शिवाय रगूनला विमानाचा ४५ मिनिटांचा टेक्निकल हॉल्ट असायचा व म्हणूनच पासपोर्ट लागत होता परंतु २ ऑगस्ट १९७७ पासून ना पासपोर्ट लागत ना जहाजाच्या प्रवासाकरिता 'इन्टरनॅशनल हेल्थ सर्टिफिकेट' लागत विमान सेवा (बोईंग ७३७) आता सरळ कलकत्ता–पोर्ट-ब्लेअर अशी सुरू झाली आहे आणि म्हणूनच आजकाल एवढे देशी तर काही परदेशी पर्यटक येथे येतात की, विशेषत नोव्हेबर ते फेब्रुवारी ह्या दरम्यान महिना महिना विमानाचे अॅडव्हान्स बुकिंग केलेले असते जहाजाने येणाऱ्याची सख्या सुद्धा बरीच असते

तर हे द्वीप निसर्ग-सौंदर्याचे प्रतीक आहे, हे मी पुढे लिहीत असलेल्या

अभिप्रायावरून वाचकांच्या लक्षात येईलच

स्वातन्त्र्य-वीर वि दा सावरकर हे येथे १९११ ते १९२१ पर्यंत ' काळ्या पाण्याची ' सजा भोगत होते. त्याच वेळी त्यांनी यातनांविषयी (जेलमधील), निसर्गसौंदर्याविषयी माझी जन्मठेप ' ह्या पुस्तकात लिहून ठेवले आहे की, " अदमान-निकोबार हे द्वीप म्हणजे हिंदुस्थानच्या पूर्व समुद्राची द्वारेच होत येथे सुरू झालेली विमानवाहतूक निसर्गदर्शनास जणू निमन्त्रितच करते भारताचे ते जणू वैकुंठच आहे "

भारताचे माजी पतप्रधान श्री मोरारजी देसाईंनीसुद्धा हे द्वीप सदा हरे भरे राहतात म्हणून खूपच खुशी जाहीर केली होती (ते जेव्हा ११ फेब्रुवारी १९७९ ला ह्या द्वीपांच्या तीन दिवसाच्या दौऱ्यावर आले होते, त्याच वेळी ते म्हणाले होते, ' ही भेट माझ्यासाठी, मी एक तीर्थयात्रा समजतो ' त्याच वेळी त्यांनी ' सेल्युलर जेल 'ला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले व त्यास राष्ट्रास अर्पण केले होते

एप्रिल १९७७ ला प्रसिद्ध तामीळ अभिनेता, शिवाजी गणेशन् हे एका तामीळ सिनेमाच्या (कत्तलाई अदमान) शूटिंगसाठी पोर्ट-ब्लेअरला आले होते त्या वेळी आपला निसर्ग-सौंदर्याबाबतचा अभिप्राय व्यक्त करताना म्हणाले होते, " अदमान-निकोबार हे द्वीप काश्मीरच्या निसर्गसौंदर्यापेक्षा कमी नाहीत खर म्हणजे या द्वीपाची तुलना इतर प्रदेशांशी न करता येण्या-सारखी आहे काश्मीरचे वातावरण आल्हादकारक आहे, एवढाच फक्त फरक जाणवतो " (त्यानी ज्या ' कतलाई अंदमान ' सिनेमाची शूटिंग येथे पूर्ण केली तो सिनेमा मला (लेखकाला) बघावयास मिळाला भाषा समजणारी नव्हती परत तरीही केवळ अदमानच्या सिन-सिनेरीसाठी तो चित्रपट बघितला एकदमच आवडली रगीन सिन-सिनेरी वाचकांपैकी ज्याना अदमान प्रत्यक्ष बघावयास येता येणार नाही त्यानी तो सिनेमा अवश्य बघावा निसर्गसौंदर्याची नक्कीच थोडी फार कल्पना येईल त्याच-प्रमाणे भारत सरकारतर्फे ' मॅन इन सर्च ऑफ मॅन ही डाक्युमेन्टरी (रगीन) सुद्धा सधी मिळाल्यास अवश्य बघावी (तिला १९७४ चे राष्ट्रपती पारितोषिक मिळाले आहे अदमान थोडे तरी बघितल्याचे समाधान लाभेल )

डिसेंबर ७८ मध्ये अन्दमानला शूटिंगसाठी आलेले तेलगूचे प्रसिद्ध

सिनेअभिनेता श्री नागेश्वरराव यानी अदमानच्या निसर्ग-सौंदर्याची तुलना एका ' सुन्दर युवतीशी ' केली आहे त्यानी येथे एका तेलगू फिल्मचे अर्धे शूटिंग पूर्ण केले आहे (नाव अद्याप ठेवले नव्हते )

तदनतर बगाली आणि हिन्दी फिल्मचे डायरेक्टर श्री तपन सिन्हा सुद्धा येथे नोव्हेंबर ७८ ला एका बगाली बाल-चित्रपटाच्या (सुबोद द्वीप राजा) चित्रीकरणासाठी आले होते त्यावेळी इकडील सौंदर्याबद्दल वाहवा केली होती (त्याचा, सुबोद द्वीप राजा,' हा चित्रपट रिलीज सुद्धा झाला असून त्याची हिन्दी व्हर्शन सुद्धा निघालेली आहे रगीन चित्रपट बघण्या-लायक आहे )

त्याचप्रमाणे भारताचे चीफ आर्किटेक्ट श्री राणा ह्यांनी तर म्हटले आहे, " मी कित्येक वेळा परदेशी जाऊन आलो आशिया खडातील कित्येक द्वीपाना भेटी दिल्या, परतु एवढे सुदर द्वीप बघावयास मिळाले नाही

याशिवाय भारताचे प्रसारण तथा माहिती खात्याचे माजी मत्री श्री लालकृष्ण अडवाणी, भारताचे माजी गृह राज्यमत्री श्री. धनिकलाल मडल, सघ लोक सेवा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ किडवाई, थायलडचे भारतातील राजदूत, पतप्रधान श्रीमती इदिरा गाधी, माजी उपराष्ट्रपती श्री बी डी जत्ती आणि अन्य प्रतिष्ठितांनी येथील निसर्ग-सौंदर्याबाबत प्रशसोद्‌गार काढलेले आहेत

आतातरी वाचकाना खात्री पटली की नाही येथील निसर्गसौंदर्या-बद्दलची ? नसेल तर प्रत्यक्ष येऊनच बघा

**येण्याचे मार्ग—** अदमानला फक्त दोनच मार्गांनी येता येते—

(१) जलमार्ग आणि (२) वायुमार्ग

(१) **जलमार्ग—** अदमानला जलमार्गाने यायचे झाल्यास मद्रास किंवा कलकत्ता येथून आठ, दहा किंवा पधरा दिवसाच्या अतराने जहाज मिळू शकते जहाजाच्या वेळापत्रकाविषयी मद्रासला, " शे मोहम्मद सावथर ॲण्ड कपनी (एजन्ट फॉर शिपिंग कार्पोरेशन) ४१, लिंघीचेट्टी स्ट्रीट मद्रास—१ ' येथून तर कलकत्त्याला पुढील पत्त्यावरून माहिती मिळविता येते, " मॅनेजर, शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया, १३, स्ट्रॅण्ड रोड, कलकत्ता—१"

आणि वरील दोन्ही ठिकाणावरूनच तिकिट सुद्धा प्राप्त करावे

लागतात. परंतु जहाजातील बंक क्लास, केबीन क्लासच्या रिझर्वेशनसाठी मात्र, " साहाय्यक सचिव (लोक विभाग), मुख्य आयुक्ताचे सचिवालय, पोर्ट-ब्लेअर-७४४१०१ " याच पत्त्यावर विनती अर्ज, साध्या पेपरवर नाव, पूर्ण पत्ता, वय, किती पॅसेंज पाहिजेत (म्हणजेच प्रवाशाची संख्या) वगैरे विवरणासह पाठवावा लागतो ननरच तुमचे नाव बुकिंग लिस्टमध्ये सामील केल्या जाते जर का तुमचे नाव ' बुकिंग लिस्ट ' मध्ये नसेल तर कलकत्ता, मद्रासच्या कार्यालयातून तुम्हाला तिकीटच मिळणार नाही हां ! तेच जर का कुणी बुकिंग रद्द केले तरच मिळेल

कलकत्ता-मद्रासच्या ऑफिसकरिता सुद्धा मर्यादित कोटा (कधी कधी नसतो पण) येथील प्रशासन देते एकदा का तिकीट मिळाले की, जहाजाचा प्रवास सुरू होतो

जहाजावर डिस्पेन्सरी, लायब्ररी, दोन तऱ्हेच्या सुदरशा कॅन्टीन्स, बैठे गेम्स, टेबल टेनिस, रिक्रियेशन हॉल, टी व्ही (हर्षवर्धन जहाजावर तर पोहण्याचा तलाव सुद्धा आहे परंतु सध्या बद ठेवतात ) शिवाय ' बीअर बार ' पण असतो त्यामुळे तीन-चार दिवसांच्या प्रवासाची काळजी करण्यासारखे, शिवाय सोबत खाण्या-पिण्याचे सामान आणण्याची गरज नसते जहाजाचे कमीतकमी भाडे १०० रुपये आणि जास्तीतजास्त ५५८ रुपये जहाजातील क्लासनुसार असते (म्हणजे बंक क्लास, सेकंड क्लास, फर्स्ट क्लास आणि डिलक्स क्लास, वगैरे ) वर निर्देशित भाड्यात जेवणाचा खर्च अलग पडतो अदमान नावाच्या जहाजात अंशत एअर कन्डिशन्ड असल्यामुळे किंचित भाडे कमी आहे नानकौरी, हर्षवर्धन ही जहाजे पूर्णपणे एअर कन्डिशन्ड आहेत. केबीन क्लासने प्रवास करणारे प्रवासी प्रत्येकी १७५ ते २०० किलो सामान सोबत आणू शकतात

(२) वायुमार्ग- सध्या फक्त कलकत्त्याहूनच वायुमार्ग आहे पोर्ट-ब्लेअर येथे दोनच तासात पोहचता येते (११ आक्टोबर ७९ पासून २९ डिसेंबरपर्यंत, पोर्ट-ब्लेअर मद्रास वायुमार्ग सुरू होऊन परत बद करण्यात आला पुन्हा लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे.)

तर कलकत्त्याहून येणारे बोईंग ७३७ विमान कलकत्त्याच्या 'डमडम' ह्या आतरराष्ट्रीय हवाई अड्ड्यावरून सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी

उड्डाण घेते आणि बरोबर ८ वाजून २० मिनिटांनी पोर्ट-ब्लेअरच्या विमान-तळावर उतरते (विमान सुटण्यापूर्वी एक तास अगोदर सेक्युरिटी चेकसाठी, लगेजचे वजन करण्यासाठी, केबीन बॅगेजला कुपन लावण्यासाठी विमान-तळावर हजर राहावे लागते ) विमान प्रवासात वेळ फारच कमी लागतो व तो जाणवत सुद्धा नाही विमान उड्डाणानंतर ' लाईफ जॅकेट ' कसे वापरावे याचे रुटीन डेमॉस्ट्रेशन बघतो न बघतो तोच सकाळचा नास्ता देतात तो संपवून थोडेफार पेपर्स चाळतो न चाळतो तोच ऐकावयास मिळते, 'आपल्या हवाई जहाजाने अर्धे अंतर पार केले आहे' त्यानंतर थोडेसे इकडे-तिकडे फिरतो नि ओळखीच्याशी गप्पा मारतो तेवढ्यातच अन्दमानची द्वीप दिसायला लागतात खिडकीतून द्वीपांचे सौंदर्य बघत असतानाच खुर्चीचे बेल्ट बांधावयाची सूचना मिळते बेल्ट बांधल्यावर आठ-दहा मिनिटांतच विमान अगदी पोर्ट-ब्लेअर शहरावर आलेले असते आणि दुसऱ्याच क्षणाला ते धाव-पट्टीवर उतरलेले दिसते अशा तऱ्हेने वायुमार्गाचा प्रवास कमी अवधीचा, सोईचा नि आरामदायक असतो विमान भाडे एका व्यक्तीस एका बाजूचे ७९६ रुपये पडते (सोबत एका पॅसेंजरला जास्तीतजास्त २० किलो वजनाचे सामान घेता येते) कलकत्याला विमानाच्या रिझर्वेशनकरिता तथा तिकीट खरेदी करण्याकरिता पुढील पत्त्यावर संपर्क साधावा लागतो

' मॅनेजर,' इंडियन एअर लाईन्स,

चित्तरंजन ॲव्हेन्यु, कलकत्ता-७०० ०१२, कलकत्ता-पोर्ट-ब्लेअर ह्या मार्गे वायुसेवा दर मंगळवारी आणि दर शुक्रवारी असते

पोर्ट-ब्लेअर येथे आल्यावर सरकारी गेस्ट हाऊस नंबर १ नि २ येथे राहण्याची सोय होऊ शकते ह्या गेस्ट हाऊसच्या रिझर्वेशनसाठी, ' कार्यकारी अभियंता, अंदमान पी डब्ल्यु डी नॉर्थ डिव्हिजन, पोर्ट-ब्लेअर-७४४ १०१, ह्यांना लिहून करता येते तसेच टूरिस्ट होम, सर्किट हाऊस, निकोबारी हट (अेअर कन्डिशन्ड) आणि मेगॅपॉड नेस्ट या ठिकाणी सुट रिझर्व करण्यासाठी, ' प्रिन्सिपाल इंजिनिअर, अंदमान पी डब्ल्यु डी पोर्टब्लेअर-७४४ १०१ ह्यांना लिहून करावी उच्च श्रेणीतील पर्यटकांसाठी कार्बाईन कोव येथील ' सेन्चार बीच रिसॉर्ट ' हे थ्री स्टार हॉटेलसुद्धा उपलब्ध होऊ शकते

काही नवल व कुतूहलाच्या घटना

(१) संपूर्ण द्वीपसमूहामध्ये जास्तीत जास्त चार मजली इमारती आहेत (सर्वत्र नव्हे) परंतु इंग्रजाच्या काळातील सेन्युलर जेलची इमारत सोडून बाकी बहुतेक इमारतीवर सिमेन्टच्या स्लॅब आढळत नाही सर्व बाजूस छत आढळून येतात.

इकडे पावसाची वार्षिक सरासरी १२० ते १२५ इंचाची असून तो वर्षातून जवळपास सहा महिने पडतो म्हणून

(२) इकडे जवळपास ८० (ऐंसी) (80) टक्के लोक पान खाताना आपणास आढळतात

खाण्याची पाने स्वस्त मिळतात. पान ठेल्यावरील मसाला मिठा पानास फक्त दहाच पैसे पडतात (डिसेंबर १९७८ पर्यंत तर ५ पैसे पडत होते)

(३) संपूर्ण भारतातील पोर्ट-ब्लेअर येथील प्रादेशिक नभोवाणी केन्द्र हे एकच असे केन्द्र आहे की, त्यावरून हिन्दी, इंग्रजी, तामीळ, तेलगू, बंगाली, मल्याळम आणि निकोबारी ह्या सात भाषेतील कार्यक्रम प्रसारित होतात.

त्या त्या भाषा जाणणाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात असल्यामुळे ही व्यवस्था

(४) पोर्ट-ब्लेअरला पोस्टमन घरोघरी पत्रवाटप करीत नाहीत. रजिस्ट्री आणि मनिऑर्डरव्यतिरिक्त.

संपूर्ण भाग उंच-सखल असल्यामुळे कदाचित ही व्यवस्था असावी. त्यामुळे सरकारी नोकर आपापल्या कार्यालयाचा पत्ता देतात ज्या दिवशी टपाल येथे येते त्या दिवशी कार्यालयाचा शिपाई पोस्टात जाऊन टपाल घेऊन येतो

परंतु सामान्य जनता मोहल्ल्यातील एखाद्या दुकानाचा किंवा पान-ठेल्याचा पत्ता देतात त्यांच्यापैकी एकजण पोस्टातून सर्व टपाल घेऊन येतो व नंतर बाकी लोक तेथून घेऊन जातात

(५) पोर्ट-ब्लेअरची लोकसंख्या जवळपास ५० हजार असूनसुद्धा येथे फक्त दोन-तीन होमिओपॅथिक व फक्त एकच अॅलोपॅथिक दवाखाना सोडून बाकी खाजगी दवाखाने मुळीच नाहीत.

येथील सर्व लोक सरकारी दवाखान्यातूनच औषधी घेतात (जी. बी.

पन्त हॉस्पिटलमधून) महागात महाग औषधीसुद्धा फुकटात पुरविल्या जाते·

(६) इकडे आक्टोबर, नोव्हेंबर नि डिसेंबर महिन्यातसुद्धा कच्च्या कैऱ्या (आंबे) खावयास मिळतात

ट्रॉपिकल हवामान त्यास पोषक असल्यामुळे हा परिणाम आढळून येत असेल

(७) सपूर्ण द्वीपसमूहात अजिबात घोडयाची सख्या आढळून येत नाही

त्याना कदाचित ट्रॉपिकल हवामान योग्य नसावे (परतु इतर प्राणी मात्र आढळतात उदा कुत्रा, गाय, बैल, माजर, म्हैस, हरीण, बकरी, हत्ती, कोंबडया वगैरे वगैरे.)

(८) सपूर्ण द्वीपसमूहात अगदी मोजके भिकारी आढळतात

येथील मजूरवर्ग मेहनती आहे शिवाय सुशिक्षितवर्ग भिकाऱ्यांना प्रोत्साहन देत नसल्याचे दिसून येते

(९) द्वीपसमूहातील सर्वात दक्षिणेकडील भाग ग्रेट-निकोबारमधील कॅम्पबेल बे ' सारख्या ठिकाणी टपाल पोहचावयास कमीत कमी २०–२५ दिवस लागतात आणि मुख्य भूमीवरून पाठविलेले पार्सल, व्ही पी पी बुक पोस्टाने पाठविलेले साहित्य तर जवळपास दोन–अडीच महिन्यानी सबधित गृहस्थाच्या हाती पडते

फर्स्ट क्लास टपाल (मेल) उदा रजिस्टर लेटर, मनिऑर्डर, एअर पार्सल, पोस्ट कार्ड, आन्तर्देशीय, लखोटा–हे सर्व कलकत्याहून विमानमार्गे आठवडयातून दोनदा पोर्ट-ब्लेअरला येते. तीसुद्धा पूर्ण द्वीपसमूहातील मेल, त्यानतर आतरद्वीपीय जाणाऱ्या बोटीने ती इतरत्र द्वीपावर पाठविल्या जाते. आणि यासाठी म्हणून २० ते २५ दिवस शेवटच्या दक्षिण टोकाला पोहचण्यासाठी लागतात

परतु सेकड क्लास टपाल, उदा , बुक पोस्ट, ऑर्डीनरी पार्सल, व्ही. पी पी हे प्रथम कलकत्याहूनच सुटणाऱ्या जहाजाच्या कार्यक्रमानुसार, म्हणजे कधी आठ दिवसानी निघणाऱ्या तर कधी पधरा दिवसांच्या अतराने निघणाऱ्या जहाजाने प्रथम पोर्ट-ब्लेअरला येते व नतर मग तेथून इतर द्वीपावर लहान जहाजाद्वारा पाठवितात आणि या पद्धतीमुळे दक्षिणी द्वीप-समूहातील ' कॅम्प बेल बे ' सारख्या ठिकाणी पोहचावयास वर निर्देशित

वेळ लागतो

(१०) इकडे जवळपास ५० टक्के लोक दररोजच्या वापरात दूध पावडर वापरताना आढळतात

इकडे दुभत्या जनावरांची सख्या कमी प्रमाणात असल्यामुळे भरपूर दूध मिळत नाही

(११) ५० हजार लोकवस्तीचे शहर पोर्ट-ब्लेअर येथे एकही खाजगी लॉजिंग ॲण्ड बोर्डींग नाही

येथे सरकारी आरामगृहे, टुरिस्ट होम, सर्किट हाऊस, गुरुद्वारा, व धर्मशाळेतच लोक सामावू शकतात शिवाय अलग अलग प्रांतातील जनतेने उभारलेली सास्कृतिक भवने आहेत वेळ प्रसगी लोक तेथे पण राहतात आणि म्हणून खाजगी लॉजिंग बांधण्याची गरज पडत नसावी

(१२) शहरात ऑटो रिक्षा आणि सायकल रिक्षा मुळीच नाहीत

सपूर्ण शहर उच-सखल टेकडयावर वसलेले असल्यामुळे रिक्षा चालविणे शक्य नाही शहरात तशी टॅक्सीची व सिटी बसेसची व्यवस्था आहे याशिवाय बव्हंशी लोकांकडे स्वत'ची वाहने आढळतात लूना, व्हीकी वगैरे हलकी वाहने पण नाहीत

(१३) पोर्ट-ब्लेअर येथे जवळपास ४० टक्के घरे सरकारी मालकीची आहेत

मुख्य भूमीवरून नोकरीकरिता येणाऱ्या प्रत्येक सरकारी नोकरास येथे त्याच्या ग्रेडनुसार सरकारी घर 'रेन्ट फ्री' बेसीसवर मिळते एरवी खाजगी घराची भाडी फारच महाग आहेत

(१४) भारताच्या उत्तर ते दक्षिण ह्या परिसीमेबाबत बोलताना असा वाक्प्रचार रूढ झाला आहे की, 'काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत...' परतु कन्याकुमारीचा जो अगदी दक्षिण टोकाला असल्याचा उल्लेख करतात तो चुकीचा आहे

कारण, अदमान-निकोबार द्वीपसमूहामधील 'पिगमॅलियन पॉईन्ट' हा भाग अगदी दक्षिणेला म्हणजे कन्याकुमारीपेक्षाही खालच्या बाजूस येतो या होत असलेल्या चुकीची लवकरच दुरुस्ती होईल अशी अपेक्षा

● ●

परिशिष्ट अ

# " सेल्युलर जेल "मध्ये प्राणांची आहुती दिलेल्या शहिदांचा थोडक्यात जीवनपरिचय

इंग्रजांच्या काळात कित्येकांना अंदमानस्थित ' सेल्युलर जेल 'मध्ये काळ्या पाण्याची सजा भोगण्यासाठी हद्दपार करीत असत येथे आल्यावर कित्येकांनी बर्बर यातना सहन केल्या, अपमान सहन केले आणि काहींनी तर आपल्या प्राणाची आहुती दिली अशा शूर वीरांचा थोडक्यात जीवनपरिचय या परिशिष्टात देण्यात येत आहे

**(१) महावीरसिंह राठौर**

महावीरसिंह राठौर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९०४ मध्ये झाला होता. त्यांचे जन्मस्थळ उत्तर प्रदेशातील, एटा जिल्ह्यातील शाहपुर तहला हे होय त्यांच्या वडिलांचे नाव देवसिंह राठौर होते त्यांचे शिक्षण इन्टर-मिजिएटपर्यंत झाले ब्रिटिश शासनाविरुद्ध राष्ट्रवादी चळवळीत त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. ते ' क्रान्तिकारी दलाचे ' सदस्य असून सरदार भगत-सिंगाचे ते घनिष्ठ साथीदार होते उत्तर प्रदेशातील ' रिपब्लिकन आर्मी ' च्या संघटनेकरिता त्यांनी विशेष भूमिका निभावली होती.

दिनांक ४ डिसेंबर १९२८ ला ' पंजाब नॅशनल बँक,' लाहोरमध्ये एका राजकीय लुटमारीत भाग घेतला. परंतु तो सफल झाला नाही त्याच-वेळी एक मुख्य आरोपी म्हणून त्यांना अटक करण्यात आली १७ डिसेंबर १९२८ ला त्यांच्यावर " सॉण्डर्स " ला गोळी मारण्याचा अपराध लावला. त्याच केसमध्ये त्यांना आजीवन कारावासाची सजा सुनावली आणि

अदमानला ' काळचा पाण्याच्या ' शिक्षेकरिता पाठवून दिले

जेलमधील अधिकारी अमानुष अत्याचार करीत म्हणून त्यांनी त्याच्या विरोधात आमरण उपोषण सुरू केले त्या वेळी त्यांना जबरदस्ती नाकातून जेवण घालत होते त्यामुळे दूध नि अन्नाचे कण त्याच्या फुप्फुसात गेले आणि परिणामत दिनांक १७ मे १९३३ ला त्यांचा मृत्यु झाला

(२) राम रक्खा

राम रक्खा यांचा जन्म पजाबमधील, होशियारपूर जिल्ह्यातील ससोली या गावी झाला ब्रिटिश शासनाविरुद्ध राजकीय चळवळीत सक्रिय भाग घेतला होता ते ' गद्दार ' पार्टीचे सदस्यसुद्धा होते त्यानी बर्मा, मलाया आणि सिंगापूर येथे ब्रिटिश सेनेमधील भारतीय सैनिकांच्या मनात विद्रोह निर्माण करण्याच्या कामात पडित सोहनलाल पाठकांच्याबरोबर काम केले १९१५ मध्ये त्याना बर्मामध्ये अटक केली ' मडाले सप्लिमेंट्री ट्रायल ' मध्ये त्याना प्रमुख गुन्हेगार म्हणून त्यांच्यावर खटला चालविण्यात आला त्यातच त्याना ' काळचा पाण्याची ' सजा देण्यात आली आणि अदमानच्या ' सेल्युलर जेल ' मध्ये कैद करून ठेवले

त्यानीसुद्धा जेल अधिकाऱ्याकडून देण्यात येणारी अमानुष वागणूक बघून उपोषण सुरू केले कित्येक दिवस उपोषण करीत असतानाच त्याचा मृत्यू झाला

(३) सरदार नन्दसिंग (एक)

सरदार नन्दसिग याचा जन्म पजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील ' बुर्ज रेका ' ह्या गावी झाला होता त्यांच्या वडिलाचे नाव श्री पजाबसिग होते ते भारतीय सैन्यात एक सैनिक म्हणून काम करीत होते त्यांनी सैन्यातून निघून ' क्रान्तिकारी दलात ' प्रवेश केला राष्ट्रवादी चळवळीत सक्रिय भाग घेतला इ स १९१५ मध्ये त्याना अटक करण्यात आली आणि आजीवन कारावासाच्या शिक्षेवर अदमानला पाठविण्यात आले निकोबार द्वीपसमूहातील जेलमध्ये त्यांना मृत्यू आला

(४) सरदार सुरेनसिंग

सरदार सुरेनसिग याचा जन्म पजाबमधील, अमृतसर जिल्ह्यातील शहबाजपुर ह्या गावी झाला त्याच्या वडिलांचे नाव नत्थासिग ते शेतकरी

तथा सैन्यात कर्मचारी होते त्यानी १९१५ मध्ये सैन्यातील नोकरी सोडून दिली आणि स्वातन्त्र्यप्राप्तीकरिता राष्ट्रवादी आंदोलनात प्रवेश केला. त्यांना भगोडा म्हणून घोषित केले व त्याची पूर्ण सपत्ती जप्त केली लगेच अटक केली आणि काळ्या पाण्याची सजा फर्मावून अदमानला पाठवून दिले यातना भोगत असतानाच त्याचा 'सेल्युलर जेल' मध्ये मृत्यू झाला

(५) इन्दुभूषण रे

इन्दुभूषण रे यांचा जन्म पश्चिम बगालमधील कलकत्ता येथे १८९० ला झाला ते क्रान्तिकारी दलाचे सदस्य होते दि ११ एप्रिल १९०८ रोजी चन्द्रनगरच्या मेयरवर बॉम्ब फेकला 'अलीपुर बॉम्ब षड्यन्त्रा' मध्ये भाग घेतला २ मे १९०८ रोजी अटक करून जेलमध्ये ठेवण्यात आले डिसेबर १९०९ मध्ये आजीवन कारावासाची शिक्षा फर्मावून अदमानला पाठविले पोर्ट-ब्लेअरस्थित 'सेल्युलर जेल' मध्ये क्रूरतापूर्ण यातना दिल्या दिनाक २९ एप्रिल १९१२ ला त्यांनी आपल्याच कोठडीत फाशी लावून घेतली

(६) अहमदुल्ला

अहमदुल्ला याचा जन्म बिहारमधील पाटणा या शहरी १८०८ मध्ये झाला त्याच्या वडिलाचे नाव इलाही बख्श होते ते जनतेत एक प्रमुख व्यक्ती होते डेप्युटी कलेक्टर म्हणून काम केले काही दिवस आयकर निर्धारक बोर्डाचे सदस्य म्हणून सेवा केली वहाबी आदोलनात सक्रिय भाग घेतला १८५७ मध्ये अटक करण्यात आली ३ महिन्यानतर सोडून दिले. नोव्हेंबर १८६४ मध्ये पुन अटक केली त्या वेळी त्यांना सरकारी नोकरीतून काढून टाकण्यात आले आणि सरकारविरोधी षड्यन्त्र रचण्याच्या आरोपाखाली त्याच्यावर खटला चालविला २७ फेब्रुवारी १८६५ रोजी त्याना मृत्युदडाची सजा सुनाविली मृत्युदडाच्या शिक्षेस नतर आजीवन कारावासाच्या शिक्षेत रूपान्तर करून जून १८६५ ला त्यांना अदमानला पाठविण्यात आले तेथेच त्याचा २१ नोव्हेंबर १८८१ ला जेलमध्येच मृत्यू झाला

(७) याहिया अली

याहिया अली हे अहमदुल्ला यांचे लहान बधू होत याहिया अली याना अम्बाला येथे घोर राजद्रोहाच्या आरोपाखाली दण्डित केले आणि

आजीवन कारावासाची सजा फर्मावून अदमानच्या ' सेल्युलर जेल ' मध्ये रवानगी केली आणि त्यांचासुद्धा मृत्यू अदमानमध्येच झाला

(८) सरदार भानसिंग

सरदार भानसिंग याचा जन्म पजाबमधील, लुधियाना जिल्ह्यातील सरत ह्या गावी झाला ते गद्दार पार्टीचे सदस्य होते १९११ मध्ये कॅलिफोर्नियाला गेले, सयुक्त राज्य अमेरिकेला गेले आणि भारतातील ब्रिटिश हुकूमशाहीला उलथून फेकण्याच्या उद्देशाने हत्यार आणि गोळाबारूद जमविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले १९१४ मध्ये भारतात परत आले लगेच त्याना अटक करण्यात आली आणि सरकारी यंत्रणेविरुद्ध षड्यत्र रचण्याच्या आरोपाखाली आजीवन कारावासाची सजा सुनावण्यात आली आणि त्याना ' सेल्युलर जेल ' मध्ये पाठविण्यात आले तेथे त्यांना खूप यातना देण्यात आल्या आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला

(९) सरदार कहरसिंग

सरदार कहरसिंग याचा जन्म पजाब प्रांतातील अमृतसर जिल्ह्यातील मराहना गावी १८९२ रोजी झाला होता त्यांच्या वडिलांचे नाव निहालसिंग होते आईचे नाव श्रीमती चान्द कौर व्यवसायाने ते शेतकरी होते सयुक्त राज्य अमेरिकेत ते गद्दार पार्टीचे सदस्य होते १९१५ मध्ये भारतात परत आले ' लाहोर षड्यत्रा ' च्या सम्बंधात त्यांना अटक करण्यात आली आणि त्यातच त्याना ' काळ्या पाण्याची ' सजा फर्माविली सेल्युलर जेलमध्ये शिक्षा भोगत असता १९२० ला ते स्वर्गवासी झाले

(१०) सरदार नन्दसिंग (दोन)

सरदार नन्दसिंग यांचा जन्म पजाब प्रांतातील, लायलपुर जिल्ह्यात (जो सध्या पश्चिम पाकिस्तानमध्य आहे) झाला वडिलांचे नाव पंजाबीसग होते ते भारतीय सैन्यात एक सैनिक म्हणून काम करीत होते ब्रिटिश राजवटीविरुद्ध चालविलेल्या आदोलनाचे ते चाहते आपल्या युनिटच्या लोकाना ते देशभक्ती आणि तिचा आदर्श याविषयी सांगत यामुळेच त्याना अटक करण्यात आली कोर्ट मार्शलद्वारा आजीवन कारावासाची सजा सुनावण्यात आली आणि ' सेल्युलर जेल ' मध्ये कैदी बनवून पाठविण्यात आले व तेथेच त्यांचा मृत्यू झाला

(११) मनकृष्ण नामदास

मनकृष्ण नामदास हे क्रान्तिकारी दलाचे एक सदस्य होते क्रान्तिकारी आंदोलनात त्यांनी अत्यंत हिरिरीने भाग घेतला होता. नंतर त्यांना गिरफ्तार करण्यात आले त्यांच्यावर खटला चालविला गेला आणि काळ्या पाण्याची सजा फर्माविली गेली अंदमानस्थित 'सेल्युलर जेल' मध्ये कैदी बनवून पाठवून दिले जेलमधील राजकीय बंद्यांना जी अमानवीय वागणूक दिली जात होती तिच्या विरोधात त्यांनी १६ मे १९३३ रोजी भूक हरताळ सुरू केला आणि २६ मे १९३३ रोजी त्यांची त्यातच जीवन-ज्योत मालविली

(१२) मोहित मोहन मित्र

मोहित मोहन मित्र हे पश्चिम बंगालमधील कलकत्ता येथील रहिवासी होते ते हेमचन्द्र मित्र यांचे सुपुत्र होते ब्रिटिश राजवटीविरुद्धच्या चळवळीत त्यांनी सक्रिय भाग घेतला क्रान्तिकारी चळवळीत हात असल्याच्या संशया-वरून फेब्रुवारी १९३२ मध्ये गिरफ्तार केल्या गेले

एक पिस्तूल आणि काही प्रमाणात गोळा बारूद त्यांच्या घरातून जप्त केल्या गेला केवळ त्यासाठी म्हणून ५ वर्षांची सक्त कारावासाची सजा सुनावली आणि अंदमानला पाठविण्यात आले १६ दिवस सतत भूक हरताळ केल्यानंतर दि २८ मे १९३३ ला त्यांना मृत्यू आला

○ ○

परिशिष्ट ब

# राजकीय बंद्यांची प्रांतवार सूची

ब्रिटिश राजवटीत राजकीय बद्याना अदमानला 'काळ्या पाण्याच्या' सजेवर पाठवीत होते या परिशिष्टात येथे ब्रिटिशांनी पाठविलेल्या राजकीय बद्यांची प्रांतवार, नावाची सूची देण्यात येत आहे वास्तविक जपानी आधिपत्याच्या काळात (१९४२–१९४५) बव्हशी रेकॉर्ड नष्ट केल्या गेले. त्यामुळे संपूर्ण सूची उपलब्ध नाही परतु येन केन प्रकारांनी ज्या ज्या प्रमुख राजकीय कैद्यांची नावे उपलब्ध झाली आहेत; तीच केवळ येथे देत आहे

**उत्तरप्रदेश**

| | |
|---|---|
| शिव शर्मा | डॉ गयाप्रसाद |
| जयदेव कपूर | रोशनलाल |
| शचीद्रनाथ सन्याल | गोविंदराम |
| विष्णुशण दुबलिश | मुखदाबाबू |
| विजयकुमार सिन्हा | बच्चूलाल |
| लक्ष्मीकांत शुक्ल | गौरीशंकर दुबे |
| मुज्तबा हुसेन | नदगोपाल |
| शभूनाथ आझाद | रामहरी |
| ठाकुर नहाबी | लद्दाराम |
| पंडित परमानंद | होतीलाल |

पंजाब

गुरुमुखसिंग
हरनामसिंग
हिरदेराम
इन्दरसिंग
ज्वालासिंग
कालासिंग धसीटासिंग
कालासिंग गुलाबसिंग
केहरासिंग
कृपालसिंग
लालासिंग
मदनसिंग
मगलसिंग
केसरसिंग
खुशालसिंग
निधानसिंग
भाई परमानद
बाबा पृथ्वीसिंग आझाद
रामसरनदास
रोडासिंग
रुरसिंग
रुलियासिंग
सावनसिंग
शेरसिंग
शिवसिंग
सोहनसिंग
वासवासिंग
वसाखासिंग
नदासिंग (१)

करतारसिंग
मुशासिंग दुखी
प्यारासिंग
रणधीरसिंग
सज्जनसिंग
सुच्चासिंग
रामरक्खा
चेतराम
कृपाराम
कपूतसिंग
बिशनसिंग (१)
बिशनसिंग (२)
नत्थासिंग
केहरासिंग
चरणासिंग
नन्दासिंग (२)
गुरुदीतसिंग
हजारासिंग
जवद्रासिंग
ज्वालासिंग (२)
लालासिंग (२)
उधमासिंग
बिशनसिंग
चूरासिंग
गुरुमुखसिंग
इन्दरसिंग
हरदीतासिंग
अमरसिंग

अगतराम
जीवनसिंग
अली अहमद
मास्टर छत्तरसिंग
करतारासिंग
तेजासिंग

सिंघाडासिंग
धन्वतरी
बाबा गुरुमुखसिंग
मानसिंग
हजारासिंग
खुशीराम मेहता

**बंगाल**

बारीन्द्रकुमार घोष
उल्हासकर दत्त
सुरेन्द्रनाथ सरकोल
आशुतोष लाहिरी
लोकनाथ पाल
अनतलाल सिंग
गणेशचन्द्र घोष
त्रैलोक्यचरण चक्रवर्ती
हेमचन्द्र दास
उपेन्द्रनाथ बॅनर्जी
अमृतलाल हाजरा
खगेन्द्रनाथ चौधरी
मदनमोहन भौमिक
निकुंजीबिहारी पाल
गोविंदचन्द्र कार
जतीन्द्रमोहन नंदी
सत्यरंजन बसू
गोपेन्द्रलाल राम
पुलिनबिहारी दास
योगेशचन्द्र चॅटर्जी
रमेशचन्द्र चॅटर्जी
प्रतुलचन्द्र गांगुली

हरिनारायण चंदा
नरेन्द्रमोहन घोष चौधरी
सबाईराम दास
प्रबोधचन्द्र रॉय
प्रबीर गोस्वामी
बिमलदास गुप्ता
कालीपद चक्रवर्ती
सुरेशचन्द्र दास
हरप्रसाद भट्टाचार्य
रमेशचन्द्र चॅटर्जी
सुखेन्द्र दस्तीदार
लालमोहन सेन
सुबोध चौधरी
सुबोध रॉय
फकिरचन्द्र सेन
रणधीर दासगुप्ता
गणेश घोष
अनतलालसिंग
आनंद गुप्ता
विनयकुमार बसू
हिरेन मोहन चॅटर्जी
गोपाल आचार्य

**अंदमान–निकोबार**

जगेश्वर रॉय
संतोषचन्द्र दत्ता
अमलेन्दु बागची
रवीन्द्रचन्द्र नियोगी
अनुकूलचन्द्र चॅटर्जी
विजयकुमार सेन
रामचद्रदास साहा
हरेकृष्ण
धरणीकान्त चक्रवर्ती
डॉ नारायण रॉय
सुरेन्द्र दत्ता
अधीरचन्द्र सिन्हा
गोविंद कार
राखालचन्द्र डे
प्रमोदरजन बसू
सुनीलकुमार चॅटर्जी
गौर गोपाल दत्त
अभयपद मुखर्जी
रवीन्द्रनाथ गुहा रॉय
शशिमोहन भट्टाचार्य
भूपेशचन्द्र बॅनर्जी
विनय भूषण
हरिपद चौधरी
कालीपद भट्टाचार्य
गोपालचन्द्र डे
सरोजकांती गुहा
शचीन्द्रकर गुप्त
सुधांशु नारायणदास मुजूमदार
वीरेन्द्रचन्द्र लाहिरी

भूपेशचन्द्र शाह
शरदप्रसन्न बसू
चन्द्रनाथ भट्टाचार्य
सुधांशु लाहिरी
हेमचन्द्र दत्ता
श्रीधर गोस्वामी
हरिलाल चक्रवर्ती
दिनेशचन्द्र साहा
जानकीनाथ दास
भुवनमोहन चदा
प्रकाशचन्द्र सोल
धरणी वाणिक्य
इन्दुभूषण दास
आनदचरण पॉल
सुरेन्द्रनाथ दत्त गुप्ता
जगदानद मुखर्जी
कुमुदबिहारी मुखर्जी
राममोहन करजी
विमलरजन
चित्तरजन दत्त
जोगेशचन्द्र भट्टाचार्य
जगनेश्वर दास
राधावल्लभ
शांतीगोपाल सेन
सनातन रॉय
कृष्णपद चक्रवर्ती
नद दुलालसिंग
शचीन्द्र नदी
धीरेन्द्रकुमार विस्वास

गोविंद गुप्त
सरासिम मोहन मित्रा
हरिदास साहा (रॉय)
सतीशचन्द्र बासू
हरचन्द्र बख्शी
नृपेन्द्र दत्ता
मनोरंजन बॅनर्जी
प्रशांतकुमार सेनगुप्ता
कामाख्यचरण घोष
समरेन्द्र घोष
ब्रजमोहन देव
शचीन्द्रमोहन चक्रवर्ती
सुकुमार घोष
मधुसूदन बॅनर्जी
अजयचन्द्र सिंग
मणीन्द्र दत्ता
दिनेशचन्द्र दास
राजेन्द्रनाथ चक्रवर्ती
मधुसूदन दत्ता
भोलानाथ रॉय कर्मकार
समाधीचन्द्र रॉय
शांतीपद चक्रवर्ती
सरोजकुमार बासू
हृषिकेश भट्टाचार्य
प्राणकृष्ण चक्रवर्ती
रामकृष्ण मंडल
रहिपद बासू
मनमोहन शाह
अनंतकुमार चक्रवर्ती
गगनचन्द्र डे
मणीन्द्र डे
सुशीलकुमार डे
प्रियरंजन चक्रवर्ती
जीवेन्द्रकुमार दास
नीरेन्द्र बरुआ
शरदेन्दु भट्टाचार्य
अरविंद डे
प्रवकार विरोनी
विमल सरकार
नगेन्द्रचन्द्र डे
प्रफुल्ल नारायण सन्याल
प्रथमनाथ घोष
ज्योतिर्मय
धरणीधर रॉय
हरिहर दत्ता
सत्यव्रत चक्रवर्ती
कीर्तिकुमार मुजूमदार
विजयकुमार चक्रवर्ती
विजय घोष
प्राणगोपाल मुखर्जी
हरनचन्द्र खगर
उमाशंकर कार
रजतभूषण दत्ता
कालो किंकद डे
अमूल्य रॉय
कालीप्रसन्न रॉय चौधरी
प्राणकृष्ण चौधरी
परमेशचन्द्र चौधरी

**अंदमान–निकोबार**

नागेन्द्र मोहन
जोगेशचन्द्र दास
कुमुदनाथ घोष
वीरभूषण चक्रवर्ती
नित्यांजन चौधरी
अधीररंजन नाग
रामानद समाजदार
रजनीकांत सरकार
नानी गोपाल दास
उपेन्द्र मडल
हरेन्द्र दास
परन गुहा
निर्मलेन्दु गुहा
सरोजभूषण राम
सत्येन्द्र नारायण मुजूमदार
सुरेन्द्रधर चौधरी
ज्योतिषचन्द्र मुजूमदार
जितेन्द्रनाथ गुप्त
प्रभातचन्द्र चक्रवर्ती
विमलचन्द्र भट्टाचार्य
सुशीलकुमार चक्रवर्ती
नरेन्द्रप्रसाद
अमूल्यचन्द्र सेनगुप्ता
परेशचन्द्र गुहा
हरिपद डे
द्विजेन्द्रनाथ जलपात्र
नरेन्द्रचन्द्र घोष
कृपानाथ डे
कालीमोहन बॅनर्जी
अतुलचन्द्र दत्ता
धीरेन्द्रनाथ भट्टाचार्य
सत्यरजन घोष
हिमांशु भौमिक
अक्षयकुमार चौधरी
भूपेन्द्रचन्द्र भट्टाचार्य
डॉ भूपालचन्द्र बासू
सुकुमार सेन
विभूतिभूषण सरकार
अविनाश भट्टाचार्य
सुधीरकुमार सरकार
ऋषिपरेश काजीलाल
बटुकेश्वर दत्ता
कमलनाथ त्रिवेदी
धन्वतरी
वीरेन रॉय
मुकुल सेन
हृदयरजन दास
मानकृष्ण दास
मोहित अधिकारी
मोहितमोहन मित्रा
निरंजन सेन
नानी गोपाल मुखर्जी
सुरेन्द्र सेन गुप्ता
खितीशचन्द्र सन्याल
निखिलरजन गुहा रॉय
शचीन्द्र दत्ता
सुरेन्द्रनाथ विश्वास
इन्दुभूषण रॉय

| | |
|---|---|
| विधुभूषण डे | प्रियानाथ |
| कालीदास घोष | सतीश पकराशी |
| अवनिभूषण चक्रवर्ती | मलय बाबू |
| वीरेन सेन | केशव समाजदार |

**बिहार**

| | |
|---|---|
| विश्वनाथप्रसाद | शामकृष्ण अग्रवाल |
| डॉ केशवप्रसाद सिन्हा | शामदेव नारायण |
| सुरजनाथ चौबे | दुर्गाभगत |
| मलयकृष्ण ब्रह्मचारी | लालगौरीप्रसाद रॉय |
| प्रथमनाथ घोष | झबरा खा |
| कन्हैयालाल मिश्रा | नेपाल कोइरी |
| जोगेन्द्र शुयाल | अब्दुल लतीफ बटा |
| महावीर मिश्रा | |

**आसाम**

| | |
|---|---|
| दुतीराम बरुआ | शेख फरमूद अली |
| बहादुरा गाओबुरा | मधु मलिक |

**महाराष्ट्र**

| | |
|---|---|
| विनायक दामोदर सावरकर | वामनराव जोशी |
| गणेश दामोदर सावरकर | |

**तामीळनाडू**

| | |
|---|---|
| प्रतिवदी व्यंकटाचारी | विजय राघवाचारी |

○ ○

परिशिष्ट क

# द्वीपांची नावे

अदमान–निकोबार द्वीपसमूहामध्ये एकूण ३५२ द्वीप आहेत त्यापैकी फक्त १८५ द्वीपानाच वेगवेगळी नावे देण्यात आली आहेत. ती याप्रमाणे–

| | |
|---|---|
| लँड फाल | क्वांग तुग |
| वेस्ट | बँबू |
| व्हाइट क्लिफ | ब्लिस्टर |
| थार्नहिल | करल्यू |
| नार्थ अदमान | स्टुवर्ड |
| रीफ | गूज |
| पाइट | गँडर |
| पैगट | डाट |
| शियर्म | इटरव्यू |
| मेयो | साउथरीफ |
| शुगरलीफ | बेनेट |
| जबनब | एडर्सन |
| आक्स | टफ्ट |
| रोव | हम्प |
| स्नार्फ | मास्क |

फिस्ट
स्पाईक
ब्लफ
बिंघम
ताला कॅच्छा
मैंग्रोव
स्टोट
दक्षिण अदमान
कैथा
केथ
बेबी
बैले
सी-सर्पेंट
स्नेक
बाउडर विले
एटेस
बुकानन
स्वांप
कर्लो
ऐरा
डाट्रेल
आर्चिड
आलिवर
गुर्जन
एब्ज
आयस्टर
सूरत
स्पोक
साऊंड
रोपर
रेंजर
रेंजर
पुर्लोब
कोन
आयस्टर
पार्किसन
लाँग
बाराटाग
गिटार
राउड
कोलब्रुक
नॉर्थ पॅसेज
ओरल कच्छा
बेनिग
एरियल
स्ट्रेट
विल्सन
टाटा चौलुगा
डकन (एट्री)
किकाल्सन
पील
हॅवलॉक
ईस्ट
चेनल
पीकॉक
टॅम्पल
ट्रीलबी
एक्सेलशियर

| | |
|---|---|
| डेलानों | जेम्स |
| ट्री | किड |
| नॉर्थ | सँडो |
| व्हार्फ | चॅथम |
| साउथ | वाईपर |
| चॅथम | तारमुगली |
| एरियल बे | लेबिरिंग |
| जंगल | वोट |
| ब्रुश | बेले |
| रॉश | स्नाब |
| स्मिथ | चेस्टर |
| टर्टल | कर्ब |
| मिड्ल रीफ | रॅडस्किन |
| साउथ रीफ | मलाय |
| नॉर्थ रीफ | जॉली बायज् |
| नॉर्थ रीफ | हॅव्हे |
| कॅगो | एलेकझॅन्ड्रा |
| नॉर्थ बटन | प्लूटो |
| मिडल बटन | रटलॅन्ड |
| ऑटरम | राईफलमॅन |
| हेन्री लॉरेन्स | १३९ ते (१४२) पर्यंत सिंक |
| जॉन लॉरेन्स | लिटल अदमान |
| ईस्ट | नील |
| साउथ बटन | सर ह्यूम रोज |
| पॅट्री | ट्वीस |
| डिफेंस | नॉर्मन टाउन |
| क्लाईड | पोटसा |
| मौंटगोमरी | रॉस |
| पॅटमॅन | ट्वीस |

| | |
|---|---|
| स्नेक | कमोर्टा |
| बॅरन | ट्रिकल |
| नॉरकोंडम | तिलांग चांग |
| नॉर्थ सेंटिनल | ऑईल ऑफ मॅन |
| पॅसेज | ऑईल ऑफ मॅन |
| सिस्टर्स | ऑईल ऑफ मॅन |
| नॉर्थ ब्रदर | लिटल निकोबार |
| साऊथ सेंटीनल | भेरु |
| साऊथ ब्रदर | ट्रेक |
| नॉर्थ रीफ | ट्रीस |
| लाटूश | पुलोमिलो |
| कार-निकोबार | मचाल |
| बाटीमाल्व | कोंडूल |
| चावरा | काब्रा |
| टेरेसा | ग्रेट-निकोबार |
| बपूका | पिजियन |
| कच्छाल | मेगॅपॉड |
| नानकौरी | |

वरील निर्देशित नावांमध्ये एकाच नावाची एकापेक्षा जास्त द्वीपेसुद्धा आहेत आणि म्हणूनच तीच नावे मधून मधून आलेली आहेत

२३३०६

# संदर्भ


( १ ) माझी जन्मठेप– लेखक वीर वि दा. सावरकर

( २ ) दुसऱ्या महायुद्धातील बलिदान– लेखिका श्रीमती विमला रहाळकर

( ३ ) अन्दमान द्वीपसमूह– लेखक सुशीलचन्द्र चतुर्वेदी

( ४ ) सिंहद्वार (मासिक) प्रकाशक– अंदमान प्रशासन, पोर्ट–ब्लेअर

( ५ ) शहीदों का विवरण (पुस्तिका) प्रकाशक– अन्दमान प्रशासन, पोर्ट–ब्लेअर

( ६ ) Penal Settelment– By Dr R. C. Mujumdar

( ७ ) The Andaman & Nicobar Information– 1978-79
By A and N Administration, P/Blair

( ८ ) Miniature India– By V Vaeraih

( ९ ) Basic Statistics– 1977–78
By A and N Administration, Port Blair

(१०) Yojana– Vol XX/13/15-8-76
By Planning Commission, New-Delhi

(११) The Daily Telegrams, (English Daily), 15, Issues
By A. and N. Admn , Port Blair.


○ ⊙ ○

REFBK-0023306